

# श्री साई वाक्सुधा

धीर धरून रहाणें, धैर्यानें वागणें म्हणजेच सबुरी. ही नेहमीं जवळ बाळगली पाहिजे. तिला दूर लोटून चालणार नाहीं. कधीं संकट कोसळलें तर त्यांतून पार पाडणारी म्हणजे सबुरी. पुरुषांचें पुरुषत्व तिची कास धरण्यांत आहे. दुःख, दैन्य निवारण करणारी तीच, संकटें कोसळलीं तर युक्तिप्रयुक्तीनें तीं निवारण करणारी तीच. भयभीती तीच निवारण करते. कोणत्याही कार्यांत यश मिळवून देणारी तीच असून ती जवळ असली म्हणजे संकटें बारा वाटांनीं पळ काढतात. जेथें सबुरी आहे तेथें अविचार रहाणार नाहीं. यासाठीं निष्ठा आणि सबुरी हे दोन्ही सद्‌गुण अंगीं जितकें बाणवितां येतील तितके बाणविण्या-साठीं झटावें. त्यांतच कल्याण आहे. '**सबुरी सद्‌गुणांची खाणी। सद्विचार रायाची हे राणी। निष्ठा आणि ही सख्या वहिणी। जीव प्राण दोघींसी॥**

—**श्रीसाईसच्चरित**

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

**वर्ष ३८ वें ]** **एप्रिल १९६०** **[ अंक १ ला**

## * श्री रामनवमी विशेषांक *

: संपादक :

**नागेश आत्माराम सावंत**

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

**टे. नं. २५१२७४**

: कार्यालय :

**ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग, ४५।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १**

# प्रिय वाचक—

श्रीसाई लीलेचा हा श्रीरामनवमी विशेषांक आपल्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे. श्रीरामनवमी म्हणजे आनंदाचा सुखसोहळा! श्रीरामचंद्र प्रभूंचा जन्म व त्यांचें सारें जीवन जगाला सुख, समाधान व शांति देण्यासाठीं होतें. श्रीरामचंद्रासारखे सर्वगुणसंपन्न श्रीरामच. त्यांची तुलना दुसऱ्या कोणाशीं करतां येणार नाहीं. आपल्या दैनंदिन वागणुकीनें, कर्तृत्वानें व पराक्रमानें आखिल मानवजातीपुढें त्यांनीं उच्चांत उच्च असा आदर्श ठेविला आहे. अशा या पुरुषोत्तमाचें यथाशक्ति सर्वांकडून अनुकरण व्हावें, हा दिव्य, भव्य व कल्याणदायी आदर्श सर्वांपुढें रहावा हाच श्रीरामचंद्रांची जयन्ति वर्षानुवर्ष साजरी करण्याचा मुख्य हेतु. जो जो हिंदु आहे, त्याच्या रक्तांत 'रामनाम' भिनून गेलेलें आहे. श्रीराम म्हणजे प्रत्येकाला प्रति प्राण वाटत असतो. तें गोड नांव सर्वांना आराम देत आलें आहे. रामनाम ही अमृतवल्ली आहे. चैतन्याची खाण आहे. रामनामाचा आधार घेऊन आजवर कोट्यावधि लोकांनीं आपला संसार व आपलें जीवन सुखासमाधानाचें केलें. काळोखांत प्रकाश दाखविणारें, निराशेंत आशेचा किरण दाखविणारें व निर्जिवांस संजीवन देणारें असें हें रामनाम आहे.

आणि म्हणूनच तर जगाच्या कल्याणासाठीं श्रीसाईबाबांनीं शिरडींत श्रीराम जन्माचा सोहळा मोठ्या समारोहानें व सुसंघटित रीतीनें पार पाडण्याची प्रथा सुरू करविली व ती त्यांच्या प्रेरणेनुसार व त्यांच्या कृपेनें आजवर अव्याहत चालू आहे. या उत्सवानिमित्त शिरडी येथें श्रीसाईबाबांच्या समाधिसमोर सतत ३।४ दिवस श्रीरामनामाचा गजर होईल. ठिकठिकाणाहून आलेले हजारो लोक त्या उत्सवांतील नामसंकीर्तनांत मोठ्या भक्तिभावानें भाग घेतील व पुण्यपावन होऊन जातील.

श्रीरामचंद्रांचें जीवन कार्य आणि त्यांचें पुण्यप्रद चरित्र व आदर्श चारित्र्य भारतवासीयांपुढें हजारो वर्षांपासून आहे. त्यांच्या गुणाचें संकीर्तन जितकें करावें तितकें थोडेंच; आणि तें जितकें करावें तेवढ्या प्रमाणांत आपल्या गांठीस पुण्यसंचयच व्हावयाचा.

श्रीरामचंद्रप्रभूंच्या गुणांचा विविध दृष्टिकोनांतून विद्वानाकरवीं विचार व्हावा व विविध गुणांनी नटलेले श्रीरामचंद्र प्रभूंच्या चारित्रांतील कांहीं प्रसंग आमच्या वाचकांपुढें यावे या हेतूनें ज्यांनीं वाल्मिकी रामायणाचा विशेष बारकाईने विचार व अभ्यास केला आहे, अशा कांहीं विद्वान् मंडळीस आम्हीं श्रीसाईलीलेस आपल्या विचारसंपदेची जोड करून देण्याची विनंती केली व त्या विनंतीस मान देऊन प्रा. नरहर रघुनाथ फाटक, प्रा. डॉ. कृ. र. पोवदार, प्रा. वि. गो. तथा आबासाहेब शेटे, प्रा. डॉ. चारुशीलाबाई गुप्ते, श्री. स. म. ठाकूर वकील, श्री. पु. बा. कुलकर्णी वगैरे आमच्या मित्रांनीं श्रीराम चरित्राकडे पहाण्याचा आपापला दृष्टिकोण आमच्या वाचकांपुढें ठेऊन त्यांच्या विचारांस

चालना दिली व अशा रीतीनें या अंकाच्या बाबतींत उदारपणें जें सहकार्य केलें, त्याबद्दल त्यांचे कितीहि आभार मानले तरी ते थोडेच होतील.

ने. ना. श्रीनिवासशास्त्री व संत विनोबा भावे यांच्या रामायण विषयक सुविचारांचा या विशेषांकाच्या द्वारें आमच्या वाचकांस परिचय करून देण्याची संधि मिळाली हेंही आम्हीं आमचें भाग्य समजतों.

त्याचप्रमाणें श्री. द. पां. खांबेटे, श्री. जानकी बाळकृष्णतनय, कवि बाबांच्या बाळाचें बाळ, श्री. गणपतराव चेंबूरकर, श्री. वि. पां. सातपुते, श्री. भ. नी. वागळे वगैरे लेखकांनी या अंकासाठीं आपापल्या आवडीच्या विषयावर लिहून, विविध प्रकारें केलेल्या सहकार्याबद्दल आम्हीं त्यांचेही आभारी आहोंत. यापुढें या सर्वांकडून वेळोवेळीं वाढत्या प्रमाणावर असेंच सहकार्य मिळत जाईल अशी अपेक्षा आहे. आम्हीं ज्यांच्याकडून अपेक्षा केली त्यांच्याकडून जरूर तें सहकार्य मिळालें, ही श्रीसाईबाबांची कृपा होय. '**श्रीसाईलीला**' ही त्यांच्या सेवेचें एक वाङ्मयीन स्वरूप आहे. आम्हीं नम्रभावें विनंती करावी व बाबांनीं आमच्या थोर व विद्वान् साहित्य भक्तांना प्रेरणा द्यावी व त्यांच्याकडूनहि यापुढील काळांत अशीच सेवा करवून घ्यावी ही आमची प्रार्थना आहे.

या विशेषांकाची शोभा मुखपृष्ठावरील श्रीसाईबाबांच्या सुंदर चित्रामुळें विशेष वाढलेली आहे. हें चित्र आमचे मित्र श्री. पेडणेकर आर्टिस्ट ( एंप्रेस महाल, खोदादाद सर्कल, मुंबई १४ ) यांनीं आमच्या विनंतीस मान देऊन भक्तिभावपूर्वक काढून दिलें व त्याचे तीन रंगी ब्लॉक्स, आमचे दीर्घकालीन स्नेही श्री. डी. डी. नेरॉय (५३४, सँडहर्स्टब्रिज, चौपाटी, मुंबई ७ ) यांनीं नेहमींप्रमाणें सेवाभावानें व अगत्यपूर्वक तयार करून अगदीं वेळेवर दिले, याबद्दल आम्ही उभयतांचेही आभारी आहोंत. श्री बाबांनीं श्रीसाईलीलेच्या द्वारें त्यांच्याकडून अशीच अखंड सेवा करवून घ्यावी, एवढीच आमची प्रार्थना आहे.

× × ×

## श्री बाबांच्या नांवें जनतेची फसवणूक

श्री साईबाबांचें महत्व अनेक कारणांमुळें त्यांच्या हयातींत वाटत असे व पटत असे, त्याहीपेक्षां त्यांनीं समाधि घेतल्यानंतरच्या काळांत जनतेला त्यांची महति उत्तरोत्तर अधिकाधिक प्रमाणांत पटूं लागलेली आहे. श्रीसाईबाबा म्हणजे शिरडी व शिरडी म्हणजे श्रीसाईबाबा! त्याच भावनेनें भक्तिभावानें प्रति दिनीं शेकडो लोक शिरडींत येतात व श्रीसाईबाबांच्या समाधीचें दर्शन घेऊन पुण्यपावन होऊन जातात.

या जगांत निरनिराळ्या वृत्तींचीं माणसें वावरत आहेत. शिरडी येथील श्रीसाईबाबांचें वाढतें महत्त्व व त्यांचा बोलबाला लक्षांत घेऊन त्यांच्या नांवानें आपलीहि पोळी पिकवून घ्यावी व भोळ्याभाबड्या लोकांची दिशाभूल करावी अशा स्वार्थी व दुष्ट वृत्तींची माणसें या जगांत वावरत आहेत. त्यांना पापपुण्याची व सत्यासत्याची चाड

नसते. स्वतःचा तळीराम गार झाला म्हणजे झालें. आणि दुःखाची गोष्ट म्हणजे अशा स्वार्थी लोकांच्या भुलथापांस बळी पडून स्वतःचें नुकसान करून घेणारे लोकहि आढळून येतात. 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये' हें अक्षरशः खरें आहे. गेल्या ३०–४० वर्षांत साईबाबांच्या गांवानें असंख्य लोकांनीं जनतेची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला व आजहि तेंच चालू आहे. थोर व ज्याचा कीर्तिसुगंध सर्वत्र दरवळलेला असतो, अशा थोरामोठ्यांच्या नांवानें जनतेची फसवणूक करणारीं स्वार्थी माणसें सर्व काळीं व सर्वत्र पुढें आलेली आहेत. पंडित जवाहरलाल नेहरू यांची कीर्ति व त्यांचें थोर नांव लक्षांत घेऊन मी त्यांचा 'प्रायव्हेट सेक्रेटरी' आहे असें सांगून लोकांना फसविणारे कांहीं हरीचे लाल आपल्या ऐकिवांत असतील. त्यांचा ह्रास कोण करणार ? परंतु सुजाण व विचारी लोकांनीं खऱ्या खोट्याची पारख करायला निदान आजच्या काळांत तरी शिकलें पाहिजे, व अशा लोकांपासून नेहमीं चार पांवलें दूर रहाण्याचा निर्धार केला पाहिजे.

आपल्या सभोंवार श्रीसाई बाबांच्या नांवानें नाना प्रकारचे ढोंगधत्तुरे चालले आहेत. कोणी साखळी पत्रांच्या रूपानें, कोणी मी साईबाबांचा अवतार आहें असें भासवून, तर कोणी मी साईबाबांचा पट्टशिष्य आहे अशी बतावणी करून जनतेला फसविण्याचा प्रयत्न करीत आहेत. या फसवणुकीच्या प्रकारांस आजकाल विविध फाटे फुटले आहेत ! मध्यंतरीं कांहीं वृत्तपत्रांतून, शिर्डीपासून तीन मैलांवर मिरजगांव या नांवाच्या गांवीं श्रीसाईबाबा प्रतिवर्षी ठरावीक दिवशीं अवतीर्ण होतात असें भासवून लबाडीनें भोळ्या जनतेला लुबाडण्याचा कसा प्रयत्न झाला यासंबंधींची हकीगत प्रसिद्ध झाली आहे. 'मिरजगांव' या नांवाचें नांव अगोदर शिरडीपासून तीन मैलांवर नाहीं; तें ३०/४० मैलांवर असल्याचें समजतें ! तसेंच शिरडी जवळ एखादी नदीही नाहीं. मिरजगांव येथें श्रीसाईबाबा अमुक दिवशीं अवतीर्ण होऊन भक्तांना दर्शन देतात व त्यांच्या मनकामना पूर्ण करतात असा आभास निर्माण करून जनतेला लुबाडण्याचा हा अत्यंत हीन प्रकार आहे व स्वतःचें पोट जाळण्यासाठीं अशा हीन प्रकारांचा अवलंब करणारी हीन प्रवृत्तीचीं स्वार्थी माणसें जागजागीं आढळून येतात. अशा लोकांपासून जनतेनें नेहमीं सावध रहावें, कोणाच्याहि भुलथापांस बळी पडून आपली विचारशक्ति गमावून बसूं नये, असे इशारे श्रीसाईलीलेंतून वारंवार व परोपरीनें देण्यांत येत असतात. श्रीसाईबाबा शिरडी संस्थानचा अशा प्रकारांशीं व ढोंगी लोकांशीं कोणताहि संबंध नाहीं. श्रीसाईबाबांचे कोणी शिष्य नाहींत किंवा आपलें प्रतिनिधित्वहि त्यांनीं कोणाला दिलेलें नाहीं, हें एक दोन वेळां नव्हे, तर अनेक वेळां कंठशोष करून सांगण्यांत आलें आहे; तरीहि अविचारी लोक भुलथापांना बळी पडत आहेत.

भक्तांची श्रीसाईबाबांच्या नांवें कोणत्याहि प्रकारें व कोणत्याहि बाबतींत फसवणूक होऊं नये, ज्यांची ज्यांची श्रीसाईबाबांवर भक्ति व अढळ निष्ठा आहे, त्यांनीं शिरडी येथें येऊन श्रीबाबांच्या समाधिस्थानीं आपआपला भक्तिभाव यथाशक्ति प्रगट करावा व बाबांचा आशीर्वाद मिळवावा, यासाठीं जरूर व शक्य त्या सुखसोयी तेथें निर्माण करून ठेवण्यांत आलेल्या आहेत. शिरडी संस्थान भक्तांच्या सुखसोयीसाठीं व

मार्गदर्शनासाठीं परोपरीनें झटत आहे. जें जें आपल्या आटोक्यांत आहे तें तें सर्व करीत आहे; परंतु कुठें तरी, कोणी तरी स्वार्थबुद्धीनें श्रीसाईबाबांच्या नांवें जनतेला फसवण्याचा अव्यापारेषु व्यापार करूं लागला तर त्याचा हात कोण धरणार? अशा धूर्त, लबाड व स्वार्थी लोकांस आपण ओळखलें पाहिजे व त्यांच्यापासून नेहमीं दूर दूर राहिलें पाहिजे. पोट भरण्याचे धंदे आजच्या काळांत थोडे थोडके का उपलब्ध आहेत? प्रामाणिकपणें उद्योग करून प्रत्येकानें जरूर पैसे मिळवावेत व सुख भोगावें. तो प्रत्येकाचा हक्क आहे; परंतु श्रीसाईबाबांच्या नावें ढोंग करून, व जनतेच्या डोळ्यांत धूळ फेकून पोट जाळणें यासारखा हीनपणाचा व अधोगतीला नेणारा उद्योग दुसरा कोणताहि नसेल. दुसऱ्यांस खड्ड्यांत लोटून स्वतःहि त्या खड्ड्यांत गाडून घेण्याचा हा पापी व अनिष्ट प्रकार आहे. ज्यांना तो चालवायचा असेल त्यांचा हात कोण धरणार? त्यांना बंदी घालण्याचें सामर्थ्य आमच्यांत नाहीं. तें बाबांचें सामर्थ्य आहे. ते पाहून घेतील; परंतु वाचकहो! ढोंगी लोकांच्या कोणत्याहि कारवाईस आपण बळी पडूं नका, सावधानतेनें वागा व सोनें नीट पारखून घ्या, एवढेंच या निमित्तानें आम्हांला अत्यंत विनयपूर्वक सांगावयाचे आहे.

× × ×

## श्रीसाईलीलेचा प्रसार

या विशेषांकापासून (एप्रिल) श्रीसाईलीलेचें नवीन वर्ष सुरू होत आहे. श्रीसाई भक्तांची अनन्यभावें सेवा व यथाशक्ति मार्गदर्शन हें ध्येय दृष्टीपुढें ठेऊन गेलीं सदतीस वर्षें हें मासिक आपल्या ध्येयानुसार कार्य पार पाडण्यासाठीं झटत आहे. विशेषतः गेल्या सहा महिन्यात या मासिकाचे जे अंक प्रसिद्ध झाले त्यावरून या मासिकाच्या उपयुक्त सेवेची वाचकांस कल्पना झाली असेल. रोजच्या जीवनांत आपलें मार्गदर्शन करणाऱ्या, मनाला समाधान व शांति यांचा परोपरीनें लाभ करून देणाऱ्या व साधु-संतांचा सहवास घडविणाऱ्या या मासिकाला आपल्या घरांत स्थान असावें, घरांतील लहान थोरांच्या हातीं सदाचाराचें व भक्तिभावाचें पोषण करणारें हें मासिक पडावें असें आपणाला वाटत नाहीं काय? श्रीसाईबाबांची सेवा हातून परोपरीनें घडावी, यासाठीं झटणारे आपण आहांत. अशा प्रकारच्या मासिकाच्या प्रचारासाठीं झटणें म्हणजे सद्विचार व सद्भावना यांच्या प्रसारासाठीं झटण्यासारखें आहे. हें एक पुण्यकार्य आहे. प्रिय वाचक! हें पुण्यकार्य आपल्या हातून अंशतः तरी घडावें असें नाहीं का आपणास वाटत? आरंभी नमूद केल्याप्रमाणें चालू महिन्यापासून या मासिकाचें नवीन वर्ष सुरू होत आहे. जितके वाचक, वर्गणीदार अधिक, तितका वाचकांची सेवा करण्यास अधिकाधिक हुरूप येत असतो. मासिकालाहि जोमदारपणा येत असतो. श्रीसाईलीला सध्या आहे त्यापेक्षां अधिक नमुनेदार, अधिक प्रफुल्लित व अधिकाधिक सुंदर व्हावी, यासाठीं प्रत्येकानें वर्गणीदार होऊन व आपल्या स्नेहीसोबत्यांस वर्गणीदार बनवून, या कार्यांत सहभागी व्हावें, अशी आमची सर्वांना या वर्षारंभीं अत्यंत कळकळीची विनंती आहे. श्रीसाईबाबा तशी प्रेरणा या नवीन वर्षापासून सर्वांना देवोत, हीच अनन्यभावें प्रार्थना आहे.

—संपादक

# भारतीय संस्कृतीचा सर्वोच्च बिंदु प्रभु श्रीरामचंद्र

लेखक : प्रा. न. र. फाटक

'दुराचारांचें निर्मूलन करण्याला दृढनिश्चयानें प्रवृत्त होणें हीच श्रीरामाची खरी भक्ति ठरते. रामनामाच्या जपानें किंवा वर्षांतून एकदां रामाची कीर्ति गाईल्यानें रामावताराचें सार्थक झालें, असें मानणें घातक आहे.'

'नहि रामात्परो लोके दृश्यते सत्पथे स्थितः'

वाल्मिकीरचित रामायणांतील श्रीराम चरित्र हें केवळ भारतीयांना नव्हे, तर जगांतील सर्व मानव समाजाला आदर्शवत् वाटणारें आहे. श्रीकृष्णावताराला पूर्णावतार मानण्याचा प्रघात आहे, परंतु शुद्धांत शुद्ध चारित्र्य संपन्नतेच्या दृष्टीनें दोन्ही अवतारांची तुलना केल्यास रामाला पूर्णावतार ठरविण्यांत चूक होईल असें वाटत नाहीं. 'एकवचनी एकबाणी व एकपत्नी' हीं विशेषणें एकट्या रामाच्या संबधांत अनन्यत्वानें लावलीं जातात. या विशेषणांच्या द्वारें मानवतेच्या विकासाच्या श्रेष्ठ गुणांचा अंतर्भाव असल्याची खूण विचारवंतांना पटण्याला हरकत नाहीं. आपल्या तोंडांतून बाहेर पडणाऱ्या वचनाचा यथार्थ परिणाम अनुभवास आणून देणें, हा मानवी व्यवहारांत फार मोठा गुण समजला जातो. राम ज्या वंशांत जन्मास आला त्या वंशाची कीर्ति बोललेला शब्द खरा करून दाखविण्याच्या गुणावरच आधारलेली होती. 'प्राण जाईल पण वचन खोटें ठरणार नाहीं;' अशी रघुकुलाची रीत असल्याविषयीं तुलसीदासांचे प्रशंसोद्गार पुष्कळांच्या परिचयाचे असतील. 'अमक्यानें असें म्हटलें आहे ना? मग तें खरें असलेंच किंवा झालेंच पाहिजे,' असा जगाला त्याबद्दल विश्वास वाटणें, हें माणसांच्या सच्चारित्र्याचें मोठें भांडवल आहे. या भांडवलामागें आपल्या सामर्थ्याच्या मर्यादा ओळखण्याचा आणखी एक गुण असल्याशिवाय भागत नाहीं. वालीला ठार करण्याचें रामानें कबूल केल्यावर सुग्रीवानें त्याच्या सामर्थ्याची प्रशंसा करून राम आपलें आश्वासन पार पाडील अशी खात्री पटवून घेतली; रामाला वचन देतांना कोणत्याहि कसोटीवर आपलें सामर्थ्य उजळून दिसेल, याविषयीं आत्मविश्वास होता. कैकयीनें मागितलेल्या वरानुसार रामानें वनवास स्वीकारला. त्याला पुनः जेव्हां वनवासाच्या निश्चयाबद्दल प्रश्न केला तेव्हां त्यानें 'राम कोणतीहि एक गोष्ट एकदांच बोलतो, दोनदां तेंच तेंच बोलण्याची त्याला सवय नाहीं —'रामो द्विर्नाभिभाषते,' असें त्यानें ठासून उत्तर दिलें.

## एकबाणी रामचंद्र

रामाच्या काळीं बाण हेंच शत्रूच्या प्रतिकाराचें साधन होतें. आज प्रतिकाराची अर्थात् शत्रुसंहाराचीं साधनें विविध आणि विपुल आहेत. बाण या शब्दाची साधन

अशी व्याख्या केल्यास एखादें कार्य साधण्याकरितां जीं साधनें योजावयाचीं, तीं इटकून कार्यक्षम असलीं पाहिजेत. हा बोध 'एकबाणी' या विशेषणांत सांठविलेला आढळेल. रामानें धनुष्यावर बाण चढविला आणि तो वाया गेला, असा रामाच्या बाणाचा अनुभव नव्हता. परशुरामानें मोठ्या तोऱ्यांत रामापुढें उभ्या केलेल्या वैष्णव धनुष्याला रामानें आयासावांचून बाण जोडला; पण परशुराम ब्राह्मण म्हणून त्यावर सोडला नाहीं. या बाणाचा प्रयोग कोणावर करूं ? (कारण रामाचा बाण सफळ झाला पाहिजे) असा त्यानें परशुरामाला प्रश्न विचारला. परशुरामाचा गर्व रामाची अद्‌भुत बलाढ्यता पाहून साफ जिरला होता. त्यानें आपल्या तपोनिर्मित वस्तिस्थानाचा जोडलेल्या बाणाकरवीं विध्वंस करण्याला सुचवून आपला अवतार संपविला. 'एकबाणी' या विशेषणांतून हीच 'रामबाण' ही म्हण रूढ झालेली आहे. 'रामबाण औषध,' 'रामबाण उपाय' वगैरे शब्द रामाच्या बाणाची महति निदर्शनास आणणारे आहेत. आपल्या कर्तृत्वाच्या एखाद्या अंगाचा ठसा म्हणीच्याद्वारें शेकडो वर्षे जिवंत ठेवणारे कितीजण मानवी इतिहासांत दाखवितां येतील ?

## रामाचें एकपत्नी व्रत

लग्नाच्या कांहीं व बिन लग्नाच्या शेकडो बायकांचा परिवार बाळगणाऱ्या राजकुळांत जन्मास येऊन एकपत्नीव्रताचा धडा आपल्या उदाहरणानें घालून देणाऱ्या रामाची धन्यता सुविख्यात आहे. दशरथाच्या तीन राण्या होत्याच पण त्याखेरीज त्याच्या शकडो बायका असल्याचा पुरावा रामायणांतच दृष्टीस पडतो. रामानें हा आपल्या पूर्वजांचा कित्ता न गिरवितां एकपत्नीव्रताचा नवा कित्ता जनतेसमोर ठेवला. रावणानें बायको पळविल्यावर तिचा पत्ता लागत नाहीं, असें वाटूं लागलें असतां त्यानें दुसरी बायको मिळविण्याचें मनांत आणलें असतें तर सामान्य लोकनीतीनें त्याचा निषेध केला नसता. परंतु रामानें तसला विचार आपल्या मनाला शिवूं न देतां सीताप्राप्तीचा पिच्छा पुरविला. सीतेसाठीं रावणाशीं लढण्याचा प्रसंग स्वतःवर ओढवून घेतला, हे रामचरित्राचे तपशील मननीय आहेत. स्वतः संबंधांतल्या एकपत्नी-व्रताचा आग्रह लक्ष्मणासंबंधांत धरला नाहीं, असें एक उदाहरण रामायणांत आहे. सुंदर रूपानें रामाला भुलविण्यासाठीं आलेल्या शूर्पणखेला त्यानें लक्ष्मणाची बायको होण्याबद्दल सुचविलें. लक्ष्मण हा रामाच्याच पावलावर पाऊल टाकीत चालणारा निग्रही भाऊ असल्यामुळें त्यानें तिला पुनः रामाकडे जायला सांगितलें. ती त्याप्रमाणें गेली पण तिच्या उतावळ्या आततायी वर्तनानें तिला नाक कान छाटले जाण्याचें प्रायश्चित्त भोगण्याची पाळी आली. हा प्रसंग विनोदाचा आहे, असें ठरवून उपेक्षा करण्यासारखा नाहीं. असल्या अच्कळ विनोदाला रामाच्या गंभीर चरित्रांत स्थान नाहीं. रामाचें एकपत्नीव्रत हें इतरांच्या बहुपत्नीकत्वाला आड येणारें नव्हतें, कारण तो काल बहुभार्या प्रतिबंधाचा नव्हता. मात्र रामाच्या एकपत्नीव्रतानें बहुपत्नी-

कत्वाच्या प्रघाताला धक्का दिला व एकपत्नीव्रताच्या माहात्म्याचें मोल रामानें पराकाष्ठेस नेऊन पोंचविलें, यांत संशय नाहीं.

## रामराज्याचा आदर्श

रामाच्या चारित्र्यांतील लोकोक्तिरूपानें चिरस्थायी झालेल्या तीन अंगाचें येथवर थोडेसें दिग्दर्शन केलें. 'रामराज्य' ही अशीच अत्यंत परिचित लोकोक्ति [म्हण] आहे. ज्यांत दुष्काळ नाहीं, रोग नाहीं, दारिद्र्य नाहीं (पर्यायानें बेकारी नाहीं) चोऱ्या, दरवड्या-सारखे गुन्हे नाहींत, खून, जाळपोळ यासारखे घातपात नाहींत, अपमृत्यु नाहींत, समाजाचे सारे घटक आपापल्या व्यवसायाच्या सीमेंत राहून उत्कर्ष पावतात. इत्यादि स्थितीला 'रामराज्य' ही संज्ञा मिळाली. (रामाच्या काळीं चातुर्वर्ण्याची सामाजिक विषमता होती; पण एकमेकांच्या पाडावाची स्पर्धा नव्हती; किंबहुना स्पर्धेला शिक्षा होती. काळाचा महिमा लक्षांत घेऊन सामाजिक विषमतेबद्दल रामाला दोष लावणें उचित नाहीं) म. गांधीजी हे रामाचे भक्त होते; तसेच रामराज्याची आपल्या राजकीय ध्येयवादांत वारंवार वाच्यता करणारे होते, हे सर्वांना माहीत आहे. रामानें आपल्या शासनकाळांत अशी सुखसमृद्धि प्रजेला प्राप्त करून दिली कीं त्याचें राज्य, हें आज हजारों वर्षें आदर्श होऊन राहिलें आहे.

## कडक शिस्तपालन

राम हा बंधुप्रीतीचा, पितृभक्तीचा, अव्यभिचारी मैत्रीचा, उदार शत्रुत्वाचा, गुणग्राही स्वामीचा, कडक शिस्तीचा, याप्रमाणें मानवी श्रेष्ठतेच्या कितीतरी घटकांचा मूर्तिमंत पुतळा होता. यासाठींच त्याला भारतीय संस्कृतीचा सर्वोच्च बिंदु असें प्रारंभीं म्हटलें आहे. त्याचें बंधूवरील प्रेम, पित्यासंबंधीं आदर, मित्रासाठीं साहसें करण्याची सज्जता, शत्रूबद्दल उदारवृत्ति, मारुतीविषयींची निष्ठा, या गुणांची यथार्थता देऊन पटविण्याची आवश्यकता नाहीं. कडक शिस्तीचीं दोन उदाहरणें सांगितल्यास तें अप्रस्तुत होणार नाहीं. लहानपणी विश्वामित्राच्या यज्ञरक्षणार्थ गेला तेव्हां रामानें सेवक या नात्यानें स्वतः शिस्त पाळली. आयुष्याच्या अखेरीस त्याला काळपुरुष भेटण्याकरितां आला असतां लक्ष्मणाला द्वारपाळ म्हणून नेमले होतें. आंतली भेट संपेपर्यंत कुणालाहि आंत सोडायचें नाहीं अशी रामानें लक्ष्मणाला सक्त ताकीद देऊन ठेवली होती. पण योग असा कीं शीघ्रकोपी दुर्वास दाराशीं येऊन उभा ठाकला. त्याला लक्ष्मणानें आंत सोडलें. या अपराधाबद्दल लक्ष्मणाला देहत्यागाची शिक्षा भोगावी लागली. एरवीं लक्ष्मणावर रामाचें प्राणाहून अधिक प्रेम होतें, पण ताकीद मोडतांच रामानें त्या प्रेमाला तिलांजलि दिली.

## रामाची खरी भक्ति

रामचरित्रांतील असे विलक्षण थोरवीचे दाखले नमूद करूं लागल्यास पुष्कळच विस्तार होईल. येथें जें रामचरित्राचें त्रोटक दिग्दर्शन केलें आहे, तेवढें आजच्या काळांत रामाची भक्ति कोणत्या गुणाच्या अंगीकारानें साजरी करतां येईल.

याचें ज्ञान होण्याला हरकत नाहीं. रामजन्माचा सोहळा देशभर विविधप्रकारांनीं शेंकडों वर्षें साजरा केला जातो, पण रामाचा अभिमान व आदर बाळगणारांवर जी जबाबदारी आहे तिचा विचार होत नाहीं. रामासारख्या अद्वितीय लोकोत्तर पुरुषाच्या गुणांचें व कर्तृत्वाचें अनुकरण हाच त्याचा खरा आदर समजायला पाहिजे. आज प्रत्यक्ष रावण अस्तित्वांत नसला तरी रावण ज्या व्यक्तिगत व राजकीय दुराचारासाठीं कुप्रसिद्ध होता, ते दुराचार भारताच्या लोकव्यवहारांत निर्लज्जपणें उघड रीत्या वावरत आहेत. त्या दुराचाराचीं फळेंहि जनतेला भोगावीं लागत आहेत. त्यांचा प्रतिकार मात्र रामबाणासारख्या अमोघ उपायांनीं होत नाहीं. त्या दुराचारांचें निर्मूलन करण्याला दृढनिश्चयानें प्रवृत्त होणें, हीच रामाची खरी भक्ति ठरते. रामनामाच्या जपानें किंवा वर्षांतून एकदां रामाची कीर्ति गाइल्यानें रामावताराचें सार्थक झालें, असें समाधान घातक आहे.


---

एका वयोवृद्ध व सुसंपन्न गृहस्थास एक तरुण विचारूं लागला कीं, आपण जीवनांत एवढें यश मिळविलें तें कशाच्या बळावर ? श्रद्धा आणि सबुरी ! (बाबांनीं दिलेला महामंत्र) तो वृद्ध गृहस्थ म्हणाला; “ या दोन गुणांच्या बळावर जगांतील कठिणांत कठीण कार्य सफल करून दाखवितां येतें ! ”

त्या तरुणानें स्मित हास्य केलें व म्हणाला, ‘ होय, पण चाळणींत पाणी भरण्याचें कार्य पार पाडायचें असल्यास तुमच्या त्या गुणांचा काय उपयोग ?

“ कां नाहीं ? त्या पाण्याचा थिजून बर्फ होईपर्यंत वाट पहात राहिलें पाहिजे. त्यासाठीं जबरदस्त श्रद्धा व सबुरी बाळगणें केव्हांही जरूर आहे ! ”

---

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :–DIVYANETRA
शिसा ऑप्टिशिअन्स (BOM.–DADAR)

( चष्म्यांचे व्यापारी )
यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.
छबीलदास रोड, दादर ( W. R.), मुंबई २८.

# श्रीरामचंद्राचें अलौकिक व्यक्तिमत्व

लेखक—डॉ. कृ. र. पोतदार, एम्. ए. डी. लिट्.

वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।
लोकोत्तराणां चेतांसि को नु विज्ञातुमर्हति ॥
(भवभूति—उ. रा. च. अंक १)

श्रीरामचंद्राच्या व्यक्तित्वाचें यथार्थ आकलन झालेल्या महाकवीनें त्याच्या चरित्राबद्दल मोठें मार्मिक वर्णन उपरिनिर्दिष्ट श्लोकांत केलें आहे. श्रीरामचंद्राचें अलौकिकत्व ज्या एका प्रसंगानें स्पष्टपणें निदर्शनाला येतें, अशा एका प्रसंगावर भवभूतीनें आपल्या नाटकाची रचना केली आहे. त्या प्रसंगाच्या सारसरूप वर्णनांत पहिल्या अंकामध्यें कवीनें हा श्लोक घातला आहे. श्रीरामचंद्राचें सम्यक् आकलन सामान्य बुद्धीनें होऊं शकणार नाहीं, असें वर्णन करतांना कवीनें आपली विनयवृत्ति दाखविली आहे किंवा असेंहि म्हणतां येईल कीं जें सामान्य बुद्धीला सहज समजूं शकणार नाहीं अशा अलौकिकत्वाची प्रतीति माझ्या बुद्धीला झाली आहे असा आत्मविश्वासपूर्ण निर्देश कवीनें या श्लोकांत केला असावा. ज्या भवभूतीनें स्वतःचें वर्णन 'यं ब्रह्माणं इयं देवी वाग्वश्येवानुवर्तते' असें केलें आहे, त्या भवभूतीकडून अशा आत्मविश्वासाची अपेक्षा सहज संभवते. महाकवीचा हा आत्मविश्वास त्यानें वर्णन केलेल्या चरित्रांत संपूर्णतया सार्थ असल्याचा आपणास प्रत्यय येतो.

कवीनें वर्णन केलेला हा प्रसंग म्हणजे सीतात्यागाचा होय. रामचंद्रानें सीतेचा त्याग केला, या घटनेवर औचित्याच्या दृष्टीनें एकमत होणें कठीणच आहे. सीतेसारख्या प्रातःस्मरणीय साध्वी पत्नीचा केवळ लोकवादाकरतां त्याग करणें लौकिक कल्पनेला उचित वाटण्याचा सहाजिकच सुतराम् संभव नाहीं. प्रेमभावना, सहृदयता किंवा केवळ भूतदया या सर्व दृष्टींनीं विसंगत वाटणारी ही रामचंद्राची कृति समर्थनीय कशी ठरावी असा सहज प्रश्न उद्भवतो. पण कवीनें विविध प्रसंगांच्या निर्मितीनें आपलें उद्दिष्ट मोठ्या यशस्वीतेनें साध्य केलें आहे. कारण रामचंद्राच्या कृतीचें समर्थन म्हणजे एका अयोग्य गोष्टीचें समर्थन असा सकृद्दर्शनीं समज होण्याचा संभव व म्हणूनच असेंही म्हणतां येईल कीं, रामचंद्राच्या चरित्रांतील या अलौकिकतेचा प्रत्यय एका अलौकिक महाकवीच्या प्रतिभेला होऊं शकला.

रामाच्या स्वभावाचें अत्यंत थोडक्यांत, अत्यंत सूक्ष्म असें वर्णन वज्राहून कठोर पण फुलापेक्षां मऊ, अशा विरोधाभासानें अत्यंत मार्मिकपणानें प्रथमच कवीनें करून

# प्रभु रामचन्द्राचा जयजयकार

लेखक : पु. बा. कुलकर्णी

श्रीसाईबाबांनीं प्रभु रामचंद्राच्या जयंत्युत्साची प्रेरणा का दिली ? हा महोत्सव सुरू करविण्यांत जनतेबद्दल व आपल्या भक्तांबद्दल त्यांच्या कोणत्या अपेक्षा होत्या ?

श्रीरामचंद्र हे एक आदर्श अवतारी व सर्वगुणसंपन्न महापुरुष होऊन गेले. मानवी जीवन कसें असावें, आदर्श राजा, आदर्श पुत्र, आदर्श मित्र, आदर्श पती व सर्वगुणसंपन्न पुरुष कसा असावा, त्याची कल्पना श्री रामचंद्राच्या जीवनक्रमावरून समजून येते. गेल्या हजारो वर्षांपासून भारतीयांपुढें श्रीरामचंद्रांचा उच्च आदर्श आहे. भारतीयांचें जीवन रामनामानें भारलें गेलें आहे व ओतप्रोत भरून गेलेलें आहे.

'आई' हे दोनच शब्द; परंतु किती गहन अर्थ भरलेला आहे त्या शब्दांत ! त्याचप्रमाणें 'राम' या शब्दाचा उच्चार करतांच किती पुण्यपावन स्मृतींनीं आपलें मन भारावून जातें ! राम म्हटल्याबरोबर किती आराम वाटतो मनाला ! रामनामाची किमया शब्दांनीं प्रगट करतां येण्यासारखी नाहीं.

## श्री साईबाबांची दृष्टि

आणि म्हणूनच श्रीसाईबाबांच्या प्रेरणेनें शिरडी येथें जे उत्सव होतात त्यांत श्रीराम जयंतीनिमित्त होणाऱ्या उत्सवाला विशेष महत्व आहे. रामनामाचें व रामजन्माचें महत्त्व सर्वांनीं ओळखावें, श्रीरामचंद्राचा उच्च आदर्श स्वतःपुढें ठेऊन जन्मा आलियाचें सार्थक करावें, त्यांचें गुण व आचरण यांचें अनुकरण करून पुरुषार्थी बनावें, हाच त्या उत्सवामागें श्रीसाईबाबांचा हेतु होता व तो आपण ओळखला पाहिजे.

श्रीराम म्हणजे पराक्रम, पुरुषार्थ व पावित्र्य. बालपणापासून तों आयुष्याच्या अखेरीपर्यंत श्रीरामचंद्राच्या जीवनांत तुम्हांला कुठेंही डाग दिसणार नाहीं. त्यांच्यावर थोड्या थोडक्या का आपत्त्या आल्या ! परंतु त्या त्यांनीं धीरोदात्तपणें सोसल्या व हंसतमुखानें ते त्यांतून पार पडले.

मनुष्य जीवनांत कसोटीचे प्रसंग, मग ते लहान असोत किंवा मोठे असोत; वारंवार येतात. त्या प्रसंगांतून यशस्वी रीतीनें व उजळ माथ्यानें पार पडण्यांत पुरुषार्थ आहे, तो श्रीरामचंद्रानीं गाजवून दाखविला आहे.

श्रीसाईबाबांनीं श्रीरामप्रभूच्या जयंतीला महत्त्व कां दिलें, याचें हेंच रहस्य आहे. आजवर अगणित लोकांचा उद्धार श्रीरामनामानें केलेला आहे. अगणित लोकांच्या जीवनांत रामनामानें क्रांति घडवून आणिली आहे. अगणित लोकांचें जीवन रामनामानें उजाळून सोडलें आहे.

### श्री रामचन्द्रांचा उच्च आदर्श

वाल्मिकी ऋषींनीं अशा त्या पुण्य पुरुषाचें चरित्र रामायण काव्याच्या रूपानें रचून व भारताला देऊन भारतवासीयांस उद्धाराचा मार्ग दाखवून दिलेला आहे. त्या तोडीचें काव्य जगाच्या कोणत्याहि भागांत आजवर जन्माला आलेलें नाहीं, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होत आहे असें आम्हांला वाटत नाहीं. शिरडी येथील उत्सव समारंभांत श्रीरामजन्माची जोड करून देण्यांत श्रीसाईबाबांची हीच इच्छा होती कीं, श्रीरामचंद्रांचा सर्वोत्तम व उच्च आदर्श आपल्यापुढें ठेऊन सर्वांनीं आपलें कल्याण करून घ्यावें.

आतां या ओघांत श्रीरामचंद्राच्या चरित्रापासून आपण कोणता बोध घ्यावा, असें त्या जीवनांत काय आहे, याकडे थोडेसें लक्ष पुरविणें जरूर आहे.

मनुष्याचें जीवन ही साधीसुधी गोष्ट नाहीं. जन्माला यावें आणि तें जीवन कसें तरी घालवून निघून जावें, असा नाहीं या जीवनाचा अर्थ—हें जीवन म्हणजे एक कठोर व्रत आहे; ती एक थोर व कठोर तपस्या आहे. हें व्रत अखेरीपर्यंत पालन करण्यांत मातब्बरी व जीवनसाफल्य आहे. आपल्या मनांत किती आशा—आकांक्षा वेळोवेळीं उत्पन्न होत असतात! त्या किती गोड असतात! परंतु कित्येक वेळां त्या मनांतल्या मनांत दाबून ठेवाव्या लागतात. अमक्या तमक्या संबंधीं आपणास कर्तव्यपालन करायचें आहे म्हणून त्या आशा आकांक्षांचा होम करावा लागत असतो. सुखावर लाथ मारून हाल अपेष्टांचा, दुःखतापांचा दुर्धर मार्ग स्वीकारावा लागत असतो. जीं आपणास जिवलग वाटतात त्यांनाही कर्तव्यपालनासाठीं होमकुंडांत लोटावें लागत असतें! श्रीरामचरित्राचें हेंच तर रहस्य आहे.

राम श्रेष्ठ कां? कारण त्यांनी तत्वासाठीं, कर्तव्यपालनासाठीं स्वतःच्या सुखावर लाथ मारिली. प्राणाहून प्रिय अशा सीतादेवीलाही दूर लोटायला, नव्हे तिचें बलिदान स्वीकारायला कमी केलें नाहीं. मनुष्याला वेळ प्रसंगीं किती कर्तव्य कठोर व्हावें लागतें, त्याचा हा उच्चतम आदर्श आहे.

### श्री रामचंद्राचें श्रेष्ठत्व

श्रीरामचंद्राची पितृभक्ति, मातृभक्ति, पत्नीप्रेम, बंधुप्रेम, मित्रप्रेम, प्रजाप्रेम, यांपैकीं कोणत्याही क्षेत्राकडे पहा. प्रत्येक क्षेत्रांत आपणास मार्गदर्शन, उच्चतम आदर्श व ओजस्वी प्रकाश दिसून येईल. श्रीरामचंद्रानीं प्रत्येक क्षेत्रांत उच्चांक गांठलेला आहे.

जीवन म्हणजे गम्मतजम्मत करण्याचें व सुखोपभोग साधण्याचें एक साधन आहे असें श्रीरामचंद्रांनीं कधीं मानलें नाहीं. एखाद्या व्रतधारी माणसाप्रमाणें वागून आयुष्यांत सुखदुःखाचे जे जे प्रसंग आले ते ते त्यानीं शोभवून दाखविले. ते कुठेंहि उणे पडले नाहींत. तोकडे वाटले नाहींत. जेथें जावें तेथें भव्यता, धीरोदात्तता, उज्ज्वलता!

केवढी न्यायप्रियता! तिच्यापुढें बंधुप्रेम किंवा पत्नीप्रेम केव्हांहि आड येऊं शकलें नाहीं. न्याय म्हणजे न्याय, प्रेमानें त्यांचें अंतःकरण ओथंबलें होतें. परंतु तेथें वेडगळ-

पणाला किंवा भोळसटपणाला वाव नव्हता. प्रेमापेक्षां कर्तव्य श्रेष्ठ आहे आणि म्हणून त्यानीं कर्तव्यपालनांतच जीवनसाफल्य मानिलें.

**राज्यकर्ता कसा असावा**

आदर्श राजा कसा असावा, यासंबंधींची जाणीव श्रीरामचरित्रावरून सहज होऊं शकते. राजा म्हणजे सुखोपभोगाचा व चैनीचा धनी अशी आपली कल्पना झालेली आहे. कारण आतां राजेलोकांचें राजेपण स्वातंत्र्याच्या काळांत नामशेष झालेलें असलें तरी निरनिराळ्या संस्थानिकांनीं जें राजेपण गाजविलें व स्वतःच्या चैनीसाठीं जें प्रजेचें रक्तशोषण केलें त्याच्या स्मृति अद्याप नष्ट झालेल्या नाहींत.

आदर्श राज्य म्हणजे 'रामराज्य' असें महात्मा गांधी म्हणत असत. व या भारतांत हजारो वर्षांपूर्वीं प्रभु रामचंद्राच्या कारकिर्दींत जें 'रामराज्य' नांदत होतें त्याची गोडी जनतेला पुनरपि चाखायला मिळावी, हीच त्यांची आकांक्षा होती.

मग प्रभु रामचंद्रांनीं असें काय केलें? राजा कसा असावा हें त्यांनीं आपल्या वागणुकीनें दाखवून दिलें. प्रजा ही आपल्या सुखोपभोगाचें साधन नाहीं. त्यांच्या जिवावर आपण चैन भोगावयाची नसून, त्यांच्या सुखासाठीं आपण आहोंत व जें जें प्रजेच्या सुखाचें तें तें करावयाचें हा रामचंद्रांचा बाणा होता. प्रजेला सुखी करण्यासाठीं माझा जन्म आहे; मग त्यासाठीं मला माझ्या कुटुंबियांना कितीहि दुःखताप भोगावा लागला तरी हरकत नाहीं. मी माझी संपत्ति व माझ्याजवळ जें जें कांहीं आहे त्याचा सदुपयोग प्रजेसाठींच झाला पाहिजे; प्रजेची पिळवणूक करणें हा माझा धर्म नसून तिला सुखी, समाधानी व आनंदी करणें हा माझा धर्म आहे, असें त्यांनीं मानिलें आणि म्हणून 'रामराज्य' हा शब्दप्रयोग अजरामर होऊन राहिला आहे.

आपल्या सुखासाठीं त्यांनीं प्रजेला राबविलें नाहीं, तर प्रजेच्या सुखासाठीं स्वतः राबण्यांत, तिची अनन्यभावें सेवा करण्यांत, त्यानीं आनंद मानिला. राजाच्या मस्तकावर मुकुट असतो व तो सुंदर सिंहासनावर बसतो म्हणून तो प्रजेला प्रिय होऊन रहात नाहीं तर प्रजेला न्याय देणारा, प्रजेच्या सर्वांगीण उद्धारासाठीं झटणारा, प्रजेचें दुःख तें स्वतःचेंच दुःख मानणारा, असा राजाच जनतेला आपलासा वाटतो व त्याच्याबद्दल जनतेला पूज्यभाव वाटूं लागतो.

श्रीरामचंद्रानीं चालविलेलें राज्य हें अशा प्रकारचें व अशा धोरणाचें होतें व म्हणून त्याची कल्पना येण्यासाठीं महात्मा गांधीनीं **'रामराज्य'** हा शब्दप्रयोग रूढ केला. परंतु आज-रामराज्य हें केवळ कल्पनेंत तरंगत राहिलें आहे. तें आचरणांत अजूनपर्यंत आलेलें नाहीं. तें आचरणांत येईल तेव्हां, 'आलें रामराज्य। आनंद झाला सकलिकां' असें म्हणून सर्व लोक राज्यकर्त्यांचा जयजयकार करूं लागतील!

तें आचरणांत यावें, जनतेला रामराज्याची गोडी चाखायला मिळावी, जनतेचें जीवन अंतर्बाह्य पवित्र व पुण्यपावन व्हावें; हेंच उद्दिष्ट श्रीसाईबाबांना साधायचें होतें व म्हणून तर मधूर व सुरम्य स्मृतींनीं भरगच्च भरलेला व सर्वांपुढें उच्च आदर्श ठेऊन उद्धाराचा मार्ग दाखविणारा पुण्यश्लोक श्रीरामचंद्रप्रभूचा जयंत्युत्सव!

———

# राम – रहीम एकच

( राग : ललत  ताल : त्रिताल  चाल : साई होउं दे अपुलि चाकरी )

वंदु वंदु या रामश्यामला ।
सांइ रूप जो घेई शिरडीला ॥ ध्रु० ॥

राम उत्सवा सुरू करी जो ।
नाश मी पणा तनु सदा झिजो ।
सत्य नम्रता गुरूसेवेला ।
तन मन धन हें अर्पु पदाला ॥ १ ॥

बापु गिरांजनी सुत बनवूनी ।
आरति उद्यौषधि धाडूनी ।
मैनारूपीं लक्ष्मणाला ।
सांइरूपि या दाशरथीला ॥ २ ॥

डॉक्टर एका रामसेवका ।
शिरडी नेती नमन करूं नका ।
सर्वां आधीं करि नमनाला ।
करी उलगडा मूढ मनाला ॥ ३ ॥

देखुनि प्रभु सांईच्या वदना ।
दर्शन झालें सीतारमणा ।
पुन्हां पेकुनि सांइरवाला ।
कृपा छत्र तव असो शिराला ॥ ४ ॥

निद्रेमाजीं स्वप्न दावुनी ।
संतसुरांचें पेक्य पटवुनी ।
धर्मैक्याच्या कृती ठेवुनी ।
जागें करिसी तूं मनुजाला ॥ ५ ॥

दामोदर सुत मधु कीर्तनी ।
रामतुकांच्या मधुर गायनीं ।
छगन पेटिची साथ करूनी ।
शोभा किति या उत्सवाला ॥ ६ ॥

राम रहिम श्रीकृष्ण त्रिमूर्ती ।
संतरूपानें भुवि अवतरती ।
नलिनी तत्पति सुत भगिनी सह ।
लोळण घेइ तव चरणाला ॥ ७ ॥

— बाबांच्या बाळांचें बाळ

# 'माझी स्फूर्तिदेवता रामायण'

—नें. ना. श्रीनिवास शास्त्री

## शास्त्रीजींचा अल्प परिचय

ने. ना. श्रीनिवास शास्त्री हे एक देशप्रेमी, धर्मनिष्ठ व विद्वान राजकारणी पुरुष होऊन गेले. ना. गो. कृ. गोखले यांना ते आपले गुरुजी मानीत असत. त्यांच्या मागें त्यांनीं स्थापन केलेल्या भारत सेवक समाजाचें नेतृत्व ना. शास्त्री यांच्याकडे आलें होतें. त्यांची विद्वत्ता लक्षांत घेऊन सरकारनें मोठमोठ्या जबाबदारीच्या जागीं त्यांची योजना केली होती. वाल्मिकी रामायण हा त्यांचा अत्यंत आवडता ग्रंथ. श्रीरामचंद्राला ते आदर्श महापुरुष मानीत असत. त्या ग्रंथाचा त्यांचा व्यासंग फार दांडगा होता. मद्रासमध्यें त्यांनीं रामायणावर एक व्याख्यानमाला गुंफिली होती. रामायणांत ज्या महान् तत्त्वांचा आविष्कार झालेला आहे, त्यांचा भारतवासीयांनीं करावा तसा विचार केला नाहीं, असें त्यांना वाटत असे. ना. श्रीनिवास शास्त्री १९४७ सालीं निधन पावले. निधनापूर्वी १–२ आठवडे महात्मा गांधीजींनीं इस्पितळांत आजारी स्थितींत त्यांची भेट घेतली असतां रामायणासंबंधीं व श्रीरामचंद्रासंबंधीं त्यांचा झालेला संवाद आमच्या वाचकांच्या माहितीसाठीं येथें देण्यांत येत आहे. सुमारें दीड वर्षापूर्वी प्रस्तुत लेखकाचें ऑल इंडिया रेडिओच्या मुंबई केंद्रावरून शास्त्रीजीसंबंधीं भाषण झालें त्यावेळीं या प्रसंगाचा उल्लेख करण्यांत आला होता. श्रीनिवासशास्त्री यांचे अनुयायी कोदंडराव यांनीं महत् प्रयासानें लिहिलेलें त्यांचें चरित्र सध्या प्रसिद्धीच्या मार्गावर आहे.

## अखेरची भेट

दोन पुढाऱ्यांची ही ऐतिहासिक भेट मद्रास येथील जनरल हॉस्पिटलमध्यें झाली. श्रीनिवासशास्त्री यांच्या बाजूस त्यांचीं नातवंडें खेळत होतीं. महात्माजींबरोबर श्री. राजगोपालाचारी, श्री. ठक्करबाप्पा वगैरे मंडळी होती.

प्रकृतीसंबंधीं विचारपूस झाल्यानंतर हलक्या आवाजांत ना. श्रीनिवासशास्त्री महात्माजींना म्हणाले, 'किती तरी बाबतींत तुमचा मी ऋणी आहें. अनेक वेळां तुमच्यामुळें मी सावरला गेलों आहें!'

'कांहीं तरी काय बोलतां?', महात्माजी म्हणाले.

'गांधीजी! आजच्या काळांतील थोर पुरुषांत तुमची गणना केली जाते व आजच्या जगांत तुमच्या तोडीची थोर व्यक्ति दुसरी नाहीं हें मी जाणत का नाहीं?' असें बोलतां बोलतां आपल्या नातवंडांस हांक मारून त्यांनीं त्यांच्या नांवाचा परिचय करून दिला व म्हणाले, 'गांधीजी! तुमचे कृपाकटाक्ष त्यांच्याकडे वळू द्या.'

## रामायणाचें पाठांतर

मा. श्रीनिवासशास्त्री यांचें रामायणाचें पाठांतर दांडगें होतें. वरील संदर्भांत अयोध्याकांडमधील एक श्लोक त्यांनीं म्हटला :—

यश्च रामं न पश्येत्तु यं च रामो न पश्यति ।
निन्दितः स भवेल्लोके स्वात्माप्येनं विगर्हते ॥

'जो श्रीरामचंद्राकडे पहात नाहीं व ज्याच्याकडे रामचंद्र पहात नाहीं, त्याची सर्वत्र निर्भर्त्सनाच व्हायची. त्याला जगांत कोणीहि विचारणार नाहीं.'

श्रीनिवासशास्त्री यांचा अंतकाळ समीप येऊं लागला होता व म्हणूनच कीं काय त्यांनीं रामनामाचा व रामायणाचा ध्यास घेतला होता. बिछान्यावर पडल्या पडल्या रामायणांतील सारे प्रसंग त्यांना आठवायचे; आणि त्याच आठवणींनीं त्यांच्यावर मोहनी घातली होती. ध्यानीं मनीं रामायण ! झोपेच्या गुंगींत ते रामायणांतलि श्लोक म्हणायँचे !

महात्माजीस उद्देशून ते म्हणाले, 'हें पहा ! काल दुपारची गोष्ट. भोजन झाल्यानंतर मला डुलकी आली; व त्या स्थितीत एकाएकीं मला रामायणांतील एक उदात्त श्लोक आठवला आणि त्यावर मला सुचलेले विचार कांहीं वेळपर्यंत मी मनांतल्या मनांत घोळवीत होतों. तो प्रसंग असा होता—रावण वधानंतर हनुमान अशोकवनांत सीतेला भेटण्यासाठीं जातो व हात जोडून विनवणी करतों कीं, 'माते ! ज्यांनीं या वनांत तुला छळलें, त्रास दिला त्या राक्षसांना मी कडक शासन करणार आहें. तुझा शब्द मला हवा आहे. तुझ्या एका शब्दाबरोबर मी त्यांचा फन्ना उडवितों !'

## सीतामाईची क्षमाशीलता

सीतादेवी प्रेमभावानें हनुमाजीकडे वळून काय म्हणाली ?

समयो रक्षितव्यस्तु सन्तश्चारित्र भूषणा :
पापानां वा शुभानां वा वधार्हाणामथापि वा
कार्यं कारुण्यमार्गेण न कश्चिन्नापराध्यति ॥

'नाहीं ! नाहीं ! ! त्या बिचाऱ्यांचा काय बरं दोष ? ते बोलून चालून धन्याचे गुलाम ! सांगकामे ! पोटाची खळगी भरण्यासाठी धनी सांगेल तें करणारे ! नको रे बाबा त्यांच्या वाट्यास जाऊं ! क्षमाशीलता हा एक मौल्यवान् अलंकार आहे. जीवनाला खरीखुरी शोभा देणारा व जीवन जगावें असें वाटायला लावणारा तो दैवी सद्गुण आहे. तेव्हां त्यानां आपण क्षमा करूं या. चुका कोणाकडून घडत नाहींत ? आणि क्षमेची जरुरी कोणाला नसते ? तेव्हां आपण त्याच गुणाची कांस धरूं या.''

त्या श्लोकामुळें सुचलेले विचार प्रदर्शित करून ना. शास्त्री पुढें म्हणाले, 'घरीं जातांच मी जगदीशला (सेक्रेटरीस) यावर एक लेख लिहून घ्यायला सांगणार आहें व तो आपल्याकडे पाठविणार आहें. प्यारेलालजीकडून आपण तो वाचवून घ्याल ना?'

'प्यारेलालजी कशाला? आपला लेख मीच वाचीन. पाठवा हं मात्र!'

आधींच शास्त्रीजींचें मन रामायणानें भारून गेलेलें आणि त्या विचारांत असतां म. गांधीजींची झालेली भेट! मग काय विचारतां? आपल्या त्या अखेरच्या बोलण्यांत शास्त्रीजी सांगत होते कीं, 'रामायणाची तुलना जगांतील कोणत्याहि ग्रंथाशीं करतां येणार नाहीं, इतका तो अद्वितीय ग्रंथ आहे. मला एका गोष्टीचा भारी खेद होतो! रामायणाचें आमच्या लोकांकडून जसें वाचन झालें पाहिजे तसें होत नाहीं. अलिकडे तर रामायणाचा व त्यांतील उच्च आदर्शांच्या कोणीहि विचार करीत नाहीं! मला भारी दुःख होतें या गोष्टीचें!'

## सीतामाईचें प्रखर तेज

ना. शास्त्री थोडा वेळ थांबले, थोडा वेळ विसावा घेतला व म्हणाले, 'सीतेच्या-ठायीं पावित्र्याचें प्रखर तेज झळकत होतें. कोणाची छाती होती तिच्यासमोर उभें रहाण्याची? दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाची तर नाहींच नाहीं. रावण आपला दुष्ट हेतु उघड करण्यासाठीं सीतेपुढें हजर झाला; परंतु त्या तेजापुढें तो दिपून गेला! त्याच्या मुखावाटे एकहि शब्द बाहेर पडला नाहीं व तो आला तसाच परत मागें फिरला! सभोंवारच्या राक्षसींना तो प्रसंग मोठा विचित्र वाटला. पुढें वाढून आलेलें पक्वान्नाचें ताट सीतेनें दूर लोटण्यांत वेडेपण केला असें त्यांना वाटूं लागलें, त्या सीतेजवळ येऊन बडबडूं लागल्या कीं, 'बाई! जग कसें चाललें आहे व जगांत कसें वागावें लागतें, याची तुला कांहींच कल्पना नाहीं. ती असती तर सोन्यासारखी चालून आलेली संधी तूं वायां दवडली नसतीस.'

यावर सीतामाई काय म्हणाल्या? त्या म्हणाल्या, 'बायांनो! तुमची ही लंकानगरी अप्रतीम आहे. येथील हवेल्या फार सुंदर आहेत. आणि ही नगरी एकंदरींत सुधारलेली आहे असें दिसतें; परंतु या सुंदर नगरींत अन्यायाची चीड येणारे व रावणाला महापापा-पासून परावृत्त करून सत्याची समज देणारे १।२ सुद्धां पुरुष नसावेत ही किती खेदाची गोष्ट आहे!'

या प्रसंगाची आठवण होऊन शास्त्रीजी सद्गदित झाले. त्यांचा आवाज कंपायमान झाला, आणि तरीहि म्हणाले, 'मित्राचें हेंच तर खरें कर्तव्य आहे व तें पार पाडण्यासाठीं झटेल तोच खरा मित्र; परंतु हें मित्रकर्तव्य पार पाडण्याचें आमचें कर्तव्य आम्हीं पार पाडीत नाहीं. तुमच्या बाबतींत मी तें १–२ वेळां बजावलें आहे व तुम्ही अगदीं जाहीर रीतीनें माझ्या बाबतींत आपलें कर्तव्य अनेक वेळां बजावलें आहे.'

### रामायण माझी स्फूर्तिदेवता

पुन्हां शास्त्रीजी क्षणभर थांबले व महात्माजींकडे वळून म्हणाले, आपण सदैव सत्याचा पाठपुरावा करणारे व सत्य तेंच सांगणारे आहांत. अनेक बाबतींत तुमचें व माझें जमलेलें नाहीं. दोघे दोन टोकांना. तुमच्या मतांशीं मी अनेक वार सहमत होऊं शकलों नाहीं व तुम्हींहि माझ्या मतांशीं सहमत होऊं शकलां नाहीं. परंतु आपआपल्या परीनें आपण दोघेंहि सत्याचा पाठपुरावा करणारे आहोंत. आपापल्या मतीप्रमाणें व मिळालेल्या प्रकाशाप्रमाणें जें कल्याणप्रद वाटलें तें तें सांगत आलों. वाल्मिकींनीं रामायणाच्याद्वारें शाश्वत सत्याचे धडे जगाला दिले आहेत. रामायण ही माझी स्फूर्ति देवता आहे. माझें जीवन रामायणानें घडविलें आहे! त्या महाकाव्यांत माझ्या हाताला किती तरी बहुमोल विचार रत्नें लागलीं; परंतु माझ्या देशबांधवांना त्या दैदिप्यमान् रत्नांचा प्रकाश मी दाखवूं शकलों नाहीं, याचें मला राहून राहून दुःख होत आहे! भगवंतानें आणखी कांहीं काळ या जगांत मला ठेविलें तर जगदीशन्च्या सहाय्यानें ती उणीव—मनाला लागून राहिलेली ती टोचणी, दूर करण्याचा प्रयत्न मी करणार आहें!'

'ती इच्छा पूर्ण करण्यासाठीं ईश्वरानें तुम्हांला दीर्घायुष्य द्यावें, अशी सदिच्छा प्रगट करून म. गांधीनीं ना. शास्त्री यांचा मोठया कष्टानें निरोप घेतला.

संकलन—पु. बा. कुळकर्णी

---


लहान मुलाच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

: स्टॉकिस्ट :
कांचनलाल वाडीलाल कं.
दवाबझार, मुंबई २

अर्नाळकर ब्रदर्स

चष्म्यांचे व्यापारी

आमच्या येथें डोळ्यांची मोफत तपासणी करून शास्त्रोक चष्मे वेळेवर तयार करून देण्यांत येतील. सर्व प्रकारच्या फ्रेम्स् व कांचा मिळतील. एकदां आमच्या दुकानीं आल्यानंतर तुम्हीं आमचे कायमचे ग्राहक बनाल.

: मालक :
बाबूराव अर्नाळकर
२५५ गिरगांव रोड,
सरकारी तबेल्यासमोर, मुंबई ४

वि. सू:—श्रीसाईभक्तांसाठीं खास सवलतीचे दर

# सीतामाईच्या जीवनांतील एक उज्वल प्रसंग

श्रीरामचंद्राचें हृदय प्रेमानें ओथंबलेलें होतें; सीता त्यांना जीव कीं प्राण होती; परंतु कर्तव्यपालनाची वेळ आली तेव्हां ते आत्यंतिक कठोर बनले. प्रेमापेक्षां कर्तव्याची मातब्बरी अपरंपार आहे. हें त्यांनीं जगाला दाखवून दिलें.

सीतामाईच्या सुटकेसाठीं रामरावण युद्ध झालें. दुष्टाला शासन झालेंच पाहिजे. 'सतींना, संतांना जरि कधिं जगीं दुष्ट छळिती । तयांना रक्षाया अवनिवरि ये मी रघुपती ॥' रामाचा अवतारच त्यासाठीं होता. जेथें जेथें साधुसंतांचा व स्त्रियांचा छळ होतो, तेथें भगवंताला अवतार घेऊन यावें लागतें. रावणाची सीतेवर पापी दृष्टि होती. सज्जनांचा व साधुसंतांचा त्यानें छळ चालविला होता; साधुतुल्य बंधु बिभीषण याचाहि हितोपदेश त्याला रुचला नाहीं. शेवट काय झाला ? सर्वस्व नाश. युद्धांत रावणाचा वध झाला. लंकेचें राज्य बिभीषणाला अर्पण करण्यांत आलें.

### वनवासांतील रामविलाप

सीतेची सुटका झाल्यानंतर श्रीरामचंद्राची व तिची भेट व्हायची होती. सीतेवर त्यांचें अनन्यसाधारण प्रेम होतें. अरण्यांतून प्रवास करीत असतां सीतेसाठीं त्यांनीं केलेल्या विलापाचें वर्णन येथें करण्याची जरुरी नाहीं. परंतु जिच्यासाठीं इतका विलाप केला व जिच्या मुक्ततेसाठीं घनघोर युद्ध झालें ती सीता कोणत्या परिस्थितींत व कशा-रीतीनें रामचंद्राला भेटली त्याचें मोठें सुंदर वर्णन वाल्मिकीनें केलें आहे.

सीतेला सुंदर वस्त्रालंकार घालून आपल्या भेटीसाठीं आणण्यांत यावें अशी रामाची इच्छा; परंतु साध्या व आपण अशोक वनांत होतों त्याच वेषांत रामचंद्राला भेटावें अशी सीतेची इच्छा होती. ती तिनें बाजूला ठेविली.

### कर्तव्यकठोर रामाचे वाग्बाण

बिभीषणाचा राज्याभिषेक झालेला होता. रामाच्या इच्छेप्रमाणें सीतेला सुयोग्य वस्त्रालंकारांनीं सजवून व एका सुंदर पालखींत बसवून रामाकडे पाठविण्यांत आलें. जिकडे तिकडे सैन्याचे तळ पडलेले होते. त्या गर्दीतून वाट काढीत सीतेला रामचंद्राकडे पोहोंचविण्यांत आलें. त्यांच्यापुढें जातांना सीता कांहीं पावलें चालत गेली व मोठ्या अदबीनें हात जोडून रामचंद्रापुढें उभी राहिली.

आपणाला पाहतांच रामाला मोठा आनंद होईल, त्या आनंदभरांत तो आप-ल्याशीं प्रेमभरांत हंसेल अशी सीतेनें कल्पना केली होती. सीतेला पळवून नेल्याचें

समजतांच रामाची बेभान स्थिति झाली होती. 'सीता', 'सीता' असा आक्रोश करीत अरण्यांतील वृक्षलतांना मिठ्या मारणारा राम आतां तिच्यापुढें नव्हता. तो प्रेमानें विव्हळ झालेला राम व आतां कर्तव्यकठोर बनलेला राम यामध्यें महदंतर पडलें होतें. या रामाचा चेहरा गंभीर झालेला होता. तेथें हास्याचा किंवा प्रेमाचा मागमूसही नव्हता. अत्यंत गंभीरपणें सीतेला उद्देशून राम म्हणाला,' सीते! मी एवढें जे खटाटोप केले ते केवळ तुझ्यासाठीं नव्हत. तुला पळवून नेण्यांत आल्यामुळें माझ्या पुरुषार्थाला व माझ्या कुळाला लागलेला कलंक धुवून टाकायचा होता. तूं शुद्ध आहेस कीं नाहीं याबद्दल माझ्या मनांत संशय उत्पन्न झालेला आहे. माझा नाइलाज आहे. मी तुझा स्वीकार करूं शकत नाहीं. तुझा मार्ग मोकळा आहे. तुला जिकडे जायचें असेल तिकडे खुशाल जा.'

किती कठोर व मनाला झोंबणारे शब्द होते ते! सीतेनें वज्राघात सहन केला असता; परंतु अत्यंत प्रेमळ, कधींहि कठोर शब्द न बोलणाऱ्या रामाच्या तोंडून निघालेले ते शब्दबाण सीतेच्या मनाला किती झोंबले असतील याची कल्पना करतां येण्यासारखी आहे.

## अग्निदिव्य करण्याचा निर्धार

सीतेचा सारा देह दुःखातिशयानें थरथर कापूं लागला. आपण भूमीवर पडणार असें तिला वाटूं लागलें; परंतु तशाहि दारुण दुःखाच्या स्थितींत तिनें स्वतःला सावरून धरलें व म्हणाली, 'महाराज! मी शुद्ध आहें याचा पुरावा मी कोणत्या मार्गानें देऊं! एकच मार्ग सुचतो मला. मी अग्निदिव्य करण्याचा निर्धार करीत आहें. माझ्यासाठीं येथें अग्निकुंड पेटविण्यांत यावें. त्यांत प्रवेश केल्यानंतर मी शुद्ध असलें तर जिवंतपणीं धवल तेजानें बाहेर येईन नाहीं तर जळून भस्म होईन!'

ताबडतोब चंदनांचीं लांकडें आणून, अग्निकुंड पेटविण्यांत आलें. सीतामाईनीं त्या अग्निकुंडाला तीन प्रदक्षिणा घातल्या व अग्निदेवाला, सीतारामचंद्राला व देव ब्राह्मणांस नमस्कार करून म्हणाल्या, 'हे अग्निदेवा! माझ्या आयुष्यांतील हा महान् कसोटीचा प्रसंग माझ्या वांट्याला आला आहे. श्रीरामचंद्राचे पाय मी रात्रंदिवस आठवीत होतें. त्या पायांविरहित जर मी कोणा परपुरुषाचें स्मरण केलें असेल तर, तूं माझें जाळून भस्म कर आणि नसेल तर तूंच माझें रक्षण कर. मनानें, वाणीनें व आचरणानें मी शुद्ध असलें तरच मला जगांत ठेव.' एवढें बोलून सीतेनें अग्निकुंडांत उडी मारली.

सीतेच्या कसोटीचा व परीक्षेचा प्रसंग होता तो! केवढें दिव्य होतें तें! आणि त्या परीक्षेंत सीता पूर्णपणें उतरली. सर्वांचें लक्ष त्या धगधगत्या व पेटत्या अग्निनारायणाकडे एकसारखें लागून राहिले होतें.

निमिषार्धांत पूर्वीपेक्षांहि तेजस्वी स्वरूपांत सीतामाई कुंडांतून बाहेर आल्या. सर्वांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. वानरसेना आनंदभरांत नाचूं बागडूं लागली आणि त्यानंतर श्रीरामचंद्रांनीं सीतेचा मोठ्या आनंदानें स्वीकार केला.

—:X:—

# लक्ष्मण व भरत यांचा भक्तिभाव

रामायणांतील लक्ष्मण व भरत यांची, बंधू श्रीरामचंद्र यांच्यावरील निष्ठा व भक्तिभाव कोणत्या प्रकारचा होता, याचें सुंदर विश्लेषण श्री. विनोबा भावे यांनीं पुढील उताऱ्यांत केलें आहे.

—संपादक

राम वनांत जावयास निघाले त्यावेळीं लक्ष्मणास बरोबर नेण्यास ते तयार नव्हते. लक्ष्मणास बरोबर नेण्याचें कांहीं कारण नाहीं असें रामास वाटलें. ते लक्ष्मणास म्हणाले, 'लक्ष्मणा, मी वनांत जातों. मला पित्याची आज्ञा झाली आहे. तूं घरींच रहा. माझ्याबरोबर येऊन दुःखी मातापितरांस आणखी दुःखी करूं नकोस. आईबापांची व प्रजेची सेवा कर. तूं त्यांच्याजवळ असलास म्हणजे मला चिंता वाटणार नाहीं. माझा प्रतिनिधि म्हणून तूं रहा. मी वनांत म्हणजे संकटांत जात नाहीं. मी ऋषींच्या आश्रमांत जात आहें.

## मी तर मूल आहें

अशा रीतीनें रामचंद्र लक्ष्मणास समजावून सांगत होते; परंतु लक्ष्मणानें रामाचें सर्व सांगणें एका शब्दांत पुसून टाकिलें. एक घाव दोन तुकडे केले. तुलसीदासांनीं मोठें सुंदर रंगविलें आहे तें चित्र. लक्ष्मण म्हणाला, 'तुम्ही मला उत्कृष्ट निगम-नीति सांगत आहांत, ही नीति वास्तविक मी पाळावी, परंतु मला हें राजनीतीचें ओझें सहन होणार नाहीं. तुमचा प्रतिनिधि होण्याचें बळ माझ्यांत नाहीं. मी तर मूल आहें.

दीन्हि मोहि सिख नीकिगुसांई।
लागि अगम अपनी कदराई।
नरबर धीर धरमधुरधारी।
निगम-नीतिके ते अधिकारी।
मैं शिशु प्रभुसनेह प्रतिपाला।
मंदर मेरू किलैंहि मराला॥

हंसपक्षी का मेरुमंदाराचा भार उचलील? रामचंद्रा! मी तुमच्या प्रेमावर पोसलेला आहें, तुमची ती राजनीति दुसऱ्यास सांगा. मी बच्चा आहें.'

## रामाचा हात लक्ष्मण

मासा जसा पाण्यापासून दूर राहूं शकत नाहीं, तसें लक्ष्मणाचें. रामापासून दूर राहण्याची त्याची शक्ति नव्हती. त्याच्या रोमारोमांत सहानुभूति भरलेली होती. राम निजले असतां आपण जागरण करावें, त्यांची सेवा करावी, यांतच त्याचा आनंद होता. ज्याप्रमाणें आपल्या डोळ्यांवर कोणी दगड फेंकला तर हात पुढें होतो व तो घाव घेतो,

त्याप्रमाणें रामाचा हात लक्ष्मण झाला होता. रामावर होणारा घाव प्रथम लक्ष्मणानें पुढें होऊन झेलावा. तुळशीदासांनीं लक्ष्मणास एक सुंदर दृष्टांत दिला आहे. तो झेंडा वर फडकत असतो. सर्व गाणें त्या झेंड्याचें, त्याचा तो रंग, तो आकार, त्याचें वर्णन केलें जातें; परंतु त्या ताठ उभ्या असलेल्या काठीला कोण विचारतो ? रामाच्या यशाची जी पताका फडकत राहिली, तिला लक्ष्मण हा दंडाप्रमाणें आधार होता. ताठच्या ताठ उभा होता. दंड वांकणार नाहीं, त्याप्रमाणें रामाचें यश फडकवण्यासाठीं लक्ष्मण कधींच वांकला नाहीं. यश कोणाचें? तर रामाचें! जगाला पताका दिसते. दंडाचें विस्मरण झालेलें असतें. कळस दिसतो. पाया दिसत नाहीं. रामाचें यश फडकून राहिलें आहे. लक्ष्मणाचा पत्ताच नाहीं! चौदा वर्षेपर्यंत हा दंड वांकला नाहीं. स्वतः मागें राहून रामाचें यश तो फडकवीत राहिला. रामानें अत्यंत कठीण कठीण कामें लक्ष्मणाकडून करवून घ्यावींत. त्यानें सीतेला वनांत सोडण्याचें काम शेवटीं लक्ष्मणावरच सोपविलें. बिचारा लक्ष्मण सीतेला पोंहोंचवून आला. लक्ष्मणाला स्वतःचें अस्तित्वच राहिलें नाहीं. रामाचे डोळे, रामाचे हात, रामाचें मन तो झाला होता. नदी समुद्रांत मिळून जावी, त्याप्रमाणें लक्ष्मणाची सेवा रामांत मिळून गेली होती. तो रामाची छाया बनला होता. लक्ष्मणाची ती सगुणभक्ति होती.

### भरताची भावना

भरत हा निर्गुण भक्ति करणारा होता. त्यालाहि तुलसीदासजींनीं चांगलें रंगविलें आहे. राम वनांत गेले तेव्हां भरत अयोध्येंत नव्हता. भरत आला तों दशरथ मरून गेला होता. वशिष्ठ गुरू त्याला राज्य कर असें सांगत होते. भरत म्हणाला, ' मला रामाला भेटलें पाहिज.' रामाला भेटण्याची त्याला आंतून तळमळ लागून राहिली होती; परंतु राज्याची व्यवस्था तो लावून राहिला होता. हें रामाचें राज्य आहे व त्याची व्यवस्था ठेवणें म्हणजे रामाचेंच काम आहे; अशी त्याची भावना होती, सारी संपत्ति स्वामीची होती. तिची व्यवस्था लावणं हें त्याला कर्तव्य वाटलें. लक्ष्मणाप्रमाणें भरतास मोकळें होतां येत नव्हतें, अशी ही भरताची भूमिका होती.

### राम सांगेल तें प्रमाण

रामाची भक्ति म्हणजे रामाचें कार्य केलें पाहिजे. नाहींतर ती भक्ति काय कामाची ? सर्व व्यवस्था नीट लावून भरत वनांत रामाच्या भेटीस आला आहे. ' रामा! तुमचें हें राज्य आहे. तुम्हीं...' असें तो सांगत आहे, तोंच राम त्याला म्हणाले, ' भरता, तूंच राज्य चालव ' भरत संकोचानें उभा रहातो आणि म्हणतो, ' तुमची आज्ञा मला प्रमाण आहे.' राम सांगेल तें प्रमाण. त्यानें सर्व रामावर सोपविलें होतें. तो गेला व राज्य करूं लागला; परंतु त्यांतील मौज पहा. अयोध्येपासून दोन मैलांवर तो तपस्या करीत राहिला. तपस्वी राहून त्यानें राज्य चालविलें. शेवटीं राम जेव्हां भरताला भेटले तेव्हां गेलेला खरा तपस्वी कोण हें ओळखतां आलें नसतें. एखाद्यानें असें जर एखादें चित्र काढलें कीं दोघांचे तोंडावळे सारखे; थोडा वयाचा फरक, तोंडावर तपस्या तीच, एकमेकांस

ओळखतांहि येत नाहीं कीं राम कोणता व भरत कोणता, तर मोठें पवित्र चित्र होईल तें! अशा रीतीनें भरत देहानें रामापासून दूर होता; पण मनानें तो रामापासून क्षणभरहि दूर नव्हता. जरी एका बाजूला तो राज्य चालवून राहिला होता तरी तो मनानें रामाजवळ होता. निर्गुणांत सगुण भक्ति खच्चून भरलेली असते. तेथें वियोगाची भाषा बोलावी कशी! म्हणून भरताला वियोग वाटत नव्हता. देवाचें कार्य तो करून राहिला होता.

## भरताची सगुण भक्ति

'रामाचें नाम, रामाची भक्ति, रामाची उपासना हें कांहीं आम्हांला समजत नाहीं. आम्हीं देवाचें काम करूं.' असें अलिकडचे तरुण म्हणतात. अहो, पण देवाचें काम कसें करावें हें भरत दाखवीत आहे. देवाचें काम करून भरतानें वियोग जिरवून टाकिला आहे. देवाचें काम करून देवाचा वियोग भासण्यासहि वेळ नसणें ही गोष्ट वेगळी व देवाची ओळख ना देख, त्याचे बोलणें वेगळे. **देवाचें कार्य करीत संयमपूर्ण जीवन जगणें ही फार दुर्लभ गोष्ट आहे.** भरताची ही वृत्ति जरी निर्गुण कार्य करीत राहण्याची होती तरी सगुणाचा आधार तेथें तुटला नाहीं.

'रामा! तुमचा शब्द मला प्रमाण आहे. तुम्ही सांगाल त्याबद्दल मला शंका नाहीं–' असें म्हणून भरत जावयास निघाला तरी तो माघारा वळला व रामाला म्हणाला, 'रामा! समाधान नाहीं वाटत. कांहींतरी हुरहुर वांटते.'

## रामानें असमाधान ओळखलें

रामानें तें ओळखलें व म्हटलें, 'या पादुका ने' सगुणाबद्दलचा आदर शेवटीं राहिलाच. निर्गुणाला सगुणानें शेवटीं ओलें केलेंच. लक्ष्मण त्या पादुकांवर समाधानें न मानतां, त्याच्या दृष्टीनें तें दुधाची तहान ताकावर भागविण्यासारखें झालें असतें. भरताची भूमिका निराळी होती. तो बाहेरून दूर राहून कर्म करीत होता; पण मनानें राममय होता. भरत जरी कर्तव्य करण्यांत रामभक्ती मानीत होता, तरी पादुकांच्या अभावीं तो राज्यकारभार हाकूं शकता ना. त्या पादुकांची आज्ञा म्हणून तो कर्तव्य करीत राहिला. लक्ष्मण हा रामाचा जसा भक्त तसाच भरतहि आहे. दोघांच्या भूमिका बाहेरून निराळ्या. भरत जरी कर्तव्यनिष्ठ होता, तत्त्वनिष्ठ होता, तरी त्यांच्या तत्त्वनिष्ठेलाहि पादुकांच्या ओलाव्याची गरज भासली.



# ज्ञानाच्या सात भूमिका

'योगवासिष्ठ' या थोर ग्रंथाचें वर्णन आम्हीं काय करणार! त्याची महति ज्ञानी पुरुषांनींच जाणावी! महामहोपाध्याय विद्यारत्न न्यायाचार्य पांडुरंगशास्त्री गोस्वामी यांनीं सर्वसाधारण लोकांना या ग्रंथाचें हृद्गत समजावें, या स्तुत्य हेतूनें 'योगवासिष्ठाचें हृद्गत' या नांवाचा ग्रंथ लिहिला असून, त्याच्या आधारें हें थोडक्यांत संकलन केलें आहे.

योगवासिष्ठामध्यें ज्ञानाच्या सात भूमिका वर्णन केलेल्या आहेत. भूमिका म्हणजे अवस्था. अगदीं प्रथम अवस्थेपासून ज्ञानाचा कसा कसा विकास होत जातो व ज्ञानी मनुष्याचे जीवनावर काय काय परिणाम घडतात, याचें सुंदर विवेचन केलें आहे. ज्ञानाच्या अशा सात भूमिका आहेत, तशा अज्ञानाच्याहि आहेत. अज्ञानाच्या भूमिका लक्षांत घेऊन त्यांचा निरास करावयाचा असतो व ज्ञानाच्या भूमिका अभ्यासानें हस्तगत करावयाच्या असतात.

मनुष्याच्या ठिकाणीं असलेल्या ज्या स्वाभाविक प्रवृत्ति, खाणें, पिणें, चैन करणें इत्यादि व त्याचप्रमाणें विषयसुखाची अभिरुचि उत्तरोत्तर बळावत जाणें, हेंच अज्ञान-भूमिका दृढमूल होण्याचें कारण आहे. विषय-वासना आणि स्वैरवृत्ति या कारणांनीं दृढमूल झालेल्या अज्ञानामुळें जीवांना संसारामध्यें भटकावें लागतें व अनंत दुःखें भोगावीं लागतात. जीव आत्मस्वरूपाला पूर्णपणें विसरून जातो.

अहंता गळाली, भेदबुद्धि मावळली, चित्त निःस्पन्द, अर्थात् शांत झालें म्हणजे जें चैतन्यतत्त्व प्रकाशतें, तेंच जीवाचें मूलस्वरूप होय, त्यालाच स्वरूपस्थिति असें म्हणतात.

अहन्तांशे क्षते शान्ते भेदे निःस्पन्दतां गते ।
अजडा या प्रकचति सा स्वरूप स्थितिः स्मृता ॥

या स्वरूपस्थितीवरच अज्ञानाचा आरोप होत असतो. या अज्ञानाच्या सात भूमिका आहेतः— (१) बीज जाग्रत्, (२) जाग्रत्, (३) महाजाग्रत्, (४) जाग्र, (५) स्वप्न, (६) स्वप्नजाग्रत्, (७) सुषुप्त अशीं त्यांचीं नांवें आहेत.

बीजजाग्रत्तथा जाग्रन्महाजाग्रत्तथैव च ।
जाग्रत्स्वप्नस्तथा स्वप्नः स्वप्नजाग्रत्सुषुप्तकम् ॥

कणगीमध्यें बीजें साठविलेलीं असतात व त्या बीजांमध्यें वृक्ष सामावलेले असतात. त्याचप्रमाणें अव्यक्त अवस्थेंत सत्तत्त्वामध्यें सर्व प्राण्यांचीं वासनाबीजें सामावलेलीं असतात.

त्यावेळेला विश्व व्यक्त झालेलें नसतें. जणूं काय जाग्रत्–अवस्थाच बीजरूपें येथें वास्तव्य करीत आहे या वासनाबीजानांच मूलाज्ञान असें म्हटलें आहे. हें मूलाज्ञानच बीजजाग्रत या नांवाची अज्ञानाची पहिली भूमिका होय. हीच संसाराची प्रथमावस्था होय. यालाच महामोह असेंही म्हणतात. आत्मस्वरूपाच्या साक्षात्कारानेंच याचा निरास होतो.

संसारप्रथमावस्था महामोहः स एव हि ।
तदेवाज्ञानमित्युक्तं यत्त्वबोधेन लीयते ॥

कणगींतलें बीं शेतांत टाकलें, त्याला खतपाणी मिळालें, कीं तें अंकुरित होतें. त्याचप्रमाणें, वासनाबीजें देखील अनुकूल काल येतांच फलोन्मुख होतात, व त्यांतूनच मन, बुद्धि व चित्त यांचा आविर्भाव होतो. हीच अज्ञानाची जाग्रत्–अवस्था होय. पुढें अहंकार निर्माण होतो, व त्यांतूनच विश्व–प्रपंचाचा स्पष्ट प्रादुर्भाव होतो. हीच अज्ञानाची तिसरी अवस्था होय, तिला महाजाग्रत् असें म्हणतात. जागृतावस्थेला आलेला जीव ज्या वेळेला मनोरथांचे मनोरे उभारीत असतो, त्यावेळच्या अवस्थेला जाग्रत्स्वप्न–अवस्था असें म्हणतात. मनोराज्य म्हणजे जागृतीच्या काळांतील स्वप्नच नव्हे तर दुसरें काय ? ही अज्ञानाची चवथी अवस्था होय. '**लोक प्रसिद्धोयः स्वप्नः, सस्वप्न इति कथ्यते**' स्वप्न या शब्दानें ओळखली जाणारी अवस्था ही अज्ञानाची पाचवी भूमिका होय. या स्वप्नांतून जागा झाला तरी देखील स्वप्नांत पाहिलेल्या वस्तु जणूं काय आपण प्रत्यक्ष पहात आहोंत असें वाटणें ही अज्ञानाची सहावी अवस्था, स्वप्न जाग्रत् या शब्दानें ओळखिली जाते. सुषुप्ति म्हणजे गाढ निद्रा. जागृतीचीं बीजें या अवस्थेंत असतात. तीं फलोन्मुख नसतात. एवढेंच काय तें. तीं फलोन्मुख झालीं कीं बीज जाग्रत् अवस्था असें म्हटलें तरी चालेल. या सर्व अवस्था प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीतीनें जीवाला तापदायक असल्या-मुळें अज्ञान–भूमिका म्हणून ओळखल्या जातात. अज्ञानाचा संपर्क तापदायक असणें स्वाभाविकच आहे; म्हणून तो टाळण्याचा प्रयत्न करावा.

नित्य काय व अनित्य काय या गोष्टीचा विवेक करणें ऐहिक आणि पारलौकिक विषयांबद्दल विरक्त रहाणें, इंद्रिय निग्रह,–मनोनिग्रहांचा अभ्यास करणें व आपण या संसार तापांतून पूर्ण मुक्त व्हावें अशी इच्छा ठेवणें, याला साधनचतुष्टय असें म्हणतात. साधनचतुष्टय संपन्न होऊन आत्मश्रवण करीत राहणें व उत्तरोत्तर संसारांतून मुक्त होण्याची तळमळ वाढत असणें हेंच ज्ञानाची भूमिका दृढमूल होण्याचें मुख्य कारण आहे. संसार दुःखांतून मुक्त होणें व नित्यनिरतिशय आनंद प्राप्त करून घेणें, हें ज्ञानाचें फल आहे. आरंभापासून अखेरपर्यंत ज्ञानाचा परिपाक कसा होत जातो व ज्ञानी पुरुषाची उत्तरोत्तर कशी अवस्था होत जाते हें आपल्याला या सप्तज्ञान भूमिकेंत चांगलें पाहावयास सांपडतें.

ज्ञानभूमिः शुभेच्छाख्या प्रथमा समुदाहृता ।
विचारणा द्वितीया तु तृतीया तनुमानसा ॥
सत्त्वापत्तिश्चतुर्थी स्यात्ततोऽसंसक्तिनामिका
पदार्थाभावनी षष्ठी सप्तमी तुर्यगा स्मृता ॥

तत्त्वज्ञानाशिवाय आपल्याला सर्व संसारदुःखांतून मुक्त होतां येणार नाहीं. दुःख निवृत्तीसाठीं आपल्याला तत्त्वज्ञानाचीच कास धरली पाहिजे, अशी अंतःकरणांत इच्छा उत्पन्न होणें हें भाग्याचें लक्षण आहे. म्हणून या इच्छेला शुभेच्छा असें म्हणतात. अंतःकरणांत इच्छा निर्माण होण्याचीं अनेक कारणें आहेत. राम, कृष्ण, विष्णु, शिव, शक्ति, गणपति इत्यादि देवांची भक्ति घडावी लागते. विद्वान व विरक्त लोकांची संगति, प्रेम व कृपाप्रसाद व्हावा लागतो. सात्विक आहारविहार व शुद्ध बुद्धीनें ज्ञान, दान, जप, तप, परोपकार इत्यादि कामें घडावीं लागतात. '**मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चित् यतति सिद्धये**' असें श्रीकृष्णानीं म्हटलें आहे. यावरून ज्ञानाची पहिली भूमिकाच किती दुर्लभ आहे याची कल्पना येते. या शुभेच्छेलाच जिज्ञासा, मुमुक्षा अशीं नांवे दिलेलीं आहेत. ज्याच्या चित्तामध्यें खरी मुमुक्षा निर्माण झालेली आहे, तो मनुष्य चांगले वाचनीय ग्रंथ कोठून तरी मिळवून आणील व वाचीत बसेल. ज्ञानी व संत लोकांची संगति धरील. तीर्थक्षेत्रामध्यें राहण्याचा प्रयत्न करील. न्यायानें व धर्मानें वागेल. मनांतले प्रश्न विचारीत राहील. स्वतःचें अज्ञान प्रगट करील. नम्रपणानें वागेल. संतांनी व गुरुंनीं केलेल्या उपदेशाचें चिंतन करीत राहील. राग—द्वेषादि विकारांचा तिटकारा करील. दयाळु होऊन निरपेक्ष बुद्धीनें परोपकार करीत राहील. हीं सर्व लक्षणें दिसूं लागलीं म्हणजे ज्ञानाच्या पहिल्या भूमिकेवर तो आला असें समजावें.

विचारणा ही ज्ञानाची दुसरी भूमिका होय. हिलाच कोणी 'सामिक्षा' असें म्हणतात. प्रकृति म्हणजे काय? निवृत्ति म्हणजे काय? विकृति म्हणजे काय? पुरुष कोणाला म्हणावें? सत्याचें स्वरूप काय? मिथ्या कशास म्हणावें? चेत्य म्हणजे काय? चित् म्हणजे काय? 'माया कोणास म्हणावें? ब्रह्माचें स्वरूप काय? या प्रमाणें आत्मज्ञानोपयोगी विषयांचा विचार करीत राहणें ही ज्ञानाची दुसरी भूमिका समजावी. हें विश्व कोठें निर्माण झालें? कां झालें? कोणी केलें? काय याचें स्वरूप आहे? हें कोठें व कसें विलीन होणार? इत्यादि गोष्टींचा विचार करीत राहणें हेंच विचारांचें अथवा समीक्षेचें लक्षण होय. या युक्तायुक्त व तार्किक पद्धतीच्या विचारांनीं असंभावना व विपरीत भावना यांचा निरास होतो. अज्ञान मावळतें. सोनें जसें तापवावें, तसें निर्मल होत जातें, त्याप्रमाणें हा उत्तरोत्तर निर्मल होत जातो.

आतां ज्ञानाची तिसरी भूमिका 'तनुमानसा' ही आहे. तत्त्वज्ञानी जसजसा विचार करीत जातो, तसेंतसें त्याचें ज्ञान विषयांपासून विन्मुख होऊं लागतें. मनाची चंचलता कमी होते. निषिद्ध नसलेले विषय त्याच्यापुढें यदृच्छेनें प्राप्त झाले तरी, तो त्या विषयांना निषिद्ध विषयाप्रमाणें समजतो, अशी जी अवस्था तिलाच 'तनुमानसा' म्हणतात. दिवस गेला, रात्र गेली; आयुष्य चाललें, केव्हां माझें अज्ञान संपणार? केव्हां मला ज्ञान होणार अशी त्याला सारखी तळमळ लागलेली असते. हेंच तनुमानसाचें लक्षण होय.

# श्रीरामकृष्णांच्या सहवासांत

अनुवादक—द. पां खांबेटे

श्रीरामकृष्ण परमहंस यांचे भक्तांशीं झालेले अनेक संवाद 'एम्' (महेंद्रनाथ गुप्त) यांनीं संकालित करून ग्रंथरूपानें प्रसिद्ध केले आहेत. त्यांतील थोडासा भाग येथें अनुवादित करून दिला आहे.

श्रीरामकृष्ण एका लहान खाटेवर बसले होते. खोलींत भक्तमंडळी दाटीवाटीनें बसली होती. सुट्टी असल्याचा फायदा घेऊन खूप भक्त आज आले होते. त्यांपैकीं कोणाशींहि एम्. ची अद्यापि ओळख झाली नव्हती. एम्. एका कोपऱ्यांत बसला. भगवान् भक्तांशीं बोलत होते व त्यांच्या चेहऱ्यावर स्मित हास्य विलसत होतें.

ते मुख्यत्वेंकरून एकोणीस वर्षांच्या नरेंद्रनाथ नांवाच्या कॉलेज-विद्यार्थ्याला उद्देशून बोलत होते. नरेंद्रनाथ साधारण ब्रह्म समाजांत जात असे. त्याचे डोळे पाणीदार होते. त्याच्या बोलण्यांत आवेश होता आणि त्याला पाहतांच 'हा ईश्वरभक्त आहे' असें वाटण्यासारखी त्याची दृष्टि होती.

संभाषण संसारी लोकांसंबंधीं चाललें होतें, असा एम्.ला अंदाज लागला. आध्यात्मिक साध्य प्राप्त करून घेण्याचा ज्यांचा प्रयत्न असतो, त्यांच्याकडे संसारी माणसें कशीं अवहेलनेनें पाहातात हा विषय होता. जगांत अशांची संख्या कवढी मोठी आहे आणि त्यांच्याशीं वागण्याची रीत कशी असावी, याविषयीं भगवान् बोलत होते.

**भगवानः**—(नरेंद्राला उद्देशून) 'तुझी भावना कशी आहे? संसारी माणसें भक्तजनांबद्दल वाटेल त्या गोष्टी बोलत असतात. पण हें पहा! रस्त्यानें हत्ती चालूं लागला म्हणजे अनेक कुत्रीं त्याच्यावर भुंकत त्याच्यामागें धांवतात. पण तो हत्ती नुसतें मागें वळून त्यांच्याकडे पहातहि नाहीं. लोक जर तुझ्याबद्दल कांहीं वाईट बोलूं लागले तर तूं त्यांच्याविषयीं कशी भावना ठेवशील?'

**नरेंद्रः**—'मी म्हणेन, हीं कुत्रीं माझ्यावर भुंकत सुटलीं आहेत.'

**भगवानः**—(हंसून) 'छे! छे! एकदम इतकें टोंकाला जातां कामा नये बाळ! (सर्वजण हंसतात) ईश्वर सर्व वस्तूंत आहे. पण तुम्ही फक्त सज्जनांच्या सहवासांत असावें. दुष्ट माणसांपासून चार हात दूर राहाणें चांगलें. वाघांतहि ईश्वराचें अस्तित्व आहे. पण म्हणून कांहीं वाघाला मिठी मारतां येत नाहीं. (हंसा) तुम्ही एखादवेळीं म्हणाल, 'वाघ हेंहि ईश्वराचेंच एक स्वरूप ना! मग त्याच्यापासून लांब कशाला

पळा ?' या प्रश्नाचें उत्तर असें—त्याच्यापासून दूर पळा म्हणून जे कोणी तुम्हांला सांगतात तेहि ईश्वरस्वरूपच आहेत. त्यांचें तुम्ही कां ऐकूं नये ?'

**हत्ती आणि माहुत**

'तुम्हांला एक गोष्ट सांगतों. एका रानांत एक साधु राहात होता. त्याचे पुष्कळ शिष्य होते. सर्व वस्तूंत ईश्वराचें अस्तित्व पाहावें, असें त्यानें एके दिवशीं आपल्या शिष्यांना शिकविलें. सर्व वस्तूंत ईश्वरच भरलेला आहे हें जाणून वस्तुजातापुढें आपलें मस्तक नम्र करावें असें त्यानें सांगितलें. नंतर एक शिष्य होमासाठीं लांकडें आणायला रानांत गेला असतांना त्याला एकदम मोठा गलका ऐकूं आला. 'दूर व्हा ! पिसाळलेला हत्ती मोकाट सुटला आहे' असा आरडा ओरडा त्यानें ऐकला. या शिष्याखेरीज इतर सगळे लोक ही ओरड ऐकतांच जीव घेऊन पळाले. तो शिष्य मात्र जागचा हालला नाहीं. तो मनाशीं म्हणाला, 'हत्ती हेंहि ईश्वराचेंच एक स्वरूप आहे. मग त्याच्यापासून घाबरून दूर कशाला पळायचें ?' तेव्हां तो तसाच उभा राहिला. हत्ती धांवत येतांना पाहून त्यानें खालीं वांकून नमस्कार केला आणि हत्तीचा स्तव करण्यास प्रारंभ केला. हत्तीवरचा मांहूत ओरडून सांगत होता, 'बाजूला व्हा ! बाजूला व्हा !' पण तो शिष्य बाजूला झाला नाहीं. हत्तीनें जवळ येतांच त्याला सोंडेंत धरलें आणि सोंड उंचावून त्याला दूर भिरकावून दिलें. हत्ती पुढें निघून गेला. जमिनीवर उंचावरून आदळल्यामुळें तो शिष्य बेशुद्ध झाला. नंतर हा सारा प्रकार ऐकून त्या शिष्याचा गुरु आणि इतर शिष्य त्या ठिकाणीं आले. ते त्याला आश्रमांत घेऊन गेले. कांहीं औषधपाणी केल्यावर शिष्य शुद्धीवर आला. मग कोणीतरी त्याला विचारलें, 'अरे ! तो पिसाट हत्ती अंगावर धांवून येतो आहे हें पाहूनहि तूं बाजूला कां सरकला नाहींस ?' तो म्हणाला, 'पण आमच्या गुरुजींनीं तर सांगितलें होतें कीं, ईश्वरानेंच जगांत हीं सगळीं रूपें धारण केलीं आहेत. तेव्हां येणारा हा हत्तीच्या रूपांतला ईश्वरच आहे असें समजून मी दूर पळालों नाहीं.' त्याचें हें उत्तर ऐकून त्याचे गुरु म्हणाले, 'होय बाळ ! हत्तीच्या रूपांत ईश्वरच धांवून येत होता. पण माहुताच्या रूपांतला ईश्वर तुला बाजूला व्हायला सांगत होता ना ? सर्व वस्तू ही परमेश्वराचीं रूपें आहेत हें जर तूं मानतोस, तर तूं त्या माहुताच्या शब्दावर विश्वास कां नाहीं ठेवलास ? हत्तीरूप ईश्वर धांवून येत असतांना माहुतरूप ईश्वराचे शब्द तूं ऐकायला हवे होतेस.' (सर्व हंसतात.)

**विस्मयजनक दृश्य**

संध्याकाळचे पांच वाजले होते. पंचवटींतून एम्. भगवानांच्या खोलीकडे आला. तिथें उत्तरेकडील छोट्या पडवींत त्याला एक विस्मयजनक दृश्य दिसलें.

श्रीरामकृष्ण स्तब्ध उभे होते. भोंवतीं थोडेसे भक्तजन होते. नरेंद्र गात होता. भगवानांखेरीज इतक्या मधुर स्वरानें कोणी गातांना एम्.नें आजवर कधीं ऐकलें नव्हतें. त्यानें श्रीरामकृष्णांकडे दृष्टि फेंकली. तेव्हां तो विस्मयानें थक्क होऊन गेला. कायम

भगवान स्थिर दृष्टी ठेऊन स्तब्ध उभे होते. त्यांचा श्वास चालू असावा असेंहि वाटत नव्हतें. एका भक्तानें एम्.ला सांगितलें कीं भगवानांची समाधि लागली आहे. एम्.नें असला प्रकार पूर्वी पाहिला किंवा ऐकला नव्हता. विस्मयचकित होऊन तो स्वतःशीं म्हणाला, 'बाह्य जगाचें भान इतकें पूर्णपणें नाहींसें होणें शक्य आहे काय? देवाच्या स्वरूपांत निमग्न होऊन माणूस बाह्य जगाला असा संपूर्ण विसरूं शकतो काय? अशी स्थिति प्राप्त होण्यास यांची निष्ठा आणि भक्ति ह्या किती प्रखर असल्या पाहिजेत!' नरेंद्र एक गाणें गाऊं लागला. शेवटची ओळ नरेंद्र म्हणत असतांना भगवानांच्या आंगाला कंप सुटला त्यांच्या आंगावर रोमांच उभे राहिले, त्यांच्या डोळ्यांतून आनंदाच्या अश्रुधारा वाहूं लागल्या. मधून मधून स्मित करतांना त्यांचे ओठ जरासे विलग होत. ईश्वराचें अनिर्वचनीय नि अजोड सौंदर्य त्यांना दिसत होतें काय? लक्षावधि चंद्रांच्या तेजालाहि खालीं मान घालायला लावणारें ईश्वरी मोहकत्व त्यांच्या दृष्टीसमोर उभें होतें काय? ईश्वरदर्शन म्हणतात तें हेंच काय? चैतन्यसार समजतात तें ह्यालाच? हें दर्शन होण्यास किती साधन आणि तपस्या हवी! किती श्रद्धा आणि भक्ति हवी!

## मोराची गोष्ट

दुसऱ्या दिवशींहि एम्. ला सुट्टी होती. तो दुपारीं तीन वाजतां दक्षिणेश्वरला आला. श्रीरामकृष्ण आपल्या खोलींत होते. जमिनीवर एक सतरंजी पसरलेली होती. तीवर नरेंद्र, भावनाथ आणि इतर कांहीं भक्त बसलेले होते. सगळेजण एकोणीस—वीस वर्षांचे तरुण होते. लहानशा पलंगडीवर बसून श्रीरामकृष्ण त्यांच्याबरोबर हंसत खेळत बोलत होते.

एम्. खोलींत शिरतांच भगवान् मोठ्यानें हंसले आणि त्या मुलांना म्हणाले, 'तो बघा! आला तो परत!' भगवानांच्या हसण्याला इतरांनींहि साथ दिली. एम्.नें भगवानांना वांकून प्रणाम केला आणि खालीं बसला. यापूर्वी तो इंग्रजी पद्धतीनुसार नुसते हात जोडून भगवानांना अभिवादन करीत असे पण आज हिंदु पद्धतीप्रमाणें भगवानांच्या चरणांवर डोकें ठेवून त्यानें नमस्कार केला होता.

मग भगवानांनीं आपल्या हास्याचें कारण तिथें जमलेल्या भक्तांस सांगितलें. ते म्हणाले, 'एका माणसानें एकदां एका मोराला दुपारीं चार वाजतां एक अफूची गोळी चारली होती. दुसऱ्या दिवशीं बरोबर त्याच वेळीं तो मोर आपला त्या माणसासमोर हजर! अफूच्या धुंदीनें सौख्य त्यानें अनुभविलें होतें तेव्हां परत एक डोस मिळाला तर पहावा म्हणून तो दुसऱ्या दिवशीं नेमक्यावेळीं आला होता.' (सर्व हंसतात.)

हें उदाहरण एम्.ला अत्यंत समर्पक वाटलें. घरीं देखील श्रीरामकृष्णांचा विचार त्याच्या मनांत सारखा घोळत होता. एक क्षणभरहि तो विचार त्याला मनांतून घालवितां आला नव्हता. त्याचें चित्त सारखें दक्षिणेश्वराकडे लागलेलें होतें. तिकडे परत जाण्याची वेळ केव्हां एकदा येते असें होऊन तो सारखीं मिनिटें मोजीत होता.

एम्. च्या मनांत हे विचार घोळत होते. इकडे श्रीरामकृष्ण त्या मुलांबरोबर हास्यविनोद करीत होते. ते मुलगे म्हणजे जणूं काय आपले जीवश्चकंठश्च स्नेही अशा

रीतीनें ते वागत होते. हास्याच्या उकळ्यांवर उकळ्या फुटत होत्या, जणूं हर्षाचा बाजारच तिथें भरला होता. हा सगळा प्रकार एम्. ला अत्यंत अपूर्व नि अभिनव होता. एम्. मनाशीं म्हणाला, 'ईश्वरदर्शनांत देहभान विसरून गेलेल्या अवस्थेंत त्यांना मी कालच पाहिलें नाहीं का? दिव्यप्रेमाच्या सागरात ते काल डुंबत नव्हते काय? असें दृश्य मी पूर्वी कधींहि पाहिलें नव्हतें. आणि तेच हे आज एखाद्या सामान्यजनाप्रमाणें आचरण करीत आहेत! मी अगदीं प्रथमतः इथें आलों तेव्हां ह्यांनींच माझी कानउघाडणी केली नव्हती काय? 'आणि तूं मोठा ज्ञानी!' या शब्दांनीं त्यांनीं माझी संभावना केली होती. ईश्वर साकार आहे तसाच निराकारहि आहे असें यांनींच मला सांगितले होतें ना! ईश्वर हेंच काय तें एक सत्य, बाकी राहिलें तो निवळ भ्रम हा उपदेश यांनींच मला केला होता ना? श्रीमंताच्या घरच्या मोलकरणीप्रमाणें या जगांत अनासक्त चित्तानें राहावें अशी यांनींच मला शिकवण दिली नव्हती काय?'

## रामचिंतनांत तन्मयता

त्या तरुण भक्तांबरोबर श्रीरामकृष्ण मजामजा करीत होते. मधून मधून ते एम्.कडे एखादा दृष्टिक्षेप टाकीत. एम्. अगदीं गप्प बसून राहिला आहे हें त्यांच्या ध्यानांत आलें. भगवान् रामलालला म्हणाले, 'हें पहा! तो वयानें थोडा प्रौढ आहे त्यामुळें त्याच्यांत हें स्वाभाविक गांभीर्य आलेलें आहे. म्हणून तरुण मुलें हास्यविनोद करीत असतांना तो गप्प बसून आहे.' एम.चें वय तेव्हां अठ्ठावीस वर्षांचें होतें.

भगवानांच्या खोलींतल्या भिंतीवर हनुमानाचें चित्र होतें. बोलतां बोलतां हनुमानासंबंधीं बोलणें निघालें.

श्रीरामकृष्ण म्हणाले, 'हनुमानाच्या मनःस्थितीची नुसती कल्पना करा. त्याला पैशाची पर्वा नव्हती, मानसन्मानाची तमा नव्हती, शरीर सुखाची अथवा इतर कशाचीहि क्षिति नव्हती. त्याला फक्त एक ईश्वराची आस लागून राहिली होती. रावणाच्या राजवाड्यांतील स्फटिक स्तंभांत ठेवलेलें दिव्य अस्त्र घेऊन तो पळून चालला असतां, मंदोदरीनें अनेक फळांचा त्याला लोभ दाखविला. तें अस्त्र त्यानें हातांतून टाकावें आणि त्यानें फळें उचलावींत हा तिचा उद्देश होता. पण तो तिच्या या युक्तीनें फसला नाहीं. मंदोदरी त्याच्या मनाला फळांचा लोभ घालीत असतां त्यानें एक गीत म्हटलें.

असें म्हणून भगवंतांनीं तें गीत मधुर आवाजांत म्हणून दाखविलें.

गाणें म्हणतां म्हणतां श्रीरामकृष्णांची समाधि लागली. त्यांच्या छायाचित्रांत दिसतात तसे--अर्धोन्मीलित नेत्र आणि निश्चल शरीर असलेले ते पुन्हां दिसूं लागले. मिनिटापूर्वीच त्यांचे भक्त त्यांच्याबरोबर स्वैर हास्यविनोद करीत होते. आतां सर्वांचे डोळे त्यांच्यावर खिळले होते. एम्. नें हें दुसऱ्यांदा भगवानांना समाधिस्त अवस्थेंत असलेलें पाहिलें.

बऱ्याच वेळानें भगवान् पूर्ववत् भानावर आले. त्यांच्या चेहऱ्यावर स्मिताची प्रभा प्रसरली. त्यांचें शरीर थोडें सैलावलें. त्यांची ज्ञानेंद्रियें पूर्ववत् सहजस्थितीवर आलीं. 'राम राम' असें मुखानें म्हणत असतां त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु गळूं लागले. कांहीं क्षणांपूर्वी पांच वर्षांच्या बालकासारखा वागणारा तोच का हा संत? असा चमत्कार एम्. च्या मनाला राहून राहून वाटूं लागला......

---

# मदानुकरण–मधानुकरण–मंदानुकरण

लेखक- जानकी बाळकृष्णतनय

लोकप्रियतेंत वाढ होऊं लागली कीं त्याबरोबर कांहीं कांहीं अनिष्ट गोष्टींचीहि भरभराट होते असा अनुभव येतो. त्याप्रमाणें हल्लीं शिर्डी संस्थानची भरभराट होत असल्यामुळें, त्याहि बाबतींत साईभक्तांना प्रामाणिक सूचना आतांपर्यंत साईलीलेंतून देण्यांत आल्या. निरनिराळ्या जाहिराती, पत्रांच्या सांखळ्या व बुवाबाजी हे वरील प्रकारापैकीं कांहीं प्रकार होत व त्याबाबतींत आज थोडेसें लिहिण्याचें श्रीसाई प्रेरणेनें ठरविलें आहे व तेवढ्याकरितांच लेखाचा मथळा जरा नवीन स्वरूपाचा वाटण्याचा संभव आहे.

'मंदानुकरण किंवा अंधानुकरण ह्याला बुद्धिवादांच्या प्रांतांत फार दोष दिला जातो, परंतु माझ्या अल्प बुद्धीला असें वाटतें कीं, ज्या ठिकाणीं अत्यंत प्रखर अशी बुद्धीहि थकते, किंवा थांबते त्याच ठिकाणीं श्रद्धेचा उदय होत असतो व त्या श्रद्धा-वृक्षाला ज्यावेळीं तसेंच पाणी मिळत जातें, त्याचवेळेला ती श्रद्धा कायम किंवा टिकाऊ स्वरूपाची होते. एखाद्या चमत्कारामुळें अगर एखाद्या भविष्य कथनानें निर्माण झालेली श्रद्धा बुद्धिवादाच्या परिसरांत सदैव स्थान धरून राहील हें शक्य नाहीं व तसें होतहि नाहीं; कांहीं कांहीं वेळेला काहीं बाबतींत अंधानुकरण हें पुष्कळ चांगलें असें वाटतें कारण–मंत्रे, तीर्थे द्विजे दैवे दैवज्ञे, भेषजे गुरौ । या दृशीं भावनां कुर्यात् सिद्धिर्भवति तादृशी ।-श्रीगुरुचरित्र अध्याय ४०, ओवी ४९.

मधानुकरण हें सर्वांत चांगलें कीं जें आपल्यासमोर दिसेल त्याच्यांतील मधासारखा जो जो पदार्थ आपल्याला दिसेल, तो तो आपण घेण्याचा व आचरण्याचा प्रयत्न करावा, कारण अनुकरणसुद्धां कशाचें करावें, किती करावें व केव्हां करावें हेंही समजलें पाहिजे. ह्या बाबतींत एक दोन उदाहरणें आपल्यापुढें ठेवतों. एक सत्पुरुष ५५५ नंबरची सिगारेट ओढतात म्हणून, त्यांचें अनुयायी ५५५ नंबरचीच सिगारेट ओढण्यांत गुरुसेवा मानतात. माझ्यामतें हें चुकीचें आहे. त्या सत्पुरुषांचें मोठेपण ५५५ नंबराच्या सिगारेट-मध्यें नाहीं, परंतु तें त्यांच्या तपश्चर्येंत आहे, त्यांच्या थोर उपदेशाच्या शिकवणींत आहे हें लक्षांत यावयास पाहिजे. तसेंच नुसत्या त्याच सिगारेट ओढण्यानें आपण मोठी गुरुसेवा करतों असें मानणेंहि चुकीचें होईल. किंवा आपण जर सिगारेट ओढीत नसलों, तर त्याकरितां सिगारेट ओढावयास लागणें हेंहि चूक आहे; श्रीसद्गुरुसाईनाथमहाराजहि चिलीम ओढीत असत, पण त्यांचा मोठेपणा चिलमींत होता का ! पण ह्याहि बाबतींत गुरुरायांना मोठेपणा कसा दाखवितां आला ह्याचें उदाहरण श्रीसाईसच्चरित अध्याय ५१ ओव्या २१७ ते २२१ – मध्यें पहावें. त्या ओव्या अशा —

बाळाराम विनयसंपन्न । करूं लागले पादसंवाहन ।
बाबांनीं चिलीम पुढें करून । ओढावयास खूण केली ॥ २१७ ॥

मग ती चिलीम प्रसाद म्हणून । संवयी नसतां कष्टें ओढून ।
पुन्हां बाबांचे हातीं देऊन । केलें साभिवंदन सद्भावें ॥ २१८ ॥
बाळारामास भाग्याचा दिन । लाभला पहा तपासून ।
त्यांची दम्याची व्यथा जाऊन । पूर्ण समाधान जाहलें ॥ २१९ ॥
दमा ना एका दों दिवसांचा । विकार पूर्ण सहा वर्षांचा ।
कानांत मंत्र सांगावा जैसा । चिलमीचा तैसा तो प्रभाव ॥ २२० ॥
झुरका एक चिलमीचा मारूनी । परत केली सविनय नमुनी ।
दमा जो गेला तैंपासुनी । उठला न परतोनी केव्हांही ॥ २२१ ॥

असा अधिकार नुसता चिलीम ओढण्यांनीं आपणांत येईल का ?

आयुर्वेदपारंगत श्री. अनंत तथा अप्पाशास्त्री आठवले ह्यांनीं ह. भ. प. दासगणू-महाराजांचें जें सुंदर चरित्र लिहिलें आहे, त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत ह. भ. प. सोनोपंत दांडेकर एम्. ए. ह्यांनींहि एक या बाबतींत उद्‌बोधक असा त्यांचा अनुभव दिला आहे. श्री. सोनोपंत दांडेकर हे अत्यंत अधिकारी पुरुष श्री. विष्णुबुवा जोग यांचे शिष्य. श्री. जोग यांना नाकामध्यें पीनस नांवाचा रोग होता व त्याकरितां ते तपकीर ओढीत असत. जोग समाधिस्थ झाल्यानंतर, त्यांच्या कांहीं शिष्यमंडळींनीं श्री. सोनोपंतांना तपकीर दिली. त्यावर श्री. सोनोपंत म्हणाले–विनयानें म्हणाले, ' मी तपकीर ओढीत नाहीं ' तसें अत्यंत विस्मयानें ते शिष्य म्हणाले कीं ' तुम्ही श्री. विष्णुबुवा जोगांचे शिष्य म्हणवितां व तपकीर ओढीत नाहीं. ! ' तेव्हां श्री. सोनोपंतांनीं लिहिलें आहे कीं ' श्री. विष्णुबुवा तपकीर ओढीत होते व त्यांनीं अमृतानुभवासारखा थोर ग्रंथ लिहिला, ह्या दोन्ही गोष्टी ह्या शिष्यांच्या दृष्टीनें एकाच दर्जाच्या. ' श्री. माणिक प्रभूंच्या चरित्रांत अशी एक गोष्ट आहे कीं कांहीं यवनांनीं त्यांची परीक्षा बघण्याचें ठरविलें व त्यांच्यापुढें मांसयुक्त अन्नाचें ताट, वर सुंदर आच्छादनें घालून आणून ठेविलें. श्री. माणिक प्रभूंनीं सर्वांच्या देखत तें आच्छादन काढून टाकण्यास सांगितलें व बघतात तों त्या ताटांत सुंदर मोठमोठालीं गुलाबाचीं फुलें सर्वांना दिसलीं.

आजच्या लेखाचा मुख्य भर आहे ' मदानुकरणावर. म्हणजे मदानें ज्याचें अनुकरण स्वतःच्या फायद्याकरितां केलें जातें, त्याला मी मदानुकरण असें म्हणतों व अशा अनुकरणांपासून सावध रहावें अशी सूचना देण्याकरितां हा लेख आहे; कारण आज काल पुष्कळ ठिकाणीं श्रीसाईबाबांचे उत्सव सार्वजनिकरीत्या साजरे केले जातात. पुष्कळ ठिकाणीं महाराजांचीं देवळें होऊन नित्य उपासनाक्रम चालू ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे व लक्षावधी लोक शिर्डीस जाऊन येत आहेत. त्या वेळेला ह्या संधीचा गैरफायदा घेणारीहि पुष्कळ मंडळी असतात हें विसरून चालणार नाहीं. ज्याप्रमाणें समाजांत हौशे, नवसे व गवशे अशी मंडळी असतात व जरी आपण एखाद्या धार्मिक कार्यक्रमाला गेलों अगर पवित्र मंदिरांत गेलों तरी आपली चीजवस्त आपण सांभाळलीच पाहिजे व खिसेकापूपासून सावध रहावयास पाहिजे, त्याचप्रमाणें, येथेंहि

# वाल्मिकी रामायणांतील आदर्श विभूति

**************************************

लेखक : **स. म. ठाकुर,** बी. ए. एल्. एल्. बी.

महामुनी वाल्मिकीनीं रामायणांत श्री रामचंद्रप्रभु व सीतामाई या त्यांच्या काळांत होऊन गेलेल्या आदर्श विभूतींचीं चरित्रें यथातथ्य रेखाटून जनतेपुढें आदर्श पुरुष व आदर्श स्त्री यांचे सर्वोत्तम नमुने कसे ठेविले आहेत, यासंबंधीचें सुंदर विवेचन या लेखात करण्यांत आलें आहे

श्री महामुनि वाल्मिकीप्रणीत रामायणांतील अगदीं सुरवातीचे पहिले पांच श्लोक खालीलप्रमाणें आहेत—

तपःस्वाध्यायनिरतं तपस्वी वाग्विदां वरम् ।
नारदं परिपप्रच्छ वाल्मीकिर्मुनिपुङ्गवम् ॥ १ ॥

को न्वस्मिन् सांप्रतं लोके गुणवान् कश्च वीर्यवान् ।
धर्मज्ञश्च कृतज्ञश्च सत्यवाक्यो दृढव्रत ॥ २ ॥

चारित्रेण च को युक्तः सर्वभूतेषु को हितः ।
विद्वान् कः कः समर्थश्च कश्चैकप्रियदर्शनः ॥ ३ ॥

आत्मवान् को जितक्रोधी द्युतिमान् कोऽनसूयकः ।
कस्य बिभ्यति देवाश्च जातरोषस्य संयुगे ॥ ४ ॥

एतदिच्छाम्यहं श्रोतुं परं कौतूहलं हि मे ।
महर्षे त्वं समर्थोऽसि ज्ञातुमेवंविधं नरम् ॥ ५ ॥

**—बालकाण्ड**

वरील श्लोकांचा अर्थ पुढीलप्रमाणें आहे.

**सर्वगुणसंपन्न कोण ?**

**अर्थ** :—स्वाध्याय करण्यांत तत्पर, शब्दब्रह्मतत्त्वज्ञान्यांमध्यें श्रेष्ठ आणि मुनीमध्यें वरिष्ठ अशा नारदांना वाल्मीकीमुनींनीं प्रश्न केला कीं, ' हे ( महर्षे ! ) या वेळीं या भूलोकावर गुणसंपन्न असा कोण आहे बरें ? तसेंच वीर्यवान्, धर्माचें रहस्य जाणणारा, कृतज्ञ, सत्यवचनी, धर्माकरितां स्वीकारलेल्या व्रताचा आपत्कालींहि त्याग न करणारा, सदाचरणसंपन्न, प्राणिमात्राच्या हिताविषयीं तत्पर, विद्वान्, समर्थ, दर्शन झालें असतां लोकांना अत्यंत आनंद देणारा, मनोनिग्रहि, क्रोधादिकांचें संयमन करणारा, तेजस्वी, परोत्कर्षाविषयीं मत्सर न धरणारा आणि युद्धकालीं क्रुद्ध झाला असतां देवांनाहि भीति उत्पन्न करणारा असा कोण आहे, हें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे, इतकेंच नव्हे,

परंतु तें श्रवण करण्याविषयीं मला पराकाष्ठेची उत्सुकता आहे आणि हे महर्षे! आपणच्चि अशा प्रकारचा पुरुष कोण आहे, हें जाणण्यास समर्थ आहांत.'

## नारदमुनींचें समर्पक उत्तर

अखिल मानव समाजाला उपयुक्त होईल असें एखाद्या आदर्श व्यक्तीचें चरित्र लिहिण्याची आद्यकवि वाल्मिकी यांना इच्छा झाली व म्हणून त्यांनीं त्रिखंड पृथ्वींत प्रवास व भ्रमण करणाऱ्या व त्यामुळें सर्व ठिकाणची प्रत्यक्ष खडानूखडा माहिती असणाऱ्या नारदमुनींना वरील श्लोकांत उल्लेख केलेल्या लोकोत्तर गुणांनीं युक्त अशा पुरुषोत्तमाचें नांव मला आपण सांगा अशी विनंति केली व क्षणाचाहि विलंब न लावतां नारदमुनींनीं 'श्री रामचंद्र प्रभु' हे वरील श्लोकांत उल्लेखिलेल्या सर्व गुणांनीं मंडित आहेत व ते अयोध्येंत राज्य करीत आहेत असें वाल्मिकींना उत्तर दिलें.

वर उद्धृत केलेल्या पांच श्लोकांपैकीं श्लोक क्रमांक दोन मधील 'सांप्रतम्' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. 'श्री वाल्मिकींना भूतकाळीं पूर्वी होऊन गेलेल्या व गतेतिहासांत व पुराणांत जमा झालेल्या अगर पुढें केव्हांतरी जन्मास येणार असें ज्याच्याबद्दल भविष्य वर्तविलें आहे अशा एकाद्या महाभागाची माहिती नको होती, तर वाल्मिकींच्याच काळीं या भूतलावर प्रत्यक्ष वावरत असलेल्या एखाद्या महान् व्यक्तीबद्दलचा त्यांचा तो प्रश्न होता व नारदमुनींनीं त्यावेळीं अयोध्येंत प्रत्यक्ष राज्य करीत असलेले श्रीरामचंद्र-प्रभू हेच सर्वगुणांनीं मंडित आहेत, असें उत्तर त्यांच्या प्रश्नास दिलें आहे.

## सर्वव्यापी रामचरित्र

श्रीरामचंद्रप्रभू व सीतामाई यांच्या चरित्रावर संस्कृत भाषेंत शेंकडोवारी ग्रंथ लिहिलेले आहेत. उदा०— वाल्मिकीरामायणाशिवाय (१) अध्यात्म रामायण (२) आनंद रामायण (३) स्कंद रामायण (४) ब्रह्मांड रामायण (५) भविष्योत्तर रामायण (६) मंत्र रामायण (७) अद्भुत रामायण वगैरे अशीं आणखी नव्वद रामायणें आहेत. त्यांशिवाय भासाचा अभिषेक व प्रतिभा या नाटकांत व कालिदासाच्या रघुवंश काव्यांत त्यांचीं चरित्रें आलेलीं आहेत व अशा तऱ्हेचे संस्कृत भाषेंतील शेंकडेवारी ग्रंथ श्रीरामचंद्र प्रभूच्या व सीतामाईच्या गुणवर्णनास वाहिलेले आहेत.

श्रीरामचंद्रप्रभू, त्यांचे बंधु लक्ष्मण व भरत, त्यांची पत्नी सीता, त्यांचा भक्त हनुमान वगैरेंनीं लोकांचीं मनें इतकी आकर्षून घेतलीं आहेत कीं त्यांचीं चरित्रें फक्त एकट्या संस्कृत भाषेंत अडकून न रहातां भरतखंडांतील इतर अनेक भाषांतून तीं वर्णिलीं आहेत. उदा० मराठी भाषेंत एकनाथाचें भावार्थ रामायण, मोरोपंतांचीं (१०८) एकशेंआठ रामायणें, मुक्तेश्वराचें रामायण, श्रीधराचा रामविजय व अगदीं हल्लीचे माडगुळकर कवींचें गीतरामायण, हिंदीभाषेंत तुलसीदासांचें रामचरितमानस, तामीळ भाषेंत कम्बन कवींचें रामायण, बंगाली भाषेंत कृत्तिभाष ओझा यांचें रामायण, आसामी भाषेंत दुर्गादास यांचें रामायण, असे भारतांतील निरनिराळ्या भाषेंत

रामचरित्रावर अनेक ग्रंथ झाले आहेत. चिनीभाषेंत बौद्ध रामायण नांवाचा एक ग्रंथ आहे. रोमेशचंद्र दत्त, श्री. राजगोपालाचारी वगैरेंनीं इंग्रजींत रामायणावर पुस्तकें लिहिलीं आहेत. एन्. चंद्रशेखर अय्यर यांनीं रामायणावर जें इंग्रजींत पुस्तक लिहिलें आहे त्यावरील प्रस्तावनेंत त्याचप्रमाणें आपल्या 'डिस्कव्हरी ऑफ् इंडिया' या पुस्तकांत भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी रामायणाची मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे. यावरून रामायणाचा विस्तार केवढा मोठा आहे याची कल्पना वाचकांना येईल.

## सीतामाईचें खरेंखुरें दर्शन

वर उल्लेख केलेले रामचरित्रावरचे शेकडो ग्रंथ, व वाल्मीकिरामायण, यांत एक अत्यंत महत्त्वाचा फरक आहे. वाल्मीकि-रामायण हें श्रीरामचंद्रप्रभूंच्याच कारकीर्दींत, ते हयात असतांनाच वाल्मीकि मुनींनी लिहिलें असल्यामुळें, श्रीरामचंद्रप्रभु, सीतामाई, भरत, लक्ष्मण, हनुमंत, बिभीषण वगैरेबद्दलची त्या रामायणांत आलेली माहिती ही वास्तवतेला धरून, प्रत्यक्षांतली आहे. त्यांत रामचंद्रप्रभूंची नुसती स्तुतीच नसून ज्या घटनांबद्दल त्यांना लोक दोष देतील असे वालीवध, सीतात्याग वगैरे प्रसंगही वाल्मीकीनी वर्णिले आहेत. अशा तऱ्हेनें वास्तवतेला, व प्रत्यक्ष वस्तुस्थितीला धरून वाल्मीकिरामायण असल्यामुळें त्यामध्यें आलेलें सीतामाईचें चरित्र एखादा कादंबरीकार आपल्या कादंबरींत, एखादा नाटककार आपल्या नाटकांत एखादा कवि आपल्या काव्यांत आपल्या नायकाची अगर नायिकेची भूमिका उत्कृष्ट दिसावी म्हणून आपल्या बुद्धिकौशल्यानें वाटेल तशी ती रंगवितो, तशा तऱ्हेचें व कल्पनेच्या व भावनेच्या भराऱ्यांवर आधारलेलें एखाद्या नायिकेचें वर्णन नसून, सीतामाई जशी खरोखरच होती तसें दर्शन आम्हांला सदर रामायणांत मिळतें. त्यामुळें वाल्मिकी-रामायणांतील सीतामाईच्या चरित्रास एकप्रकारचें विशेष व अद्वितीय महत्त्व आलेलें आहे व म्हणून अखिल भारतवर्षांतील पांचसहा वर्षांच्या लहान अर्भक बालकापासून शतायुपद गांठलेल्या वृद्धांपर्यंत प्रत्येकाला, त्याचप्रमाणें गरिबीच्या व हाल-अपेष्टांच्या अंतिम सीमेला पोहोंचलेल्या व ज्यांना रहावयाला ना घर ना दार, खायला ना मीठ ना भाकर, पांघरायला ना घोंगडी ना कांबळी अशा 'शय्या भूमितलम् दिशो ऽ पिवसनम्' स्थितींत हालअपेष्टा सोसणाऱ्या गरीब दीनदुबळ्यांपासून ज्यांच्यावर अनंत हस्तानीं कमलावरानें सुखसमृद्धीची खैरात केली आहे, अशा भाग्यवान् लोकांपर्यंत प्रत्येकाला, त्याचप्रमाणें पूर्वजन्मार्जित खडतर प्राक्तनामुळें व या जन्मांतील दारिद्र्य, आळस, प्रतिकूल परिस्थिति वगैरे कारणामुळें ज्यांना सरस्वतीदेवीचें पाठमोरेंहि दर्शन झालेलें नाहीं अशा निरक्षर अज्ञानी, निर्बुद्ध लोकांपासून ज्यांनीं आपल्या विद्वत्तेनें त्रिखंडकीर्ति संपादन केलेली आहे अशा सरस्वती देवीच्या गळ्यांतील रत्नमालेंतील कोहिनूर हिऱ्याप्रमाणें चमकणाऱ्या प्रतिभावान् विद्वान् श्रेष्ठांपर्यंत प्रत्येकाला, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे काश्मीरांतील लडाख प्रांतापासून कन्याकुमारीपर्यंत व द्वारकेपासून

ब्रह्मदेशापर्यंत पसरलेल्या या अफाट आर्यावर्तातील प्रत्येक आर्याला जिची माहिती आहे व जी प्रत्येक भारतीयाच्या आदराला पात्र झालेली आहे, अशा चिरस्मरणीय स्त्रीदेवतेचें नांव कोणी विचारल्यास प्रत्येक भारतीय अभिमानानें तात्काळ सीतामाईचेंच नांव सांगत आला आहे, सांगत आहे व पुढेंही खात्रीनें सांगत राहील.

## श्रीराम व सीता अवतारी होतीं काय?

येथें एका मुद्याचा विचार करणें जरूर आहे. तो मुद्दा म्हणजे श्रीरामचंद्रप्रभु व व सीतामाई हे परमेश्वराचे अवतार होते कीं काय हा होय. (१) वाल्मिकीनीं केलेलें श्रीरामाचें वर्णन हें एखाद्या अवतारी विभूतीचें नसून तुमच्या आमच्यासारख्या मानवाचेंच आहे. या मुद्याचा विचार करतांना पुढील बाबी लक्षांत घेणें जरूर आहे. (२) श्रीरामचंद्रप्रभूशीं त्यांचा पिता दशरथ, आई कौसल्या, पत्नी सीता, बंधु लक्ष्मण—भरत वगैरे त्यांच्या अगदीं जवळच्या नात्यांतील लोकांचें वागणें मनुष्यामनुष्यांतील वागण्याप्रमाणेंच वर्णिलें आहे. (३) या लेखाच्या सुरवातीला जे पांच श्लोक दिले आहेत, त्यांत वाल्मिकींनीं नारदाला केलेला प्रश्न हाहि सदर श्लोकांत उल्लेखिलेल्या अनेक गुणांनीं मंडित असा गृहस्थ सांप्रत कोण आहे, असाच आहे. (४) सदरच्या पांच श्लोकांतील अखेरच्या म्हणजे पांचव्या श्लोकामधले शेवटचे दोन शब्द 'एवंविधं नरम्' असे आहेत. या नर शब्दावरूनही वाल्मिकीचा प्रश्न परमेश्वराच्या एखाद्या अवताराबद्दलचा नसून एखाद्या मनुष्याबद्दलचाच होता असें स्पष्ट दिसतें. (५) लंकाधिश रावणानें मोठें तप करून आपला वध कोणाकडूनहि होणार नाहीं असा वर ब्रह्मदेवाकडून प्राप्त करून घेतला होता. तो मानवजातीला अगदीं क्षुद्र समजत असे. त्यांच्याकडून आपल्याला कधींकाळीं भय प्राप्त होईल असें त्याच्या स्वप्नींहि आलें नव्हतें व अवध्यत्वाचा वर मागतांना मानवजातीचा विचार अगर उल्लेख करण्याची त्याला गरज भासली नाहीं.

## एक मानव होते याला आधार

राम व रावण यांमध्यें जें युद्ध झालें, त्या युद्धासारखें युद्ध त्यापूर्वी अगर त्यानंतर अजूनपर्यंत कधींहि झालें नसल्यामुळें सदर युद्धाचें वर्णन 'रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव' असें नेहमीं करतात. आपल्या शत्रूंना त्राहिभगवान् करणाऱ्या, तेहत्तीस कोटी देवांना बंदिवासांत घालणाऱ्या, तपानें व यज्ञानें ऋषि व मुनि परमेश्वराला प्रसन्न करून घेतील, व त्यामुळें पुढें त्यापासून त्रास होईल तसा त्रास होऊं नये म्हणून मुळांतच ऋषिमुनींच्या तपांत व यज्ञांत विघ्न आणणाऱ्या, परस्त्रियांचें हरण करणाऱ्या, आसुरी वृत्तीच्या लंकाधीश रावणाबरोबर श्रीरामचंद्रप्रभूंनी घनघोर युद्ध केलें व त्या युद्धांत रावणाचा पराभव करून वध केला. रावणाचा वध, मनुष्याखेरीज इतर कोणाकडूनहि होणार नव्हता. व म्हणूनच तो वध करणारे श्रीराम हे मनुष्यच असले पाहिजेत. (६) श्रीरामचंद्रप्रभु हे स्वतःला परमेश्वराचा अवतार न मानतां मनुष्ययोनींतील एक इसम असें

मानीत असत. युद्धकांडांतील सर्ग ११७ मधील श्लोक, क्रमांक १२ तील पहिली ओळ खालीलप्रमाणें आहे—

" आत्मानं मानुषं मन्ये रामं दशरथात्मजम्। "

अर्थः—"मी स्वतःला दशरथपुत्र मनुष्य असल्याचें समजत आहें." या सर्व कारणांवरून श्रीरामचंद्रप्रभु व त्यांच्याबरोबर सीतामाई या मूळच्या परमेश्वराच्या अवतारी विभूति नसून तुमच्या आमच्यासारख्या मनुष्ययोनींतीलच व्यक्ति होत्या व त्यांनीं पुढें आपल्या अंगच्या लोकोत्तर गुणांनीं 'नर करनी करे तो नरका नारायण हो जाय' ही म्हण सार्थ करून देवत्व प्राप्त करून घेतलें होतें असें दिसून येईल.

श्रीरामचंद्रप्रभु व सीतामाई यांना पुष्कळ लोक परमेश्वराचे अवतार मानतात व त्यांच्या अंगचे गुण म्हणजे अवतारी विभूतीच्या अंगचे गुण असें समजतात व मग अवतारी विभूतीचे गुण आम्हां सामान्य जनांस कसे प्राप्त होणार असे विचार मनांत आणून त्या गुणांबद्दल विशेष विचार करण्याचा, त्यांचें अनुकरण करण्याचा व ते आत्मसात् करण्याचा प्रयत्नच करीत नाहींत. लोकांत पसरत असलेल्या अवताराबद्दलच्या या गैरसमजुतीचें उच्चाटन व निराकरण व्हावें व श्रीरामचंद्रप्रभु व सीतामाई अशा थोर व्यक्तींच्या गुणांचें अनुकरण न करण्याच्या वृत्तीला आळा पडावा व त्यांच्या चरित्राकडे पहाण्याच्या लोकांच्या दृष्टिकोनाला इष्ट वळण लागावें ह्या हेतूनें श्रीरामचंद्रप्रभु हे परमेश्वराचे अवतार होते कीं काय याबद्दलचें हें विवेचन मुद्दाम केलें आहे.

---

एक डुबकी मारून रत्न हातीं लागलें नाहीं, म्हणून समुद्रास रत्नहीन मानूं नकोस व निराग्रही होऊं नकोस. डुब्या मारतां मारतां रत्न हातीं लागेलच. थोड्यशा साधनानें ईश्वर प्राप्त होत नाहीं, याची जाणीव ठेवून धैर्यपूर्वक भजन—पूजन चालू ठेव. यथासमय तुझ्यावर ईश्वर कृपा करील.

— श्रीरामकृष्ण

ARSA PRODUCTS

ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण होलसेल व रिटेलर्स

# रामायण महाकाव्याचा नायक
# राम कीं भरत?

'रामायणांतील राम चारित्र्य गुणांच्या समुच्चयाचा
असा आदर्श पुरुष आहे कीं तो म्हणजे तोच'

—प्रा. न. र. फाटक.

[ लेखक – प्रा. **आबासाहेब शेट्ये**, बी. ए., एलूएल्. बी. ]

**या** लेखाच्या मथळ्यांत जो प्रश्न आहे, त्याचें अचूक उत्तरहि एकाच वाक्यांत, त्या पुढील अवतरणांत आहे! अवतरणांतील हें वाक्य, नवभारत प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित झालेल्या श्री. नाना अभ्यंकर लिखित 'महामुनी वाल्मिकी प्रणीत रामायण' या ग्रंथांतील प्रा. फाटक यांच्या प्रस्तावनेंतील आहे.

पण, वस्तुतः हा प्रश्नच कां उत्पन्न व्हावा? कारण, रामायणांतील रचनाच मुळीं इक्ष्वाकु कुळांत जन्मलेल्या 'सर्वगुणसंपन्न' रामाची कथा सांगण्यासाठीं झालेली आहे. आणि इथूनच या महाकाव्याची सुरवात आहे. 'मुनीश्रेष्ठ नारदानीं वाल्मिकी मुनीना प्रश्न केला कीं, 'या मृत्युलोकांत सर्वगुण संपन्न' अशी व्यक्ति कोण आहे?' त्यावर नारदमुनी म्हणाले, 'इक्ष्वाकु वंशांत जन्मास आलेला राम हा एकच सर्वगुणसंपन्न आहे. असें म्हणून नारदांनी त्याना रामाचें समग्र चरित्र सांगितलें, आणि त्याच आधारें, पुढें वाल्मिकी मुनींनी जी कथा रचिली, तेंच हें रामायण! मग या कथेचा नायक राम आणि नायिका सीता नव्हे तर कोण?

## कथेचा नायक राम कसा?

पण, ही झाली भोळी भाबडी भाविक दृष्टि! वाङ्मयीन समीक्षणाच्या कसोटीनें पाहाणाऱ्या आधुनिक समीक्षकांपैकीं साऱ्यांनाच हें पटावें कसें? आणि तें त्यांना तसें पटलें नाहीं तर सर्वस्वी हा त्यांचाच दृष्टीदोष आहे, असें तरी कसें म्हणतां येईल? कारण तसा आभास निर्माण व्हावा, अशीच मुळांत हीं तुल्यबल स्वभावचित्रें या महाकाव्यांत चित्रित केलेलीं आहेत हें नाकारतां येत नाहीं. दाशरथी रामाचे बंधु – लक्ष्मण आणि विशेषतः भरत या व्यक्ति रामाच्या बरोबरीनें चमकणाऱ्या आहेत. या प्रत्येक व्यक्तिमध्यें स्वभावाचा भेद असूनही, रामचरित्राच्या विकासांत गुणांच्या अंगानें त्यांना महत्वाचें स्थान आहे. लक्ष्मण हा संपूर्णतः आज्ञाधारक आणि भरत तर संपूर्ण त्यागी आणि सेवाधारी स्वार्थत्यागाचा पुतळाच जणुं! यामुळेंच कांहीं मार्मिक समीक्षकांना रामायणाचा नायक राम कीं भरत, असा प्रश्न पडून, कांहींनी नायकत्वाची माळ भरताला अर्पण केल्याचें लेख विविधज्ञान विस्तारांच्या जुन्या फायली चाळल्या असतां आढळून येतील!

## उघड निष्कर्ष

सूर्यग्रहमालेंत सूर्याभोंवतीं फिरणारे ग्रह आणि उपग्रह यांचें तेज स्वयंभू नसून ज्या सूर्याभोंवती ते फिरतात त्या सहस्ररश्मी 'तेजोगोल' सूर्याच्या तेजानेंच ते नभोमंडळांत तळपत असतात. तद्वत् रामायणाच्या रामकथेंत रामाभोंवतीं त्याच्या सेवेच्या आणि आशेच्या कक्षेंत त्याच्याच बरोबरीनें चमकणारे त्याचे उभय बंधु यांची चमकहि स्वयंभू नसून ती अंशभूत कथासूत्राधारें श्रीरामचंद्रापासूनच त्यांना प्राप्त झालेली आहे. अर्थात्, ही व्यक्तिचित्रें स्वयंभू नसून पूरक अशींच आहेत, हें सूक्ष्म विचारान्तीं पटण्यासारखें आहे. आपण भरताचेंच उदाहरण घेऊं. भरत हा त्यागाचा आदर्श पुतळा आहे. कैकेयीनें, त्याच्या मातेनें सापत्न मत्सरानें, पतीकडून वर मागून रामाला वनवास आणि भरताला राज्याभिषेकाची अनुज्ञा दशरथाकडून मिळविली. पण भरतानें राज्यलाभाच्या लोभाला बळी न पडतां वनवासांत असलेल्या प्रभु रामचंद्राला भेटून अयोध्येस परत येण्याची व राज्याभिषेक करून घेण्याची विनंति केली, त्यावेळीं रामानें त्याला नकार दिला आणि म्हटलें, 'आपल्या पित्याच्या आज्ञेप्रमाणें अयोध्येच्या राज्याचा स्वीकार तुलाच केला पाहिजे. पित्याला मी तसें **वचन दिलें आहे आणि तें पाळणें हा माझा धर्म आहे.'** या कथासूत्रांतील भरताचा स्वार्थत्याग अलौकिक आहे – डोळे दिपवून टाकणारा आहे, हें अगदीं सत्य आहे. पण भरताच्या त्यागाचा हा प्रसंग सत्यप्रतिज्ञ रामाच्या एकवचनी बाण्याच्या मूळ प्रसंगाला उठाव आणणारा पूरक असाच आहे हेंही तितकेंच सत्य आहे! भरताच्या त्यागांत चमक आहे. पण ती स्वयंभू नसून रामाच्या एकवचनी बाण्याला पूरक अशीच ती आहे, असें तरी मी मानतों. भरतानें आपल्या कुटिल मातेच्या इच्छेप्रमाणे स्वतःला राज्याभिषेक करून घेऊन भाऊबंदकी साधली असती तर भरताची कथा तिथेंच संपून तो चारित्र्यानें पडला असता आणि एकवचनी रामाचा एकवचनी बाणा दाखविणारा प्रेरक प्रसंग न मिळून रामकथेंतील रामाच्या चारित्र्याला उठाव मिळण्याचा प्रसंगही गमावला गेला असता, अशा या उभयान्वयी घटना आहेत. आणि दोन्हीं घटनाकडे या दृष्टीनें पाहिलें असतां माझा वरील निष्कर्ष कुणालाहि पटेल इतका तो उघड आहे, असें मी मानतों.

आतां रामाचें प्रभुत्व भरताच्या स्वतःच्या दृष्टिकोनांतून काय आढळतें तें पाहूं. लक्ष्मण आणि सीता यांच्यासह राम वनवासास निघाले तेव्हां भरत अयोध्येंत नव्हता. तो राजधानींत आल्यावर पित्याच्या मृत्यूचें आणि बंधूच्या वनवासाचे वृत्त कानीं येतांच त्याचा क्रोध अनावर होऊन, तो आपल्या मातेला भेटला, तो तिचा धिःकार करून आणि अभिषेकाचा इन्कार करून म्हणाला, 'मी तुझी दुष्ट इच्छा कधींच पुरी करणार नाहीं. मी असाच रामाला वनांतून परत आणतों. **मी रामाचा दास होऊन राहीन.** तूंच अरण्यांत निघून जा. अमोघ पराक्रमी आणि सर्वगुणसंपन्न राम राज्यावर आला, म्हणजे तुझ्यामुळें मला लागलेला हा कलंक नाहींसा होऊन मी कृतकृत्य होईन.' हे त्याचे उद्गार प्रभु रामचंद्राविषयीं त्याच्या ठायीं असलेल्या आदराचें द्योतक होत. आणि हा आदरहि त्याला आपल्या ज्येष्ठ बंधूविषयीं निकट सान्निध्यानें वाटत असलेल्या प्रभुत्व निष्ठेमुळेंच होय!

मग प्रभु रामचंद्राचें प्रभुत्व भरताच्या तत्कालीन दृष्टीनें पहावयाचें कीं विद्यमान समीक्षकांच्या शाब्दिक कोटीक्रमानें ठरवावयाचें ?

**दोन आक्षेप**

अव्वल इंग्रजी राजवटींतील कांहीं तथाकथित विद्वानांनीं रामकथेंतील रामाच्या चारित्र्यासंबंधीं जे अनेक आक्षेप घेतले आहेत, त्यांतील माझ्या मतें दोनच ठळक आहेत —विचाराई आहेत. एक सीता—त्याग, आणि दुसरा वाली—वध.

चौदा वर्षांचा वनवास संपवून, आणि लंकेंत रावणाचा वध करून सीता—भाईसह प्रभुरामचंद्र पुष्पक विमानानें अयोध्येस आल्यावर, आप्तजनांकडून आणि प्रजाजनांकडून यथोचित सुस्वागत होऊन, राज्याभिषेक विधीही मोठ्या थाटांत झाला आणि अयोध्येंत रामराज्य सुरू झालें! आनंदीआनंद झाला. पण याला कांहीं वर्षें लोटली नाहींत तोंच, रावणाच्या बंदिवासांत असलेल्या सीतेचा रामानें स्वीकार केला, याबद्दलचा लोकापवाद त्याचे कानीं येऊन रामानें तिचा त्याग केला आणि लक्ष्मणाकरवीं तिला पुनश्च वनवासांत धाडलें. लंकेहून निघतांना अग्निदिव्य करून आपलें पावित्र्य तिनें पटविलें असतांही रामानें एका रजकाच्या म्हणण्यावरून तिचा त्याग करावा, हा रामाच्या चारित्र्याला एक कलंक आहे, डाग आहे. हा पूर्वपक्ष आहे. पण याला उत्तर म्हणूनहि विविध ज्ञान विस्तारांत जे लेख आले आहेत, त्यांतील मे सन १९२१ च्या अंकांत '**श्रीराम चरित्रांतील एका प्रसंगाचा खुलासा**' म्हणून श्री. सखाराम जगन्नाथ भागवत यांचा जो लेख आला आहे त्याचा सारांश —

'श्रीरामचंद्रांनीं रजकाच्या म्हणण्यावरून सीतात्याग केला असा एक आक्षेप आहे. पण वाल्मिकी रामायणांत याला मुळींच आधार नाहीं. अध्यात्म रामायण, रघुवंश, किंवा उत्तर रामचरित् यामध्येंसुद्धां तसा उल्लेख नाहीं. वाल्मिकी रामायणाच्या उत्तरकांडांतील त्रैचाळिसाव्या सर्गांत 'जनापवाद' आला आहे. त्यांत लोक काय म्हणतात, तें मला सांग असें श्रीरामांनी आपल्या भद्र नामक हेराला विचारलें असतां त्यानें लोकापवाद त्यांचे कानीं घालून शेवटीं —

'अस्माकमपि दारेषु सहनीयं भविष्यति'
यथा हि कुरुते राजा प्रजास्तमनुवर्तते।

अशी लोकवार्ता त्यानें राजाच्या कानीं घातली असें वाल्मिकी रामायणांत आहे. त्यावरून खालील निष्कर्ष निघतो कीं — (१) श्रीरामचंद्रावर एकट्या व्यक्तीचा आक्षेप नसून सर्व प्रजेनें त्यांत भाग घेतला होता. (२) राजाच्या वर्तनाप्रमाणें प्रजावर्तन करण्याचा संभव होता. अर्थात् समाजाचा धर्म सुटण्याची भीति होती. (३) या सर्व कारणामुळें **श्रीरामचंद्रांनीं सीतेचा जो त्याग केला, त्यांत अयोग्य असें कांहींच नव्हतें.**' या आक्षेपाला हें उत्तर, अशी ही दुसरी बाजू आहे.

**श्री वरेरकरांची भूमिकन्या सीता**

खासदार सर्वश्री **मामा वरेरकर** यांनींही याच सीता त्यागाच्या प्रसंगावर '**भूमिकन्या सीता.**' या नांवाचें नाटक लिहिलें आहे. या नाटकांत मामांनीं आपल्या

आजपर्यंतच्या नाट्य लेखणीचा परमोश्च बिंदु साधला आहे. प्रचलित पौराणिक कथानकांबद्दल आणि कथानायकाबद्दल सर्व सामान्य जनतेची जी भावना असते, ती न दुखवतां, आपला विशिष्ट दृष्टिकोन मांडणें हें थोडें फार धाडसाचें असतें. प्रभु रामचंद्रांबद्दल तर ही भावना जनमनांत इतकी मूळ धरून बसली आहे कीं, प्रतिव्रता सीतेचा त्यानें केलेला त्याग हाही त्याच्या प्रभुत्वाचा विशेष समजला जातो. पण पति म्हणून ( राजा म्हणून नव्हे ) त्याच्या हातून घडलेल्या या अपराधाबद्दल उर्मिलेनें त्याची केलेली निर्भत्सना मामानी एवढ्या कौशल्यानें व धिटाईनें व्यक्त केली आहे कीं प्रभुरामचंद्राबद्दलच्या पूज्य भावनेला यत्किंचितही धक्का न पोचतां उलट बिकट परिस्थितींत सांपडलेल्या रामचंद्राबद्दल सहानुभूतीच निर्माण होते.' या ग्रंथ-प्रकाशकाच्या मताशीं मी सहमत आहे.

तरीही मामांनीं संयम राखून का होईना, पण उर्मिलेच्या तोंडीं कांहीं वाक्यें घालून, आपलें चिमटे घ्यायचें नाट्यकौशल्य दाखवलेंच आहे. मामांची ही उर्मिला म्हणजे ( सोन्याच्या कळसांतील ) दुसरी बिजलीच होय. 'उभ्या रामायणांत आपल्याला अनुल्लेखानें मारल्याबद्दल वाल्मिकीची, त्याच्या समोर उभी राहून जशी हजेरी घेतली आहे, तसेंच तितक्याच कठोर शब्दांत तिनें रामालाहि-स्त्रीजातीचा कैवार घेऊन चार शब्द सुनावले आहेत! एक गोष्ट मान्य करणें भाग आहे कीं मामांनीं या नाटकांत एकांगी टीकास्त्र उचललें नाही. उर्मिलेच्या तोंडी बुद्धिवादाला पटतील अशा कांहीं शंका आणि असें कांहीं आक्षेप सूचित केले असले, तरी अखेर रामांनीं दिलेल्या उत्तरांत शंकानिरसन आणि आक्षेपसमर्थन होईल अशी दुसरी बाजूहि दिली आहे. प्रश्न असा आहे कीं लोकापवाद कानीं घेऊन लोकाराधनासाठीं सीतेचा त्याग केला कीं अग्निदिव्य झालें तरीहि तिच्या पावित्र्याबद्दल त्याला शंका होती, त्याच्या मनांत किंतु होता म्हणून त्यानें तिचा त्याग केला? शंकेचा हा प्रश्न मामांनीहि आपल्या नाटकांत अंक ४ मध्यें उत्पन्न केला आहे आणि त्याचें उत्तरहि रामाच्या तोंडी घातलें आहे—

'उर्मिला—अजूनसुद्धां अयोध्येच्या सम्राटाला शंका वाटते का या माझ्या भगिनीची?

राम—मला केव्हांच शंका वाटत नव्हती. शंकानिरसन झालें पाहिजे तें माझें नव्हे. लोकांचें-माझ्या पौरजनांचें. लोकांचा सेवक म्हणून रामानें धुरा वाहिली आहे या रामराज्याची, त्या लोकांचें समाधान झालें पाहिजे. सीतेनें लंकेंत दिव्य केलें, मी तिचा स्वीकार केला तरीहि लोकनिंदा थांबली नाहीं. लोकापवाद दुस्तर आहे म्हणूनच या भूमीकन्येचा मी त्याग केला.' असें म्हणून या अपराधाबद्दल त्यानें वाल्मिकीमुनींची क्षमा याचिली.

### पटण्यासारखा निष्कर्ष

एवंच, पूर्ण विचारांन्तीं, सीतात्यागासंबंधीं भाविकच नव्हे तर तार्किक मनालाहि हाच निष्कर्ष पटतो कीं, रामानें सीतेचा त्याग केला तो तिच्या पातिव्रत्याबद्दल अगर पावित्र्याबद्दल मनांत कांहीं किंतु बाळगून शंकित मनानें नव्हे तर भवभूतीच्या

उत्तर रामचरित्रांत—'लोकराधनासाठीं वेळ आलीच तर (यदि वा जानकीमपि)—जानकीचाहि त्याग करून मी माझें व्रतपालन करीन' ही केलेली प्रतिज्ञा पुरी करण्यासाठींच केला. या विधानाच्या पुष्टीसाठीं वाल्मिकी रामायणांतूनच अनेक प्रमाणें दाखवून देतां येतील. पण इथं फक्त दोनच देतों. (१) रघुकुलांत बहुपत्नीत्वाची चाल होती. दशरथाला तीन भार्या होत्या. पण रामानें सीतेवरच्या निस्सीम प्रेमानें सीतात्यागानंतरही पुनः विवाह केला नाहीं. (२) भूमिकन्या सीता अखेर भूमिगत झाल्यावर रामाला अनिवार दुःख झालें. आणि डोळ्यांत आसवें आणून तो म्हणाला, 'हे भूदेवी, तूं माझी सासू आहेस. तेव्हां बऱ्या बोलानें माझी सीता मला परत दे; नाहींतर तिच्याप्रमाणेंच तिच्यासोबत मलाहि उदरांत घे. तिला सासरीं तरी पाठव अगर मला तिच्या माहेरी घरजांवई म्हणून घे. ती पाताळांत असो वा स्वर्गांत असो, मी तिच्यासह वास्तव्य करणार.' मनांत किंतु असलेल्या शंकित मनाच्या पतीच्या तोंडून हे उद्‌गार निघतील का! एवंच हा आक्षेप फोल आहे.

**वालीवधाचा आक्षेप**

आतां दुसरा आक्षेप—वालीवधाचा. तोहि तसाच फोल आहे. सीतेच्या शोधार्थ राम दक्षिणेकडे वळल्यावर अखेर लंकेंत बिभिषणाची बाजू घेऊन त्यानें रावणवध केला. याला बलवत्तर कारण होतें. पण किष्किंधा नगरींत त्यानें सुग्रीवाची बाजू घेऊन त्यानें जो वालीचा वध केला, त्याला कांहींच कारण नव्हतें. त्याचें समर्थन करतां येणार नाहीं असा हा आक्षेप आहे. पण त्याचें समर्थन वाल्मिकीमुनींनीं रामाच्या तोंडून महाकाव्यांत केलें आहे, तिकडे मी वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. रामाच्या बाणानें घायाळ होऊन वाली जमिनीवर कोसळला तेव्हा म्हणाला—'या क्षणापर्यंत मी तुझा कोणताहि अपराध केला नसतां तूं कपटानें माझा वध कां केलास?' त्यावर रामानें उत्तर दिलें, 'मी तुझा वध का केला, ऐक. कनिष्ठ भ्राता, औरस पुत्र व गुणी शिष्य यांना पुत्राप्रमाणेंच मानलें पाहिजे, असें धर्म सांगतो. या सनातन धर्माचा त्याग करून, तूं आपल्या भ्रात्याच्या राज्याचाच नव्हे तर भार्येचाहि अभिलाष धरलास—या तुझ्या पातकाबद्दल हा देहदंड आहे.' हे शब्द कानीं येतांच तो देहभानावर येऊन उद्गारला—'प्रभू रामचंद्रा, डोळे मिटतांना तूं माझे डोळे उघडलेस—तुझ्या हातून मला मृत्यू येत आहे तरी अपराधी—पापी असूनहि मला मोक्षच मिळेल! राम...राम...' म्हणत त्यानें प्राण सोडला. तों तात्काल रामानें पुढें होऊन, रावणाच्या वधानंतर जसें रावणाच्या शवाला, तद्वत् यावेळींहि वालीच्या शवाला लवून वंदन केलें! आणि म्हटलें, '**मरणान्तानि वैराणि**' (वैर फक्त मरणापर्यंतच रहातें. नंतर नाहीं.) वालीवधाचा आक्षेप घेणाऱ्या टीकाकारांचें वाली वधानंतरच्या या घटनेकडे मी लक्ष वेधूं इच्छितों. कारण, या घटनेंतच रामाचें रामपण आहे! प्रभूत्व आहे!

रामायणांत रामाच्या तोंडी अशीं ही अनेक हितोपदेशाचीं बोधवचनें आहेत म्हणूनच या महाकाव्यांत राम आहे!

असा हा राम रामायणाचा नायक नव्हे तर कोण!

या महाकाव्याचा नायक—एकमेव रामच!

---

# हींच राघवा हींच पैंजणें

लेखिका — डॉ. सौ. चारुशीला गुप्ते,
एम. ए. पी. एच्. डी.

'प्रभू, हीं पहा वहिनींचीं पैंजणें.' अरण्यपथावर पडलेलीं सीतामाईचीं पैंजणें पाहून लक्ष्मण श्रीरामाला म्हणाला. प्रभू रामचंद्राच्या अंतःकरणांतील साऱ्या मृदु भावना त्या पैंजणांच्या दर्शनानें हेलावून निघाल्या. सीतादेवीचा शोध लागण्याचा हा एक मार्ग उपलब्ध झाला; या आशेनें त्यांचें मन पुलकीत झालें. म्हणूनच रामचरित्रांत या पैंजणांना महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. आपल्यापेक्षां ज्ञानानें, मानानें व वयानें ज्येष्ठ असलेल्यांच्या पुढें खालच्या मानेनें उमे राहण्याची रीत ज्या कालांत लोकव्यवहारांत प्रचलित होती त्या काळाचा लक्ष्मण हा प्रतिनिधी! आपल्या वडील भावजयीकडे त्यानें कधीं वर मान करून पाहिलें नव्हतें. खालच्या मानेनें हुकूम बजवायचा एवढेंच त्याला ठाऊक! म्हणूनच हीं पैंजणें म्हणजे लक्ष्मणाच्या विनम्रतेचें जणूं काय प्रतीकच!

केवळ ही विनम्रताच नव्हे तर आज्ञापालन, सत्यप्रियता, संयम, सहनशीलता इ. मानवी जीवनाला भूषणभूत होणाऱ्या अनंत गुणांच्या समुच्चयाचा रामायणांत आढळ होतो. रामायणांतील साऱ्या प्रमुख व्यक्ती मानवी जीवनाचे अखंड आदर्श आहेत. म्हणूनच आदिकांडांत 'सर्व गुणसंपन्न मनुष्य कुठें आहे कां?' असा जेव्हां वाल्मिकीनें नारदाला प्रश्न केला तेव्हां नारदानें चटकन् उत्तर दिलें—

देवेष्वपि न पश्यामि कंचिदेभिर्गुणैर्युतम्
श्रूयतां तु गुणैरेभिर्यो युक्तो नरचन्द्रमाः ॥

अशा सर्व श्रेष्ठ नरपुंगवाची जीवनकथा म्हणजेच रामायण काव्य होय. रामचंद्रप्रभू जरी श्रीविष्णूचा अवतार मानला गेला असला तरी जीवनाच्या विविध टप्प्यावरील प्राप्त कर्तव्यें पार पाडून तो आपल्या अंगच्या उत्तम गुणांमुळें देवस्वरूप झाला असेंच म्हटलें पाहिजे.

### सत्यनिष्ठ व एकवचनी

सत्यनिष्ठ व एकवचनी माणसांना बोलल्याप्रमाणें अक्षरशः वागायचें असल्यामुळें स्वतःच्या शब्दांची किंमत प्राणापेक्षाहि अधिक वाटते. अशा व्यक्तींना दुसऱ्यांच्या शब्दांचीहि किंमत कळते. म्हणून श्रीरामानें, पित्यानें कैकयीला दिलेलें वचन पूर्ण करण्याकरितां आपल्या नवपरिणित वधूबरोबर वनवासाचें दुःख भोगलें.

रामायणाचें खरें मर्म त्यांतील आदर्श कुटुंबव्यवस्थेंत आहे. पितापुत्र, मातापुत्र, बंधुबंधु, पतीपत्नी, धनिसेवक, राजा व प्रजा यांच्या परस्परांमधील धर्म, प्रीति व निष्ठेच्या

बंधनाचें नाजूक पण अत्यंत व्यापक स्वरूप रामायणांत पहावयास मिळतें. इतकेंच नव्हे तर रविंद्रनाथ टागोरांनीं आपल्या एका लेखांत म्हटल्याप्रमाणें रामरावणाच्या युद्ध प्रसंगाचा भाग रामसीतेच्या दांपत्यप्रेमाचें उज्वल स्वरूप दर्शविण्यासाठींच निमित्तमात्र झाला आहे. उत्तम गृहस्थाश्रमचा आदर्श लोकांपुढें ठेऊन जीवनाला घाट द्यावयाचा हा या काव्याचा उद्देश, तसेंच रामचंद्राच्या अवतार कार्याचें ध्येय आहे.

## गृहस्थाश्रमाचें अलौकिक स्वरूप

आम्हां भारतीयांच्या जीवन परंपरेंत गृहस्थाश्रमाला अपार महत्व आहे. ' सर्वे सुखिनः सन्तु ' हें तर आमच्या संस्कृतीचें ध्येय वाक्य ! गृहस्थाश्रम वैयक्तिक सुखचैनी-साठीं नसून त्याचें योग्य परिपालन इतर आश्रमांच्या परिणतीसाठीं कसें करावयाचें, हा धडा प्रभु रामचंद्रानें आम्हांला शिकविला. त्यागवृत्तीच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीशीं संघर्ष करून व वनवासाचें खडतर दुःख भोगून श्रीरामानें गृहस्थाश्रमाला अलौकिक स्वरूप प्राप्त करून दिलें. व गृहस्थी कणखर बाणा कळीकालालाही आव्हान देऊं शकतो, हें सर्वांना पटविलें. रामाचा हा शांतरसयुक्त गृहस्थधर्म करुणेच्या जलानें अभिषिक्त आहे म्हणूनच तो एवढा आकर्षक झालेला आहे.

## कथेचा गाभा

कुटुंब व्यवस्था सुस्थीर राहण्यासाठीं कुटुंबांतील केवळ कर्त्या व्यक्तींच्याच नव्हे तर सर्व माणसांच्या ठिकाणीं कोणते मौलिक गुणविशेष असावयास पाहिजेत, याचें दर्शन रामायणांत घडतें. कुटुंबांतील एखादी व्यक्ति कैकयीसारखी दुष्ट वृत्तीची असली तरी तिचे दोष पोटांत घालून प्रत्येक माणसानें एकमेकांसाठीं त्याग केला पाहिजे. परस्परांतील जिव्हाळा व अंतीम श्रद्धा यांच्यावरच कुटुंब व पर्यायानें राष्ट्रसुखाची इमारत उभारली जाते. आज्ञा-पालन, शिस्त, संयम, कर्तव्यतत्परता इ० गुणांच्या पोषणामुळें गृहव्यवस्थेंत अव्यवस्था, अपवित्रता व अराजकता, कशी येत नाहीं, हा बोध रामायणाच्या वाचनानें सर्वांना मिळतो. गृहस्थाश्रमाची अभेद्यता हाच या कथेचा गाभा आहे. या अभेद्यतेचा भंग होऊं नये म्हणूनच आईबापांच्या प्रेमाच्या सोनेरी सांवलींत वाढलेली सुकुमार जानकी पतीच्या मागोमाग खालच्या मानेनें अरण्याचा मार्ग चालूं लागली. गृहस्थ धर्माचें परिपालन करण्यासाठीं लक्ष्मणानें रामचंद्रासाठीं सर्वथैव आत्मविलोप केला तेव्हां बारा वर्षांच्या प्रदीर्घ कालांत नववधू उर्मिलेनें अयोध्या नगरींतल्या भव्य प्रासादांतील शून्य दालनांत सर्वव्यापि पण मूक आक्रंदन केलें. आणि याच धर्माला स्थिर करण्यासाठीं श्रीरामानें अश्राप अन् कोमलांगी गर्भवती जानकीचा त्याग करून तिला पुन्हां अरण्यांत पाठवून दिलें.

## जीवनाचें रहस्य

राम सीतेच्या जीवनाचें रहस्य हें असें अपूर्व व अद्भुत आहे. सध्याच्या युगांत नानाविध कारणांमुळें आमच्यामध्यें फुटीर वृत्ति व अश्रद्ध भाव बळावत आहेत.

लोकशाहीचा खरा अर्थ पुष्कळांना न समजल्यामुळें विशेषतः तरुण पिढीकडून वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध ज्येष्ठ व्यक्तींचा अवमान केला जातो; अशावेळीं, रामायणांतील 'हींच राघवा हींच पैंजणें' म्हणणाऱ्या लक्ष्मणाच्या विनम्र प्रवृत्तीचें पुन्हां एकवार दर्शन होऊन आजच्या जीवनाला योग्य तें वळणदार स्वरूप प्राप्त व्हावयास हवें.

नवमहाराष्ट्र राज्याची घडी बसविण्याचा काळ समीप आला आहे. अशावेळीं संघटना, शिस्त व संयम यांच्या सामर्थ्यावर पुढील यश अवलंबून आहे. म्हणूनच श्रीरामचंद्राचें चरित्र आजच्या काळांतहि आदर्श म्हणून पुढें ठेवलें पाहिजे.

---

भगवान् बुद्धाचे पट्टशिष्य आनंद हे एकदां त्यांना म्हणाले, " भगवान् ! इतर आचार्य, ईश्वर, सृष्टि, स्वर्ग आणि मोक्ष यांच्यासंबंधीं गप्पागोष्टी सांगतात आणि त्या बाबतींत आपण कांहींच बोलत नाहीं हें काय ?

'आनंद !' बुद्धदेव शांतपणें म्हणाले, " बाण लागल्यामुळें एक माणूस अत्यंत घायाळ होऊन पडलेला आहे ! त्यावेळीं त्याची शुश्रूषा करणाऱ्यानं तो बाण कोणत्या दिशेने आला, कोणी मारला, कां मारला, मारणाऱ्याचा वर्ण कसा होता, त्या बाणाची बनावट कोणत्या प्रकारची होती ? यासारखे प्रश्न विचारून त्याला सतावणें शोभेल का ? कीं त्याऐवजीं बाणामुळें झालेल्या जखमेवर मलमपट्टी करणें शोभेल ?"

"होय; दुसरी कोणतीही भानगड न करतां किंवा चौकशी न करतां जखमी झालेल्यास तात्काळ औषधोपचार करणेंच इष्ट होय."

"खरें ना आनंद ! त्याचप्रमाणें ईश्वर, मोक्ष, यासंबंधींच्या गोष्टी करण्यापेक्षां आज माणसाचीं माणुसकीनें वागणें, त्याचें दुःख निवारण करणें, त्याला समाधानाच्या दोन गोष्टी सांगून त्याच्या मनाला आनंद देणें, यांचीच अत्यंत जरूरी आहे.

---


॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**महिला वस्तु भांडार**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें

लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमची कोठेंही शाखा नाहीं. ***

# ब्रह्मीभूत भिक्षु श्रीकृष्णानंद सरस्वती
## ( साखरे महाराज )
## व्यक्ति व कार्य

लेखक : वि. पां. सातपुते, मुंबई

सुप्रसिद्ध ज्ञानेश्वरी सांप्रदायिक ब्रह्मीभूत श्रीनानामहाराज साखरे यांचे स्वामीजी कनिष्ठ पुत्र होत. पूर्वाश्रमींचें नांव पुरुषोत्तम नारायण जोशी असें होतें. या जोशी घराण्यास साखरे आडनांव कां पडलें याचा सविस्तर वृत्तांत, तसेंच स्वामीजींचा कुलवृत्तांत इतर उद्‌बोधक माहितीबरोबरच ज्ञानेश्वरीच्या द्वितीयावृत्तीच्या प्रारंभीं स्वामीजींनीं स्वतःच्या शब्दांत दिला आहे.

स्वामीजींनीं शके १८६० मध्यें वयाच्या साठाव्या वर्षी चतुर्थाश्रम ( संन्यास ) घेतला व ते पौष शु. १ शके १८७५ या दिनीं पुणें मुक्कामीं समाधिस्थ झाले.

**स्वामाजींचें कार्य**

स्वामीजींच्या कार्याचा आढावा स्थूल मानानें घेऊं गेलें तरी बराच विस्तार होईल इतकें तें विशाल आहे. तरीही अपेक्षित बंधन पाळून हें करण्याचा प्रयत्न केला आहे.

स्वामीजी ज्ञानेश्वरी प्रचारकार्यार्थ १९४२ सालीं मुंबईस आले. त्यावेळीं इतर अनेक धार्मिक ग्रंथांप्रमाणें ज्ञानेश्वरीहि दुर्मिळ होती. महागाईची कमान वाढण्याच्या सुरवातीचा तो काळ होता व धर्मग्रंथांच्या प्रकाशनांत गुंतविलेला पैसा लवकर मोकळा होत नसल्यामुळें त्यांचें नवीन प्रकाशन होणें दुरापास्त होतें. मराठीचा प्राणच असा ज्ञानेश्वरी ग्रंथ महाराष्ट्र वाचकांस उपलब्ध असूं नये, याचें स्वामीजींस फार वाईट वाटे व आपली ही मनोव्यथा प्रवचनादिकांतून ते प्रकट करीत.

' ज्ञानेश्वरी मार्गदर्शिका सूची ' हें स्वामीजींनीं प्रसिद्ध केलेलें पहिलें पुस्तक होय. यांत ज्ञानेश्वरीच्या कोणत्या ओंवीपासून कोणत्या ओंवीपर्यंत काय विषयाचें वर्णन आहे, याची क्रमवार मांडणी आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम होता. या पुस्तिकेस प्रा. दांडेकर यांची प्रस्तावना आहे व स्व. सा. स. तात्यासाहेब केळकर यांनींही ' सह्याद्रि ' ' केसरी 'च्या द्वारा या उपक्रमाचा गौरव केला. सदर सूचीचा अंतर्भाव ज्ञानेश्वरीमध्यें अकारादि वर्णक्रमपूर्वक यथाकाल करण्यांत आला.

**' स्वस्त संत वाङ्मय प्रकाशन ' संस्था**

वर म्हटल्याप्रमाणें ज्ञानेश्वरीच्या दुर्मिळतेबद्दल तळमळ व विचारप्रदर्शन चालूं असतां स्वामीजींचा अनेक आस्थेवाईक व्यक्तींशीं परिचय घडून आला. जणूं स्वामीजींच्या

तीव्र इच्छाशक्तीचा परिणाम म्हणून की काय, (आतां कै.) अनंत गणेश पंडित, मु. हरिपूर सं. सांगली, यांनीं दोन हजार रुपये देणगी दिली. तसेंच श्री. मोतीराम नारायण देसाई, टोपीवाले यांनीं चार हजार रुपये दिले. आणखीही कांहीं लहानमोठ्या देणग्या मिळाल्या. सन १९४६ मध्यें स्वामीजींनी तत्कालीन कायद्याप्रमाणें ज्ञानेश्वरी प्रकाशनासाठीं परवानगी व कागद यासाठीं अर्ज केला व हीं दोन्ही १९४७ सालीं मिळाल्यावर १९४८ सालीं स्वस्त संत वाङ्मय प्रकाशन संस्थेचें पहिलें पुस्तक म्हणून ज्ञानेश्वरी प्रसिद्ध झाली.

योग्य तो लोकाश्रय मिळाल्यास संत वाङ्मय प्रसिद्ध करून अल्प किंमतीस देण्याचा आपला मानस आहे, असें स्वामीजी नेहमी सांगत असत व या उद्दिष्टास अनुसरून, जरी प्रकाशनकालीं महागाई व निधिस्थापना या कारणांस्तव किंमत १५ रुपये ठेविली तरी लवकरच ती रु. १२॥, १०, ९ व ८ अशा क्रमानें कमी करण्यांत आली.

स्वामीजींच्या आस्तित्वकालींच ज्ञानेश्वरीनंतर पुढील पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत आलीं.

पुस्तक २ रें   सार्थ अमृतानुभव व चांगदेव पासष्ठी (मार्च १९५०)

पुस्तक ३ रें   सटीप श्री एकनाथी भागवत [१९५२]

पुस्तक ४ (१) सटीप भावार्थ रामायण (श्री एकनाथ कृत) भाग पहिला. १९५५

" ४ (२) सदर भाग दुसरा (१९५६)

" ४ (३) सदर भाग तिसरा (१९५८)

क्र. ४ (१), (२) व (३), अमृतानुभव ३ री आवृत्ति (१९५६) व ज्ञानेश्वरी ३ री (शके १८७८) संस्थेच्या विश्वस्तांनीं स्वामीजींच्या समाधिकालानंतर प्रकाशित केली. अमृतानुभव २ री आवृत्ति (ऑक्टोबर १९५१) स्वामीजींनीं स्वतःच प्रसिद्ध केली. हीं सर्वच पुस्तकें त्या त्या प्रकाशनकालीं मिळत नव्हतीं. भावार्थ रामायणासाठीं तर चाळीस रुपये देण्याचीं लोकांची तयारी होती.

मुंबईचे एक उद्योगपति श्री. मनु सुभेदार यांच्याशीं स्वामीजींचा परिचय झाला. श्री. सुभेदार यांच्या 'सस्तुं साहित्य' या अमदाबाद येथील संस्थेशीं असलेल्या घनिष्ट संबंधांमुळें त्यांच्याद्वारां सदर संस्थेचें कार्य व त्याचा विस्तार यांची छाप स्वामीजींच्या मनावर पडली असावीसें दिसतें. शिवाय या सस्तु साहित्याचे संस्थापक भिक्षु अखंडानंद नांवाचे एक गुर्जरस्थ सन्यासीच होते. याचा कांहीं अंशीं परिणाम म्हणून स्वामीजींना प्रकाशन संस्थेचें वरीलप्रमाणें नांव ठेवण्याची स्फूर्ति झाली.

### ज्ञानेश्वरांची प्रतिमा

सन १९४८ मध्येंच, स्वामीजींची कल्पना व मुंबईचे संतपरायण ख्यातनाम शिल्पकार श्री. तालीम यांचा कलावंत हात यांचा सुंदर संगम होऊन ज्ञानेश्वरांचीं चित्तवेधक प्रतिकृति तयार झाली. तत्संबंधीं सर्व हक्क श्री. तालीम यांनीं स्वामीजींस अर्पण केले. याच प्रतिमेची ठसाचित्रें संस्थेच्या कांहीं प्रकाशनांत देण्यांत आलीं आहेत. याचीच संगमरवरी मूर्ति तयार करून, तिची समारंभ व विधिपूर्वक प्राणप्रतिष्ठा पुण्याच्या मठांत

करण्यांत आली. प्रत्येक वर्षी माघ शु. ५ स मूर्तीच्या स्थापनेचा व शु. ६ स मठांतील 'श्री पुरुषोत्तम रुक्मिणी–पांडुरंग ' देवतेच्या स्थापनेचा वाढदिवस समारंभ होत असतो. मूर्तीकडे पाहून स्वामीजींनीं आळंदी पुण्यांत आणली असें भाविक लोक आजहि म्हणतात. हे शिल्प बनविण्याचा खर्च श्री. मोतीराम नारायण देसाई यांनीं दिला.

मार्गशीर्ष महिन्यांत गीताजयंती महाराष्ट्रांत व अखिल भारतांतहि अनेक ठिकाणीं साजरी केली जाते. ज्ञानेश्वरीनिष्ठेमुळें व प्रचारास चालना म्हणूनहि स्वामीजींनीं पुण्याच्या मठांत ज्ञानेश्वरी जयंती साजरी करण्यास प्रारंभ केला. ज्ञानेश्वरी 'शके बाराशें बारोत्तरीं ' लिहिल्याचा उल्लेख आहे पण तिथिनिर्देश नाहीं. श्री एकनाथ महाराजांच्या 'शुद्धिपत्रकां 'त मात्र पुढीलप्रमाणें उल्लेख आहे :—' बहुकाल पर्वणी गोमटी । **भाद्रपदमास कपिलाषष्ठी । प्रतिष्ठानीं गोदातटीं** । लेखन कामाठी संपूर्ण झाली ॥ " या आधारावरून भाद्रपद व. ६ हा ज्ञानेश्वरी जयंतीचा दिवस धरून शु. १५ ते व. ६ असा सप्ताह पाळण्याची प्रथा स्वामीजींनीं सुरू केली, व इतरत्रही तसें केलें जावें अशी जाहीर विनंति केली. याही उपक्रमाच्या प्रसारास केसरीकारांनीं साह्य दिलें. सप्ताहांत ज्ञानेश्वरी पारायण, भजन–कीर्तन, व्याख्यान–प्रवचनादि व ग्रंथराजाची समाप्तीच्या दिवशीं मिरवणूक असे विविध कार्यक्रम होत असतात.

ज्ञानेश्वरी मार्गदर्शिका सूची ( पुस्तकरूप किंवा ग्रंथांतर्भूत ) या उपक्रमाचा उपयोग पाठकास, वाचकास, अभ्यासकास व व्याख्यात्यास फार होतो. आपण विषयांत कोठें आहों हें नजरेसमोर राहतें.

पुण्यातील मठाचा जीर्णोद्धार स्वामीजींनीं " ज्ञानेश्वरी वाचन मंदिर " या नांवानें इ. स. १९२६ मध्यें केला. पूर्वीच्या कौलारू बैठ्या माळवदी वास्तूच्या ठिकाणीं, आज मध्यवर्ती जागीं पक्क्या बांधणीची एकमजली इमारत, पुढें आणखी एकदोन मजले वाढविण्याच्या तयारीनें बांधलेली उभी आहे. मंदिरांत इतर अनेक नैमित्तिक व प्रासंगिक कार्यक्रमांबरोबरच गेलीं सुमारें ९० पेक्षां जास्त वर्षे ज्ञानेश्वरी प्रवचन अखंड चालू आहे.

**व्यक्ति व पुण्यस्मरण**

स्वामीजींनीं ब्रह्मचर्याश्रमांतून चतुर्थाश्रमांत प्रवेश केला. बालपणापासून अत्यंत विरक्त वृत्ति. वडील बंधु तबलावादनपटु वासुदेवराव ( ब्रह्मदेव ) यांच्या सहवासांत दीर्घकाळ अगदीं खालच्या नैतिक पातळीच्या समाजाशीं संबंध येऊनहि, पूर्वसंस्कारामुळें स्वामीजींच्या वृत्तीवर परिणाम झाला नाहीं. सन १९०३ मध्यें एकाएकीं सर्वसंगपरित्यागाची बुद्धि होऊन त्याप्रमाणें केलें व नऊ महिने संपूर्ण मौनव्रताचें पालन केलें. आणि जरी पुढें सुखलाभ झाला, तरी प्रारंभीं लंगोटी व जानवें गमावीपर्यंत प्रसंग आला होता. या कसास स्वामीजी उतरले.

मठाचा जीर्णोद्धार व प्रकाशन संस्थेस चालना या कार्यांच्या प्रारंभीहि स्वामीजींच्या वांट्यास उपेक्षा व विरोध हींच आलीं. परंतु जों जों हीं कामें नांवारूपास

आलीं तों तों विरोध मावळत चालला व आधींचे उपेक्षक 'बुवांनीं (स्वामीजींनीं) फारच उत्तम कार्य केलें.' असें म्हणूं लागले व आजहि म्हणत आहेत.

प्रकाशन संस्थेच्या बाबतींत अक्षरशः 'शेंडीपासून तयारी'ची परिस्थिती होती. स्वतः संन्यासी असल्यामुळें स्वामीजींस व्यक्तिगत असें कांहीं करण्याची गरज नव्हती. परंतु मराठी वाचकांच्या कळवळ्यानें स्वामीजी या कार्यास प्रवृत्त झाले. निधि गोळा करतांना स्वामीजींचा विविध स्वभाववैचित्र्याच्या व्यक्तींशी संबंध आला. परोपदेश, उपेक्षा, अवहेलना, व तिरस्कारही या कामीं त्यांच्या वांट्यास आला पण स्वामीजींनीं आपल्या लोककल्याणकारी उद्दिष्टावर दृष्टि ठेवून श्री एकनाथांच्या भिक्षुगीतेंतील भिक्षु-प्रमाणें देहापासून प्राप्त झालेले अनुभव देहाच्या हवालीं करून स्वतः निर्विकार राहिले

स्वामीजी अत्यंत निस्पृह व म्हणून स्पष्ट वक्ते, सरळ स्वभावी असे होते. त्यांना ज्ञानेश्वरीव्यासंगासंबंधीं योग्यता असूनही थोडासुद्धां अभिमान नव्हता. स्वामीजी प्रकर्षानें प्रसिद्धि पराङ्मुख होते म्हणूनच विशाल कार्य करूनही तें बहुजन समाजास बरेच अज्ञात आहेत. त्यांचा 'सांप्रदायिक' मठ नाहीं. शिष्यपरिवारादि पंथ वा परिग्रह नाहीं.

याप्रमाणें अवतारकार्य समाप्त झाल्यावर प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें स्वामीजींचा समाधिकाल पौष शु. १ शके १८७५ या दिवशीं झाला. त्यांचें देहावसान मुंबईत झालें व त्यांच्या इच्छेप्रमाणें, श्री नाना महाराज साखरे यांच्या समाधिस्थानाशेजारींच पुण्यास स्वामीजींस समाधि देण्यांत आली. कोणत्याही प्रकारचें दृश्य स्मारक न करण्याच्या अटी-वरच ॐकारेश्वरीं समाधीस परवानगी मिळाल्यामुळें समाधीचें दृश्य चिन्ह तेथें आज तरी दिसत नाहीं. पुण्याचें ज्ञानेश्वरी वाचन मंदीर व प्रकाशन संस्थेचा व्याप हींच स्वामीजींचीं स्मारकें आहेत.

'......ज्यांनीं........घडिलें मानवतेचें मंदिर, परि जयांच्या दहनभूमीवर, नाहिं चिरा, नाहीं पणती, तेथें कर माझे जुळती.'

या काव्युक्तीनें हें पुण्यस्मरण संपवितों.

---


**जैसें डोळ्यां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ॥**
**मग वास पाहिजे तेथें प्रगटे । महानिधी ॥** ज्ञानेश्वर.

ही कदाचित् कविकल्पना असेल—पण डोळे काळजीपूर्वक तपासून अचूक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालांत तर दृष्टि स्वच्छ रहाते हें सत्य आहे.

याकरितां **निर्दोष चष्मे** बनविणार

# शेंडे आणि कंपनी

**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४** यांचा सल्ला घेऊन निरधास्त रहा.

बाहेरगांवीं फ्रेम्स, लेन्सीस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें चष्मे बनवून ऑर्डरप्रमाणें पाठवूं.

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद

लें० : एक साईभक्त



## अध्याय तिसरा
## ( उत्तरार्ध )

हें संपूर्ण चराचर विश्व भगवत्स्वरूपच आहे. परंतु भगवंत या विश्वाच्या पलिकडचा असून परात्पर परमात्मा आहे. ईश्वर संसारापासून अभिन्न आहे. पण संसार परमात्म्यापासून भिन्न आहे. संसारांतून सर्व अनुभूति होत असून त्याचें अधिष्ठान ईश्वर आहे. भगवंतांचीं पूजास्थानें अष्ट–प्रकारचीं आहेत. प्रतिमा, स्थंडिलादि यांच्या तुलनेनें गुरू श्रेष्ठ आहेत. श्रीकृष्ण स्वतः पूर्णब्रह्म असतांनाहि त्यानें सांदिपनी चरण धरले. सद्‌गुरूस्मरण केल्यानें नारायण संतुष्ट होतो. 'माझ्यापेक्षां मला माझ्या सद्‌गुरूचें स्तवन अधिक आवडतें.' असें सद्‌गुरूंचें मोठेपण असून, त्यांचा महिमा गहन आहे. गुरूभजनाला जो पाठमोरा असतो तो खरोखरच अभागी व पापी आहे. स्वतःच्या सुखांत तो माती कालवीत असून, जन्ममरण येरझारा तो भोगीत असतो. 'पुनरपि जननं, पुनरपि मरणं' हें भ्रमण नित्य मागें लागलें आहे, म्हणून आपण गुरूकथा श्रवण करूंया व आपला उद्धार करूंया. संतमुखांतून सहजपणें निघालेल्या गोष्टी अविद्या नाहींशीं करून अतीसंकटसमयीं त्या आपलें रक्षण करतात, म्हणून त्या आपण आपल्या हृदयांत सांठवून ठेवूंया. कशी वेळ येईल तें कळत नाहीं व बाबा कसा मेळ घालतील हेंही नलगे. हा सगळा अल्लामियाचा खेळ आहे. प्रेमळ भक्त फक्त प्रेक्षक आहेत. बुद्धिमत्ता नसतांना सबळ दैवामुळें बाबांसारखे प्रबळ गुरू लाभले हाही त्यांचाच खेळ होय.

ग्रंथ प्रयोजन कोणतें व मला जें आश्वासन दिलें त्याबद्दल आपणांस सांगितलें व त्यामुळें 'मत्परत्व' आणि 'मत्पूजन' याचें निरूपणही झालें.

आतां, श्रोतेजनहो, श्रीसाईबाबांचें शिरडीस कसें आगमन झालें याविषयीं आपण पुढील अध्यायीं श्रवण कराल. क्षणभर संसारापासून अलीस होऊन सर्व लहानथोर भोळे भाविकहो, हें वेगळें असें श्रीसाईचरित्र ऐका. श्रीसाई निर्विकारी आणि नटनाटकी अवतारी असले तरी प्रापंचिक व्यवहारांत माया कार्यानुसाराप्रमाणें वागत असतात. 'समर्थ साई' या छोट्याशा मंत्राच्या जपानें ज्याच्या पवित्र पदांचें नित्य ज्ञान होत असतें, तो भक्तभाव मोक्ष सूत्रें हालवित असतो. त्याचें चरित्र पावन आहे. एवंच श्रीसाईचरित्र असून तें वाचणाराचें आणि ऐकणाराचे मुख, कान आणि

अंतरंग पवित्र करणारें आहे. प्रेमानें या कथा तुम्ही श्रवण केल्यास तुमची भवदुःखें नाहींशीं होतील. कृपाघन श्रीसाई तुमच्यावर कृपा करील व तुम्हास शुद्धज्ञानाची प्राप्ति होईल. लय, विक्षेप कषाय रसास्वाद हे श्रवणास अपायकारक आहेत; ते दूर सारा म्हणजे श्रवण सुखदायक होईल. व्रत, उद्यापन, उपवास, शरीरशोषण व तीर्थयात्रापर्यटण यांची जरूरी नाहीं. एक चरित्रश्रवण पुरें आहे. अकृत्रिम प्रेमानें भक्तिवर्म जाणून घेतल्यानें परम परमार्थ लाभेल आणि अविद्येचा व विषमतेचा नाश होईल. इतर साधनीं किती शीण होतो हें माहीत नाहीं म्हणून हें साई चरित्र श्रवण करूं या आणि संचित व क्रियमाण थोड्या प्रमाणांत तरी करून घेऊं या. कृपण कोणत्याहीं गांवी वावरत असला तरी रात्रंदिवस त्याच्या चित्तासमोर जसा पुरलेला ठेवा दिसत असतो तसेंच श्रीसाई अहर्निश आमच्या मनीं राहोत.

अशारीतीनें श्रीसंतजनांनीं प्रेरित केलेला आणि हेमाडपंतांनीं रचलेल्या श्रीसाईसमर्थसच्चरित्राचा ग्रंथप्रयोजनानुज्ञापनं नामें तिसरा अध्याय संपूर्ण झाला.

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु ॥ ॥ शुभं भवतु ॥

## अध्याय चवथा

### श्रीसाईबाबांचे शिरडीस आगमन.

श्रीगणेशास, सरस्वतीस, गुरूंस, कुलदैवतास, सीतारामचंद्रांस आणि साईनाथांस नमस्कार. पूर्वीच्या दोन अध्यायांत मंगलचरण आणि ग्रंथप्रयोजन सांगून अधिकारी अनुबंध याविषयीं संपूर्ण निरूपण केलें. आतां संत कोणत्या निमित्तानें या भूलोकावर अवतार घेतात. असें काय त्यांचें कर्म खडतर असतें कीं, त्यामुळें त्यांना पृथ्वीवर यावें लागतें. श्रोतेहो, ऐका. मी आपल्या पायाच्या धुळीचा एक कण आहें. मला आपल्या अवधान कृपेची अपेक्षा आहे आणि ही मागणी करतांना मला मुळींच लाज वाटणार नाहीं. संतचरित्रें आधींच गोड असतात, त्यांत हें साईकथामृत ऐकून साईंच्या अनन्य भक्तांना आनंद वाटेल.

ब्राह्मण आश्रमवर्णांची हेळसांड करीत आहेत; शूद्र ब्राह्मण होऊं पाहत असून धर्माचार्यांची मानखंडणा करीत आहेत व त्यांना दंडण करूं पहात आहेत. कोणी धर्मवचन मानीत नाहींत. घरोघरीं सर्वच विद्वान् असून एकमेकांची एकमेकांवर ताण आहे आणि कोणी कोणाचें मानीत नाहींत. सेव्यासेव्य, भक्ष्याभक्ष्य आणि आचार विचार यांकडे पूर्ण दुर्लक्ष करून ब्राह्मण सर्वांसमक्ष मद्य-मांस यांचें सेवन करीत आहेत. वर धर्मांचें पांघरूण घालून आंत अत्याचार चालविले जात आहेत. जातीपंथद्वेष माजून राहिले असून लोक भंडावून गेले आहेत. ब्राह्मण संध्यास्नानाचा कंटाळा करीत आहेत. कर्मठ अनुष्ठान विसरत आहेत आणि योगी जपतप ध्यान टाळीत आहेत. हीच वेळ संतावतरणाची असते. लोक परमार्थ विचाराला विन्मुख होऊन धन, मान, दारा, पुत्र यांतच सर्व सुख मानूं लागले म्हणजे संत अवतार घेत असतात.

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें ' लायसॉफ तेल ' वापरा

ज्यावेळीं जन धर्मग्लानीमुळें आत्यंतिक लाभाला मुकत असतात, कामोपासनांना बळी पडून वहकून जातात व आरोग्याला व ऐश्वर्याला पारखे होऊन स्वतःचा उद्धार करून घेण्याचा मार्ग हुकत असतात, अशावेळीं, आणि धर्मजागृति करण्यासाठीं, वर्णाश्रमधर्मांचें संरक्षण आणि धर्माचें संस्थापन करून दीन दुबळ्यांचें संरक्षण करण्याकरितां संत या पृथ्वीवर अवतीर्ण होतात. संत स्वतः मुक्तच असतात; परंतु दीनोद्धारासाठीं नेहमीं तत्पर असल्यामुळें केवळ लोकांच्या कल्याणासाठीं ते जन्म घेत असतात. निवृत्तीचा पाया भरून प्रवृत्तीच्या डोल्हाऱ्या सभोंवतीं ते परमार्थाचें मंदिर उभारतात व आपल्या भक्तांचा सहजासहजीं उद्धार करतात. धर्मकार्य व धर्मजागृति हेंच त्यांचें अवतार कार्य. याची परिपूर्ति झाली म्हणजे ते आपला अवतार समाप्त करीत असतात.

ईश्वर सकल जगाला आनंद देणारा प्रत्यक्ष परमेश्वर, तोच गुरु असून जणूं काय सुख देणारा, भगवान् शंकरच आहे. निरतिशय प्रेमानें स्पंदणारा असून नित्य, निरंतर अभेद असा आहे. देशकाल वस्तू भेद तो जाणत नाहीं आणि परिच्छेदातीत असा आहे. परा, पश्यंति, मध्यमा आणि वैखरी या चारी वाणी ज्यांचें वर्णन करतां करतां थकल्या; वेदांचेंही चातुर्य त्याच्यापुढें चालूं शकलें नाहीं व 'नेति नेति' म्हणून त्यांना हार खावी लागली त्यांचें वर्णन करतां करतां षट्शास्त्रें, षड्दर्शनें आपली बुद्धि चालत नाहीं म्हणून लाजली, पुराणें, कीर्तनें थकलीं. अखेर कायावाचा मनें करून केलेलें नमन हेंच उत्तम साधन ठरलें. संत साईचें चरित्र असें आहे कीं, ज्यांच्या लीला अतिशय विचित्र असून ज्यांच्या पवित्र कथा ऐकतांच ऐकणारांचे कान पावन होत असतात. तेच सकळ इंद्रियांचें चालक असून ग्रंथ रचण्यास बुद्धि देणारे तेच आहेत. त्यांचें चरित्र यथाक्रम सहजासहजीं सुचण्यास तेच कारण होत. ते सर्वांच्या आंत भरलेले आहेत. मग मी निष्कारण काळजी कां करावी? त्यांचें एकेक गुण आठवितांना वृत्ति तटस्थ होते. मग त्यांचें वाचेनें वर्णन मी कसें करूं शकणार? तें कथन करूं म्हटलें तर मानता दृढ होते. नाकानें फुलांचा वास घेतांघेतां त्वचेला शीतोष्ण समजतें. डोळ्यांनीं सौंदर्यसुख उपभोगितां येतें, आपलें आपल्यालाच सुख लाभतें. जिभेला साखरेची गोडी कळते; परंतु तिचें वर्णन करतां येत नाहीं. तसेंच साईगुणवर्णन करूं म्हटलें तर तें मी विशद करूं शकत नाहीं. सद्गुरुंच्या मनांत येईल त्यावेळीं ते प्रेरणा देऊन आपल्याच लोकांकडून जें अनिर्वचनीय आहे तें वचनीय करून देतील. हा केवळ शिष्टाचार नाहीं. मी मनापासून सांगत असून आपण अवधान द्यावें म्हणून प्रार्थना करीत आहें.

गाणगापुर, नृसिंहवाडी, औदुंबर किंवा भिल्लवडी ही जशीं क्षेत्रें आहेत, त्याचप्रमाणें शिरडी हें गोदावरी नदीच्या तीरावर असलेलें पुण्यक्षेत्र आहे. गोदावरीचा तीर, तिचें पाणी आणि तेथून वाहणारा शीतल वारा हीं इतकीं पवित्र आहेत कीं तीं संसार संकटांचा नाश करणारीं आहेत. गोदा महात्म्य अतिशय गोड असून

तें जगांत प्रसिद्ध आहे. कारण हिच्या तीरावर एकापेक्षां एक धुरंधर असे संत महात्मे अवतीर्ण झालेले आहेत. हिच्या तीरावर अनेक तीर्थें वसलीं असून तेथें वारी केली असतां सर्व संकटांचा ऱ्हास होतो. येथें स्नान करून जलपान केलें असतां भवरोग नाहींसे होतात असें पुराणांत वर्णन केलें आहे. ती ही गोदामाता अहमदनगर जिल्ह्यांत कोपरगांव तालुक्यांत, कोपरगांवाजवळच शिरडीचा मार्ग दाखविते. नदी ओलांडून पलीकडील तीरावर तीन कोसांवर असलेल्या निमगांवांत टांग्यानें प्रवेश करतांच समोरच शिरडीचें दर्शन होतें.

निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, मुक्ताबाई, नामदेव, जनाबाई, गोराकुंभार, गोणाई, तुकाराम महाराज, नरहरी, नरसी मेहता, सजन कसाई, सांवतामाळी वगैरे संत मंडळी होऊन गेली. हल्लीं बरेच संत झाले. हे सर्व वसुधैव कुटुंबी असून रंजल्यागांजल्यांचे आधार आहेत. संतशिरोमणी रामदासस्वामी गोदातीर सोडून जगाच्या उद्धारासाठीं कृष्णा माईच्या तीरीं प्रकट झाले. तसेंच शिरडीची पुण्याई म्हणूनच हे योगेश्वर साई जनतेच्या उद्धारासाठीं गोदे ठायीं अवतीर्ण झाले. परीसाचा स्पर्श होतांच लोखंडाचें सोनें होतें. संताना ही उपमा लावतां येते; परंतु संतांची कृति इतकी अलौकिक असते कीं ते आपलें रूपच आपल्या भक्तांना देतात. भेदभाव विसरून हे स्थिरअचर ब्रह्मस्वरूप आहे. आपणासहीतच ही विश्वसंपत्ति आहे. हें सर्व ब्रह्माचें वैभव आहे हें अखिल विश्व म्हणजे मीच आहें आणि मी म्हणजेच विश्व असा जेव्हां बोध होईल, तेव्हां काय त्या सुखाचा लाभ मी किती वर्णन करूं ? परम सद्भावाला पावेल तो भक्त.

( अपूर्ण )

## सूड भावना सोडा

कोणी अपकार केला तरी त्याचा सूड घेऊं नका. सूड भावनेचा आनंद क्षणिक आहे. परंतु सूड न उगवतां जो क्षमाशीलतेनें वागतो, त्याचा आनंद चिरंतन काळ टिकणारा असतो. एखाद्यानें फार मोठ्या प्रमाणांत दुःख किंवा दगा दिला असला तरीहि त्याला अपकार न करतां मनाचें सांत्वन करा.

— संत तिरुवल्लुवार.

---

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें ‘ लायसॉफ तेल ’ वापरा

# संस्थान व्यवस्थापक समिति

अध्यक्षांच्या आसनावरी बसती सावंत ।
परशुराम कृष्णाजी नांवें असती दयावंत ॥ १ ॥

उपाध्यक्षपदिं तात्यासुनू बाजीराव नटले ।
गुणें बुद्धिच्या अल्पवयांतहि श्रेष्ठपदीं चढले ॥ २ ॥

केडगांविच्या पाहुनि भेदा ज्यांच्या हृदयीं खेद ।
करिशी सावंता नागेशा विश्वस्तांचा मोद ॥ ३ ॥

तुझ्या लाडक्या हेमाडाच्या गजानना पुत्रा ।
दोन वार तूं निवडुनि आणिसि चिटणीस करि तूं तत्रा ॥४॥

त्र्यंबकसुतु हरी शेळके शिरडीचे उमदे ।
सध्यां असती पदा चिटणीसा ना कोणा नड दे ॥ ५ ॥

घटनेचे नियमांचे तैसे वाचन सखोल ज्यांचे ।
शालिग्रामा करिशि प्रमुखा तूं अपुल्या खजिन्याचे ॥ ६ ॥

रावसाहेबानंदरावसुतु कुळिचे थोरात ।
वर्तन कपडे दिसे शोभुनी ज्यांचे थोरांत ॥ ७ ॥

खजिना पाहती मुंबईचा परि खर्चे काटकसरी ।
सत्वर तापी परी मनाचा थोरपणा अंतरीं ॥ ८ ॥

चिरंजीव हणमंताचे कोते नामें त्र्यंबकराव ।
पंचायतिचे चिटणिस असुनि देत्वत्सेवा वाव ॥ ९ ॥

देउनि राजीनाम्या पडले सत्वरि बाहेरी ।
जगतापांचे नाना करितीं भाउ काळजी दुरी । ॥१०॥

हणूमंतसुतु कुळीं शेळके पुत्र विश्वनाथ ।
समितीमध्यें येण्या देती बाजिराव हात ॥११॥

एका दगडानें दो पक्षी मारिति कौशल्यानें ।
लगाम सत्ता भाऊ हातीं ठेविति सातत्यानें ॥१२॥

रामचंद्र पाटीलहि कोते निश्चित वृद्ध करारी ।
समाधि मंदिरिं ज्यांच्या योगें राहे विश्वमुरारी ॥१३॥

उत्तम कोते भाउ भाउ कुळिच्या राजारामा।
निवडुनि आणी बाजिराव ये दण्डभेद तो कामा ॥१४॥

साहू गोंदकर हरी शेळके नांव रावसाहेब।
पंचायतिचे प्रमुख पंच त्या तुझ्या राधनीं दाब ॥१५॥

जालन्यांतुनि आणि निवडुनि चव्हाण बापूराव।
त्वत्सेवेचा होइ ज्या मनीं अधुना प्रादुर्भाव ॥१६॥

सरस्वतीच्या चित्रगृहाचे मालक श्रीपतराव।
भजन पूजनीं नाम कीर्तनीं ज्यांचा मोठा भाव ॥१७॥

पकडति भाऊ ज्यांना करण्या आबासंगें द्वंद्व।
दळवि, बोरकर, रेळे, जयकर, भट बुद्धी करि पक्क ॥१८॥

सोनवणे साळुंके भाऊ बाजिरावचे आप्त।
निवडुनि आणि मान करूनि दे सभासदांचा प्राप्त ॥१९॥

दामूअण्णासुत दत्तात्रय नाना कृश ती मूर्ति।
विश्वस्तापदिं जानकि तनया केली प्रथम नियुक्ती ॥२०॥

— बाबांचे बाळाचें बाळ.



शेवाळीनें आच्छादिलेला तलाव पाहून या तळ्यांत पाणीच दिसत नाहीं असें कोणी म्हणेल. पाणी पहावयाचें असेल त्यानें शेवाळ दूर करण्याचे श्रम घेतले पाहिजेत म्हणजे त्याला पाणी दिसून येईल. त्याचप्रमाणें मायेचें पटल डोळ्यावर आलेल्या डोळ्यांनी सभोंवार पाहणाऱ्यास ईश्वर कसा दिसेल ? ईश्वर पहावयाचा तर मायेचा पडदा दूर सारला पाहिजे.

—श्रीरामकृष्ण

# एका संताच्या मुखांतून निघालेले सुखाचे उपाय

******************************************************

**अनुवादक : भवानीशंकर नीळकंठ वागळे**

१. नित्य प्रातःकाल ईश्वरस्मरण करण्यासाठीं कांहीं धन खर्च करावें लागतें का ?

२. प्रत्येक प्रसंगीं विनयपूर्वक वर्तन ठेवण्यासाठीं धन खर्च करण्याची आवश्यकता आहे का ?

३. आपणाशीं व्यवहार करणाऱ्या प्रत्येक माणसाशीं क्रोधारहित प्रेमानें बोलण्यास धनाची जरूरी आहे का ?

४, प्रतिकूल प्रसंगीं न धावरतां धैर्यानें तोंड देण्यास धनाची आवश्यकता आहे का ?

५. आपल्या परिचयांत येणाऱ्या प्रत्येक माणसास योग्यप्रकारें आदर सत्कार करण्यास धन लागतें का ?

६. आपल्या पत्नीकडे सन्मानपूर्वक दृष्टीनें पाहण्यास धनाची जरूरी आहे का ?

७, माता-पित्याच्या आज्ञेचें पालन करण्यास धनाची जरूरी आहे का ?

८. नित्याचें कार्य करीत असतांना ईश्वरस्मरण करण्यासाठीं धन लागतें का ?

९. प्रत्येक प्रसंगीं सत्य बोलण्यासाठीं व समाधान वृत्तींत राहण्यासाठीं धनाची जरूरी आहे का ?

१० आपलें चारित्र्य सुधारून आध्यात्मिक उन्नतीसाठीं उपाय करण्यास धनाची आवश्यकता आहे का ?

११ ज्ञानी व सज्जन पुरुषांच्या संगतींत किंवा सान्निध्यांत राहून त्यांच्या उत्तम गुणांचें अनुकरण करण्यास धनाची आवश्यकता आहे का ?

१२ नित्य मोकळ्या हवेंमध्यें फेरफटका मारून आपलें आयुरारोग्य वाढविण्याचा प्राकृतिक उपाय करण्यास धन खर्च करण्याची जरूरी आहे का ?

१३ आत्म्यांमध्यें, स्थित असलेल्या अखंड आनंदाचा अनुभव घेण्यास धन लागतें का ?

१४ नित्य नेमानें एक तास सच्चरित्र वाचून ज्ञानबोध घेण्यास धन लागतें का ?

१५ प्रत्येक समयीं प्रत्येक स्थितीमध्यें संतोष मानून सुख प्राप्त करून घेण्यास धनाची जरूरी आहे का ?

१६ प्रारब्धाला दोष न देतां प्रयत्नशील बनण्यास धनाची आवश्यकता आहे का ?

या सर्व प्रश्नांचें उत्तर अर्थात नाहीं असें ठरलें म्हणजे ' धनाविना सुख कोठें ' या मिथ्यावादांत पडण्याचें काय कारण ? प्रत्येक माणसानें आपलें जीवन सुखी करण्यासाठीं

वर नमूद केलेल्या प्राकृतिक उपायांची कास धरली पाहिजे. केवळ धनानें सुख प्राप्त होतें ही समजूत चुकीची आहे अतएव त्याज्य आहे. अत्यंत श्रीमंत व वैभवपूर्ण पुरुषांना त्यांचे याबद्दल मत विचारल्यानंतर त्यांच्याकडून असे उद्गार निघतात कीं, त्यांची समग्र संपत्ति त्यांना सुख प्राप्त करून देण्यास असमर्थ आहे. मनाची स्थिर वृत्तिच मानवाला सुख, शांति व संतोष यांचा परिचय करून देते. आणि अशी ही स्थिर वृत्ति ज्याच्या पाशीं आहे तो गर्भश्रीमंतांपेक्षां अधिक सुखी आहे असें समजण्यास मुळींच हरकत नाहीं. प्रत्येक मानवानें आपल्या भोंवतालीच्या विलोभनीय वस्तूंचा लोभ न धरतां केवळ सत्याचें पालन करून वस्तूंमात्रांमध्यें ईश्वराला पाहाण्यास शिकलें पाहिजे. आणि मग तें परिपूर्ण सुख फार दूर नाहीं!

---

तक्ता क्रमांक ४

# श्री सा ई ली ला

## मालकी व तत्संबंधीं इतर तपशील

(१) प्रकाशन स्थळ : ईस्ट अँड वेस्ट इं. कं. बिल्डींग ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

(२) प्रकाशनाचें स्वरुप : मासिक

(३) मुद्रकाचें नांव : शरद कृष्णाजी सापळे
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : रुक्मिणी निवास, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

(४) प्रकाशकाचें नांव : नागेश आत्माराम सावंत
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : ईस्ट अँड वेस्ट इं. कं. बिल्डींग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

(५) संपादकाचें नांव : नागेश आत्माराम सावंत
राष्ट्रीयत्व : } वरीलप्रमाणें
पत्ता : }

(६) पत्राची मालकी : श्रीसाईबाबा शिरडी संस्थान
व्यवस्थापक विश्वस्त—नागेश आत्माराम सावंत.
पत्ता : वरीलप्रमाणें

मी नागेश आत्माराम सावंत असें जाहीर करतों कीं, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणें खरा आहे.

प्रकाशकाची सही
**ना. आ. सावंत**
प्रकाशक




## फेब्रुवारी, १९६०

या महिन्यात भक्तांची गर्दी शिरडीस नेहमीप्रमाणें होती.

**कीर्तन**:—ह. भ. प. पोपटबुवा लोहणेकर, श्री. ह. भ. प. जेऊरकर बाबा, श्री. ह. भ. प. तुकाराम गोसावी उज्जैन, श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने से. ट्र. श्री. श्री. बा. ऊर्फ बाबुराव देव ठाणे, से. ट्र.

**नाट्यछटा**:—श्री. उमाकांत जगन्नाथ कर्णिक पुणें, श्री. द्वारकानाथ गोविंद कर्णिक पुणें.

**गायन**:—श्री. श्रीमतीबाई नार्वेकर, मुंबई, श्री. कौसल्याबाई लाखे खेड, श्री. लक्ष्मण मालेकर नासिक पंचवटी.

नवयुग डॉन्सपार्टी कोपरगांव यांचा नृत्यकार्यक्रम झाला. मेसर्स संजिवन आणि पार्टी पंचवार्षिक योजना भारतसरकार प्रचारकार्य हजेरी.

महाशिवरात्री निमित्त गांवांतून श्रीच्या पालखीची मिरवणूक, कीर्तन वगैरे.

हवापाणी बेरी आहे.

---

## कै. अण्णासाहेब दाभोळकर वाचनालय

गेल्या कांहीं दिवसांत शिरडी येथील कै. आण्णासाहेब दाभोळकर वाचनालयास ज्यांनीं देणगीरूपानें पुस्तकें व मासिकें दिलीं त्यांची साभार पोंच पुढीलप्रमाणें:-

१ श्री. लक्ष्मीशंकर जटाशंकर त्रिवेदी, मुंबई–श्री भगद्गीता ( हिंदी ), २ श्री. पर्शराम एल. खिलनानी, राहुरी–२४ पुस्तकें ( इंग्रेजी ), ३ श्री. चंद्रकांत नागेश सावंत, मुंबई–२० पुस्तकें ( मराठी ), ४ श्री. विनायकराव घाटे, शिरडी–कल्याण मानवता अंक ( हिंदी, ) ६ सौ. लक्ष्मीबाई नानासाहेब कुळकर्णी बेळगांव–चंद्रहास आख्यान ( हिंदी ) ६ श्री. हनुमान प्रसाद पोद्दार, गोरखपूर गीता प्रेस–हिंदी कल्याण मासिक सुरू केलें ७ श्री. वैद्य रामभाऊ मोगे, संपादक मुंबई–आरोग्य मित्र मासीक सुरू केलें. ८ श्रीमती कमलाबाई चौगुले, संपादिका–वार्ताविहार साप्ताहिक हें सुरू केलें.

व्यवस्थापक समीति या सर्वांचे आभारी आहे.

---